तिशीं द्यावया प्रायश्चित्ता । रामराम सर्वथा म्हणावें ॥ ५ ॥ निंदेमाजीं देखिलें स्वार्था । निंदक प्रवर्तले भक्तहिता । बुडवूनि आपुले स्वार्था । परदोष सर्वथा क्षाळिले ॥ ६ ॥ सांडूनियां गुणदोष । श्रोतां होआवें सावकाश । जेथ वक्ता हृषीकेश । अतिसुरस तें ज्ञान ॥ ७ ॥ कृष्णउद्धवांचें ज्ञान । तत्काळ निरसी अज्ञान । एका विनवी जनार्दन । सावधान परियेसा ॥ ५०८ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे । एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां नवमोऽध्यायः ॥ ९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे भगवदुद्धवसंवादे नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

अध्याय दहावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॐ नमो सद्गुरु धन्वंतरी । ज्याची दृष्टीचि निरुज करी । त्यावांचूनि संसारीं । भवरोगु दुरी न करवे ॥ १ ॥ ज्या भवरोगाचेनि दर्पें । फुंफात तापलीं त्रिविध तापें । मी माझें येणें संकल्पें । वाग्जल्पें जल्पती ॥ २ ॥ पडिलीं द्वैताचिया दुखणा । तोंडींची चवी गेली जाणा । मुखा आला कडवटपणा । कटु वचना बोलतु ॥ ३ ॥ जेथें व्याधीचेनि सन्निपातें । विवेक हाणोनियां लातें । उमरुडूनि धैर्य होते । वासना वनातें हिंडती ॥ ४ ॥ मनोरथकर्दमीं चरफडित । संकल्पमृगजळीं बुडत । वेगीं निसरोनियां पडत । टेंक चढतां स्वर्गाचें ॥ ५ ॥ बोरबडत स्नेहाची आराटी । गोंवीत

तरीहि वाणी दूषित होते. तिला प्रायश्चित देण्यासाठीं निरंतर राम-राम म्हणावें. ५ निंदेंतहि स्वार्थ दिसतो. कारण निंदक भक्तांचें हितच करीत असतात. ते आपलें हित बुडवून दुसऱ्याचे दोष धुवून टाकितात. ६ यासाठीं श्रोत्यांनीं गुण व दोष हे दोन्ही टाकून स्वस्थ बसावें. जेथें साक्षात् श्रीकृष्णच वक्ता तेथें ज्ञान अतिसुरस असावयाचेंच. ७ हें श्रीकृष्णानें उद्धवाला सांगितलेलें ज्ञान अज्ञानाचें तत्काल निरसन करितें. म्हणून एकनाथ जनार्दन विनंति करीत आहे कीं, तें सावधान चित्तानें ऐका. ५०८.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मेकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवाद या नांवाचा नववा अध्याय समाप्त झाला.

हे ॐकाररूप सगुरो तुला नमस्कार असो. तूं धन्वंतरी आहेस. तुझी केवल कृपादृष्टीच जीवांना रोगमुक्त करिते. तिच्यावांचून दुसऱ्या कोणालाहि या संसारांतील भवरोग दूर करवत नाहीं. १ त्रिविध तापानें तापलेलीं भूतें भवरोगाच्या उन्मादानें आक्रोश करितात. 'मी आणि माझें' या संकल्पानें तीं बडबडत असतात. २ द्वैताच्या दुखण्यांत पडल्यामुळें त्यांच्या तोंडाची रुचि जाते व तोंड कडु झाल्यामुळें तीं कटुवचनें बोलतात. ३ या संनिपातरूपी व्याधींत तीं विवेकाला लाथेनें दूर झुगारून देतात, धैर्याला ढकलून देतात आणि वासनारूपी वनांत हिंडूं लागतात. ४ तेव्हां तीं मनोरथरूपी चिखलांत रुततात, संकल्परूपी मृगजळांत बुडतात आणि स्वर्गाचें शिखर चढूं लागलीं कीं तत्काल पाय निसरून पडतात. ५ स्नेहरूपी कांटेरीं झुडपें त्यांस ओरबडतात. लोभरूपी बोरीचे कांटे बोंचतात.

लोभाची बोराटी । खिळिला प्रपंचाचिया कंठीं । मारितां नुठी तेथूनी ।। ६ ।। भवरोगभ्रमें भ्रमले कैसे । खावों नये तें खावों बैसे । करूं नये ते करितां दिसे । योषितांसरिसे धांवत ।। ७ ।। तेथ धनभयाचे शारे येत । तेणें थरथरां कांपत । धाकें धाकें घामेजत । दडी देत गुप्तत्वें ।। ८ ।। भोगाभिमानु चढे देहीं । तेव्हां न राहे खाटे भुईं । विधीचें पांघरुण टाकी पाहीं । डोळां ठायीं लागेना ।। ९ ।। उभें न राहती ऐक्यवृत्ती । क्षीण जाली ज्ञानशक्ती । पडलीं जडत्वें लोळती । पाणी मागती विषयाचें ।। १० ।। अल्प-अल्प देतां तें जळ । कडकडूनि झोंबती प्रबळ । आम्हांसी फार द्या गा जळ । तृषा केवळ बोलेना ।। ११ ।। कुपथ्य करितां निरंतर । तंव तो झाला जीर्णज्वर । क्षयो लागला जी थोर । क्षीण शरीर पडियेलें ।। १२ ।। क्षणक्षणां अतिक्षीणता । विकार संचरले जीविता । तेणें प्रबळ वाढली चिंता । सुख सर्वथा बुडालें ।। १३ ।। नवल रोगाचा पडिपाडू । गोड परमार्थ तो जाला कडू । विषप्राय विषय कडू । तोचि गोडू पैं झाला ।। १४ ।। ते व्याधीचिया उफाडा । देतां सत्कथा काढा । श्रवणमुखींच्या भावार्थ-दाढा । पाडी पुढां दांतखिळी ।। १५ ।। देतां तुलसीमकरंद नसू । वरता जावों नेदी श्वासू । मस्तक झाडी मानी त्रासू । रोगें बहुवसू व्यापिला ।। १६ ।। ऐसा रोग देखोनियां गाढा । वैद्य आचार्य धडफुडा । कृपा पाहे याजकडा । तो रोकडा वांचवी ।। १७ ।। निधडा वैद्य तो सुबुद्धी । जीवु गेलिया मरों नेदी । जीवेंवीण वांचवी त्रिशुद्धी । अगाध सिद्धि तयाची ।। १८ ।। शुद्धभाग्येंकरूनि जाण । तो करी कृपाकूर्मावलोकन । तेंचि रोगियां अमृतपान । होय सावधान तत्काळ ।। १९ ।। एवं जालिया सावधान । रोगी आपणिया आपण । नित्यानित्याचें पाचन । करी सेवन साक्षेपें ।। २० ।। तेणें न फिटेचि जीर्णज्वरू । न तुटे

तेव्हां तीं संसाराच्या गळ्यांत मिठी मारितात. मग मारिलें तरी तेथून उठत नाहींत. ६ या भवरोगाच्या झटक्यांत मनुष्यांना भ्रम कसा होतो पहा ! ते जें खाऊं नये तें खातात, जें करूं नये तें करितात आणि स्त्रियांच्या छंदानें नाचतात. ७ द्रव्याच्या भीतीनें त्यांच्या अंगावर शहारे येतात आणि ते चळचळां कांपतात. भयानें साऱ्या अंगाला घाम सुटतो. मग ते कोठेंतरी गुप्त जागीं जाऊन लपतात. ८ अंगांत जेव्हां अभिमानाचा संचार होतो तेव्हां तर त्यांस भूमीवर किंवा खाटेवर पडवतहि नाहीं. ते विधीचें पांघरूण उडवून देतात. त्यांची दृष्टि उफराटी होते. डोळ्याला डोळा लागत नाहीं. ९ त्यांना ऐक्यवृत्तीनें क्षणभरहि उभें रहावत नाहीं. त्यांची ज्ञानशक्ति क्षीण होते. ते जडबुद्धीनें लोळत पडतात व विषयरूपी पाणी मागतात. १० तें जल घोटभर दिलें तर त्यांची तृप्ति होत नाहीं. ' आम्हांला विषयरूपी जल यथेच्छ पिऊं द्या, त्यावांचून आमची तहान भागत नाहीं ' असें बोलून ते हाताला झोंबतात. ११ असें निरंतर कुपथ्य केलें असतां त्यांत जीर्णज्वर होतो व शेवटीं क्षय लागून त्यांचें शरीर क्षीण होऊन जातें. १२ क्षणोक्षणीं अशक्तपणा वाढत जातो. जीविताला विकार जडतात. त्यामुळें मोठी चिंता उत्पन्न होते व सुखसर्वथा नाहींसें होतें. १३ रोगाचा जोर कसा विलक्षण असतो, पहा. गोड असलेला परमार्थ कडु वाटतो आणि विषासारखे कडु असलेले विषय गोड लागतात. १४ हा रोग घालविण्यासाठीं त्यांस जर सत्कथारूपी काढा दिला तर त्यांच्या श्रवणांची दांतखिळीच बसते. (भवरोगी सत्कथा ऐकत नाहींत.) १५ तुळस, मध किंवा तपकिरीसारखें दुसरें कांहीं नाकांत घातलें तर तो तें हुंगीत नाहीं. मस्तक झाडितो व त्याचा मोठा त्रास मानितो. असा रोग त्याला पूर्णपणें घेरितो. १६ तेव्हां त्याचा हा भयंकर रोग पाहून सद्गुरुरूपी वैद्य पुढें सरसावतो आणि कृपादृष्टीनें त्याला खरोखर वांचवितो. १७ तो मोठा बुद्धिमान् व हुशार वैद्य रोग्याचा जीव गेला तरी त्याला मरूं देत नाहीं. जीवा-वांचूनच त्याला जिवंत ठेवितो. (म्ह० सद्गुरुकृपेनें देहात्मबुद्धीची जीवदशा मिथ्या ठरतांच तो जन्म-मरणपरंपरेंतून सुटतो.) अशी सद्गुरूची सिद्धि मोठी अगाध आहे. १८ कांसवीण जशी नुसत्या पहाण्यानें आपल्या पिलाचें संगोपन करिते तसा रोग्याचा महद्भाग्यानें सद्गुरु त्याच्याकडे कृपादृष्टीनें पहातो. तें त्याचें केवल अवलोकनच, अमृताप्रमाणें रोग्याचा भ्रम घालवून त्याला सावध करितें. १९ याप्रमाणें सावध झाल्यावर तो रोगी आपणच नित्य व अनित्य पचवून काळजीपूर्वक त्यांचें सेवन करूं लागतो. २० परंतु तेवढ्यानें त्याचा जीर्णज्वर कांहीं हटत नाहीं व

क्षयाचा महामारू । हें देखोनियां वैद्यसद्गुरू । रसोपचारू मांडिला ॥ २१ ॥ तेणें अक्षररस अर्धमात्रा। दाखवितांच क्षयाचा थारा । मोडूनियां शरीरा । पूर्वपरंपरा अक्षय केलें ॥ २२ ॥ दारुण चुकवावया कुपथ्य । वैराग्य राखण ठेविलें नित्य । लावूनि अनुसंधानाचें पथ्य । निर्दाळिला तेथ भवरोगू ॥ २३ ॥ रोगी उपचारिल्यावरी । प्रबळ क्षुधा खवळे भारी । चित्तचिंतेच्या लाह्या करी । क्षणामाझारीं खादल्या॥ २४ ॥ काळे गोरे चतुर्वर्णचणे । आश्रमेंसीं भाजिले फुटाणे । अहं सोहंगुळेंसीं तेणें । निःशेष खाणें तत्काळ ॥ २५ ॥ फळाभिलाषेंसीं आशा । बोंडें भरलीं होतीं खसखसा । तेंही खादलीं घसघसां । न लगतां घांस गिळियेलीं ॥ २६ ॥ गूळ साखरेचा पडिपाडू । खादले कर्माकर्माचे लाडू । खातां न म्हणे गोड कडू । लागला झोडूं स्वइच्छा ॥ २७ ॥ ब्रह्माहमस्मीचीं गोमटीं । पक्वान्नें देखिलीं दिठीं । तींही खाऊनि उठाउठी । मायेपाठीं लागला ॥ २८ ॥ ते धाकेंधाकेंचि निमाली । मिथ्यात्वें नासोनि गेली । स्वानंदें पुष्टि जाली । झाडी केली भवरोगा ॥ २९ ॥ ऐसा सद्गुरु वैद्य गाढा । जेणें उपचारोनि केलों निधडा । शरण रिघावें तुजपुढां । तंव चहूंकडां तूंचि तूं ॥ ३० ॥ तुजवेगळें आपणियातें । देखोनि शरण यावें तूंतें । तंव मीतूंपण हारपलें थितें । कैसेनि तूंतें भजावें ॥ ३१ ॥ ज्यांच्या सुटल्या जीवग्रंथी। जाले आत्माराम निश्चितीं । तेही अहेतुक भक्ति करिती । प्राप्तांची स्थिति हे जाणा ॥ ३२ ॥ गुरुभजना-परतें सुख । मोक्ष मानिती तेही मूर्ख । मोक्ष गुरुचरणींचे रंक । विरळा लोक हें जाणती ॥ ३३ ॥ आम्हां सद्गुरुदृष्टी परम योग्य । आम्हां सद्गुरुकृपा सदा श्लाघ्य । गुरुसेवें आम्ही सभाग्य । परम योग्य गुरुस्तवनें ॥ ३४ ॥ सद्गुरूचें नाममात्र । तेंचि आम्हां वेदशास्त्र । सकळ मंत्रांवरिष्ठ मंत्र । नाम सर्वत्र गुरूचें ॥ ३५ ॥ सद्गुरूचें तीर्थमात्र । सकळ तीर्थां करी पवित्र । गुरुचरण तें आमुचें क्षेत्र ।

क्षयाची भावनाहि जात नाहीं. तेव्हां सद्गुरुरूपी वैद्य रसाचा उपचार करूं लागतात. २१ त्यानें अक्षररूपी रसमात्रेचा अर्धा वळसा देतांच क्षयरोगाचा पुरता बीमोड होतो व शरीर पूर्ववत् अक्षय होऊन रहातें. (सद्गुरूनें 'मी ब्रह्म आहें, देह नव्हें ' असा अनुभव अर्धमात्रेच्या योगानें आणून देतांच देहात्मबुद्धि नाहींशी होते व ' मी जन्म-मरणरहित अनादि अक्षय आहें 'याची प्रतीति येते. अर्धमात्रा म्हणजे विद्या.) २२ रोग्याचें भयंकर कुपथ्य चुकविण्यासाठीं त्याच्यावर वैराग्याचा नित्य पहारा ठेवून अनुसंधानाचें म्ह० सतत आत्मानात्मचिंतनाचें पथ्य सुरू करितो. त्यामुळें भवरोगाचें पुरतें निर्मूलन होतें. २३ याप्रमाणें उपचार करून रोगी बरा झाल्यावर त्याला अनिवार भूक लागते, तेव्हां तो मानसिक चिंता भाजून तिच्या लाह्या करितो आणि त्या एका क्षणांत खाऊन टाकितो. २४ नंतर चार वर्ण व चार आश्रमरूपी काळे व पांढरे फुटाणे भाजून ते ' अहं व सोहं ' या गुळाबरोबर तत्काळ मटकावून टाकितो. (' सोहं ' या अनुभवानें ' अहं ' म्ह० मी देहवान् काळा, गोरा, अमुक वर्णाचा, अमक्या आश्रमाचा हा अभिनिवेश साफ नाहींसा होतो.) २५ फलासक्ति व आशा, हींच खसखशीचीं बोंडें भरलेलीं पाहून त्यांचाहि तो फडशा उडवितो. म्ह० तीं भराभर गिळून टाकितो. २६ गुळ-साखरेच्या पाकांतील कर्म व अकर्मरूपी लाडु फस्त करितो; पण खातेवेळीं गोड, कडू कांहीं म्हणत नाहीं. हवे तेवढे लाडू झोडितो. २७ ' ब्रह्म अहं अस्मि ' हीं सुंदर पक्वान्नें दृष्टीस पडतांच तींहि जागच्याजागीं खाऊन तो मायेच्या पाठीस लागतो. २८ तेव्हां ती भीतीनेंच पळत सुटली व ती मूळचीच मिथ्या असल्यामुळें नाहींशी होते. मग स्वानंदानें सशक्तपणा येतो व तो भवरोगाला हाकलून लावितो. २९ असा तूं सद्गुरु मोठा निष्णात वैद्य आहेस. तूं जीवाला अशा उपचारांनीं निरोगी करितोस. तुला शरण जावें तर तूं चोहोंकडे भरलेला आहेस. ३० मी स्वतः तुझ्याहून भिन्न आहें अशी कल्पना करून तुला शरण निघावें तर 'मी तूं-'पण नाहींसें होतें. तेव्हां आतां तुला कसें भजावें ! ३१ ज्यांची ' मी जीव आहें ' ही कल्पना गेली आहे व जे आत्माराम झाले आहेत तेहि निष्काम भक्ति करितात. पूर्णावस्थेस पोंचलेल्यांची अशी स्थिति होते, असें तं समज. ३२ गुरुभजनाहून मोक्ष श्रेष्ठ आहे असें जे समजतात ते मूर्खच होत. मोक्ष गुरुचरणाचा किंकर आहे, असें थोडेच लोक मानितात. ३३ आम्हांला सद्गुरूची दृष्टि व कृपा सर्वदा पूज्य वाटते. गुरुसेवेनें आम्ही आपल्याला भाग्यवान् समजतों व गुरुस्तवन करणेंच योग्य मानितो. ३४ सद्गुरूचें केवळ नांवच आमचें वेदशास्त्र व तोच सर्व मंत्रांत

वृत्ति स्वतंत्र ते आम्हां ॥ ३६ ॥ तूं पुरे पुरे म्हणसी स्तवन । परी वर्णितां तुझे उदार गुण । अतृप्त सर्वथा नुठी मन । तुझी आण वाहातसें ॥ ३७ ॥ तुझे गुण वर्णावया तत्त्वतां । मी प्रवर्तलों श्रीभागवता । त्वां मज लाविलें भक्तिपंथा । निजकथाकीर्तनीं ॥ ३८ ॥ जय जय सद्गुरु जनार्दना । भवगजपंचानना । एकाकी शरण आलों जाणा । तुझ्या श्रीचरणा पावलों ॥ ३९ ॥ पावलों शास्त्र श्रीभागवत । अवधारा तेथींचा मथितार्थ । उद्धवासी श्रीकृष्णनाथ । परम परमार्थ सांगेल ॥ ४० ॥ यदुअवधूतसंवादेंसीं । लक्षणोक्त चोविसां गुरूंसी । परिसोनियां उद्धवासी । भावना ब्रह्मेंसीं लिगटली ॥ ४१ ॥ ब्रह्म सर्वगत सत्य होये । मज सबाह्य कोंदलें आहे । तेंही माझें मज ठाऊकें नोहे । कोण उपायें करावे ॥ ४२ ॥ ऐशी उद्धवाची चिंता । कळों सरली कृष्णनाथा । तोचि उपावो सर्वथा । होय सांगतां अविरोधें ॥ ४३ ॥

श्रीभ०—मयोदितेष्ववहितः स्वधर्मेषु मदाश्रयः । वर्णाश्रमकुलाचारमकामात्मा समाचरेत् ॥ १ ॥

पूर्वी वेदरूपें वर्णाश्रम । मीचि बोलिलों स्वधर्म । पंचरात्रादि वैष्णवधर्म । हें उपासनावर्म गुह्य माझें ॥ ४४ ॥ जो वर्ण जो आश्रम । तेणेंचि ते करावे स्वधर्म । आचरतां परधर्म । दुःख परम पाविजे ॥ ४५ ॥ उद्धवा येथ जाण । कर्ता पाहिजे सावधान । ते सावधानतेचें लक्षण । अतिविचक्षण जाणती ।

श्रेष्ठ मंत्र आहे. ३५ सद्गुरूचें फक्त तीर्थ सर्व तीर्थांना पावन करितें. गुरुचरण हेंच आमचें क्षेत्र आहे व त्याची सर्व मालकी आमच्याकडे आहे. ३६ गुरुराया, 'ही स्तुति आतां पुरे झाली' असें तूं म्हणशील. पण तुझ्या उदार गुणांचें वर्णन करितांना माझ्या मनाची तृप्तिच होत नाहीं, हें मी तुझी शपथ घेऊन सांगतों. ३७ खरोखर तुझें गुणवर्णन करितां यावें म्हणून मी श्रीभागवत सांगण्यास प्रवृत्त झालों. तूं मला आपल्या कथा-कीर्तनानें भक्तिमार्गाला लाविलेंस. ३८ हे सद्गुरो जनार्दनस्वामी, भवरूपी हत्तीचा संहार करणाऱ्या सिंहश्रेष्ठा ! तुझा जयजयकार असो. मी एकटाच तुला शरण आलों व तुझ्या चरणांना प्राप्त झालों. ३९ मला श्रीभागवतशास्त्र लाभलें. असो; आतां त्यांतील मथितार्थ ऐका. श्रीकृष्णनाथ उद्धवाला श्रेष्ठ परमार्थ सांगेल. ४० यदु-अवधूतसंवादांतील चोवीस गुरूंचीं लक्षणें ऐकून उद्धवाची मति ब्रह्मामध्यें आसक्त झाली. ४१ ब्रह्म सर्वव्यापी व सत्य आहे. मला स्वतःलाहि त्यानें अंतर्बाह्य व्यापिलें आहे. परंतु तें माझें मलाच अद्यापि कळत नाहीं. त्याला काय उपाय योजावा ४२ ही उद्धवाची चिंता श्रीकृष्णाला कळली आणि त्यानें त्यास तोच उपाय शास्त्राच्या अविरोधानें सांगितला. ४३.

(चोवीस गुरूंचें वर्णन ऐकून ज्याची चित्तभूमिका पुढील उपदेश श्रवणास तयार झाली आहे अशा उद्धवाला भगवानांनीं या पुढील अध्यायांनीं आत्मतत्त्वप्राप्तीसाठीं साधनें सांगितलीं आहेत. या प्रस्तुत दहाव्या अध्यायांत आत्म्याला देहसंबंधामुळें संसार आहे, स्वरूपतः नाहीं असें मतांतराचें निरसन करून वर्णन केलें आहे.)

—याप्रमाणें अन्वय-व्यतिरेकन्यायानेंच ज्याच्या मनांत विवेक उत्पन्न झाला आहे, त्याच्या तत्वज्ञानासाठीं भगवान् आरंभापासून साधनांचा उपदेश करितात—

भगवान् उवाच-भगवान म्हणाले, मया उदितेषु स्वधर्मेषु अवहितः मदाश्रयः अकामात्मा वर्णाश्रमकुलाचारं समाचरेत्—पंचरात्रादिकांत सांगितलेल्या वैष्णव धर्मांत सावधान चित्त राहून त्यांच्याशीं विरोध न येईल अशा रीतीनें माझाच आश्रय केलेल्या निष्काम वैष्णवानें वर्ण, आश्रम व कुल यांच्या आचाराचें अनुष्ठान करावें. १.

पूर्वी वेदरूपानें वर्णाश्रमादि स्वधर्म मींच सांगितला. नारदपंचरात्रादि वैष्णवधर्म तर माझ्या उपासनेंतील गुह्य वर्म आहे. ४४ ज्याचा जो वर्ण व जो आश्रम असेल त्याला अनुसरून त्यानें स्वधर्म आचरावा. दुसऱ्या आश्रमाचें आचरण केलें असतां अतिशय दुःख होतें. (सु. गी. ३-३५ पृ.७३) ४५ हे उद्धवा ! कर्ता सावधान असला पाहिजे, असें समज. अत्यंत ज्ञाते विद्वान सावधानतेचें लक्षण जाणतात. ४६ कर्म चार प्रकारचें आहे. नित्य, नैमित्तिक, काम्य व

॥ ४६ ॥ कर्म चतुर्विध येथ । नित्य आणि नैमित्त । काम्य आणि प्रायश्चित्त । जाण निश्चित विभाग ॥ ४७ ॥ येथ कर्म आचार निश्चितीं । सावधान राखावी वृत्ती । आचरावयाची व्युत्पत्ती । विचित्र स्थिती सांगेन ॥ ४८ ॥ नित्य आणि नैमित्तिक । हें कर्म जाण आवश्यक । सांडोनियां फलाभिलाख । विधिप्रमुख आचरावें ॥ ४९ ॥ नित्य कर्म अधिक वाढे । तैं नैमित्ताचें आंग चढे । काम्य उचंबळलें विषयचाडे । तैंचि पडे निषिद्धीं ॥ ५० ॥ फलाभिलाषेंवीण । नित्य नैमित्तिक जाण । करावें गा कृष्णार्पण । अर्पिती खूण जाणोनी ॥ ५१ ॥ काम्य कर्म आवश्यक । त्यजावें गा निःशेष । जेवीं कां वमिलें वमक । परतोनि लोक न पाहती ॥ ५२ ॥ समूळ कामनेतें दंडावें । तैंचि काम्य कर्म सांडावें । येऱ्हवीं कर्मत्यागु न संभवे । कामना जीवें राखतां ॥ ५३ ॥ अंतरीं अनिवार कामना । बाह्य विरक्ती दावी जना । ते सविया विटंबना । त्यागु विचक्षणा तो नव्हे ॥ ५४ ॥ कामाचेनि अधिक मदें । कर्में निपजती निषिद्धें । समूळ कामनेचेनि छेदें । सर्व निषिद्धें मावळती ॥ ५५ ॥ अथवा देखतांचि निषिद्ध दिठीं । जों हरिनामें गर्जत उठी । निषिद्ध पळे बारा वाटीं । प्रायश्चित्तकोटी हरिनामें ॥ ५६ ॥ जेथ हरिनामाचे उमाळे । तेथ निषिद्ध तत्काळ जळे । निषिद्ध अभक्तां आदळे । भक्तांजवळें तें न ये ॥ ५७ ॥ काम्यनिषिद्धाची कथा । भक्तांसी नातळे सर्वथा । भगवंतु रक्षी निजभक्तां । दोषु तत्वतां त्यां नाहीं ॥ ५८ ॥ नामें प्रायश्चित्तांच्या कोटी । हे म्यां सांगीतली गुह्य गोठी । प्रकट न करावी सृष्टीं । गुप्त पोटीं राखावी ॥ ५९ ॥ काम्यनिषिद्धाचे त्याग । तुज म्यां सांगीतले सांग । नित्य नैमित्तविभाग । तोही विनियोग परियेसीं ॥ ६० ॥ मदर्पणें आवश्यक । करावें नित्यनैमित्तिक । तेंचि चित्ताचें शोधक । साधन मुख्य परमार्थीं ॥ ६१ ॥ एक म्हणती स्वधर्म निर्फळ । वर्म नेणतीच ते बरळ । स्वधर्में होय जन्म सफळ । परमार्थफळ स्वधर्मा ॥ ६२ ॥ किडाळ झाडावया दृष्टीं । रज देऊनि पाठींपोटीं । सुवर्ण घालितां पुटीं ।

प्रायश्चित्त असे त्याचे विभाग आहेत. ४७ या कर्माचरणांत वृत्ति सावधान ठेवावी. कर्म कसें आचरावें हें मी आतां अनेकप्रकारानें सांगतों. ४८ नित्य व नैमित्तिक हीं अवश्य कर्में आहेत. तीं फलासक्ति सोडून शास्त्रोक्त विधीनें आचरावीं. ४९ नित्य कर्म वाढूं लागलें कीं नैमित्तिकहि वाढतें व विषयप्राप्तीसाठीं काम्य कर्म करण्याची प्रवृत्ति होते, त्यामुळें तो लागलाच निषिद्धकर्मांत पडतो. ५० फलाभिलाष न ठेवितां नित्य-नैमित्तिक कर्में अर्पण करण्याची खूण जाणून तीं कृष्णार्पण करावीं. ५१ ज्याप्रमाणें कोणीहि वांती झाल्यावर त्याकडे पहातहि नाहीं त्याप्रमाणें काम्य म्ह० फलाशा धरून आचरिलेलें कर्म पूर्णपणें टाकावें. ५२ इच्छा जेव्हां समूळ टाकावी तेव्हांच काम्य कर्माचा त्याग होतो. कारण मनांत इच्छा ठेवून कर्मत्याग संभवतच नाहीं. ५३ मनांत तर अनिवार इच्छा असावी व बाहेरून मात्र लोकांना विरक्ति दाखवावी, ही केवळ त्यागाची विटंबना आहे. हे चतुर उद्धवा! तो खरा त्याग नव्हे. ५४ कामना प्रबल झाल्या म्हणजे निषिद्ध कर्में वाढतात व कामना समूळ छेदून टाकिल्या म्हणजे निषिद्ध कर्म आपोआपच घडत नाहीं. ५५ किंवा निषिद्ध कर्म दृष्टीस पडतांच जो हरिनामाचा गजर करितो, त्याचें निषिद्ध कर्म बारा वाटांनीं पळून जातें. हरिनामांत कोट्यवधि प्रायश्चित्तांचें सामर्थ्य आहे. ५६ जेथें हरिनामाला प्रेमातिशयाचें भरतें येतें, तेथें निषिद्ध कर्म सर्व जळून भस्म होऊन जातें. निषिद्ध कर्म अभक्तावर जाऊन आदळतें. तें केव्हांहि भक्तांजवळ येत नाहीं. ५७ काम्य व निषिद्ध कर्में भक्ताला कधीं स्पर्शहि करीत नाहींत. कारण भगवान आपल्या भक्तांचें रक्षण करीत असतो. त्यामुळें त्याला तत्त्वतः कसलाच दोष लागत नाहीं. ५८ कोट्यवधि प्रायश्चित्तांइतका हरिनामाचा प्रभाव आहे. ही मीं तुला गुप्त गोष्ट सांगितली आहे. ती तूं जगांत प्रसिद्ध करूं नकोस. मनांतच गुप्त ठेव. ५९ काम्य व निषिद्ध कर्मांचा त्याग मीं तुला स्पष्टपणें सांगितला. आतां नित्य व नैमित्तिक कर्मांचा विभाग राहिला. त्याचाहि प्रकार ऐक. ६० नित्य—नैमित्तिक कर्म मला अर्पण करून (ईश्वरार्पणबुद्धीनें) अवश्य करावें. कारण तें चित्तशुद्धि करणारें असून परमार्थाचें मुख्य साधन आहे. ६१ कोणी म्हणतात कीं, स्वधर्म निष्फळ आहे, पण ते वर्म न जाणतां व्यर्थ बरळतात. स्वधर्मानें जन्म सफल होतो. परमार्थ हें फल स्वधर्मानें मिळतें. ६२ सोन्यांतील अशुद्धांश

झळकत उठी निजतेजें ॥ ६३ ॥ तैसा मज अर्पितां स्वधर्म । त्याचें सफळ होय निजकर्म । ऐसें नेणोनियां निजवर्म । कर्मभ्रम कर्मठां ॥ ६४ ॥ मज अर्पिती हातवटी । अवघड वाटेल जगजेठी । ज्यासी माझी आवडी मोटी । त्याची दृष्टी मदर्पण ॥ ६५ ॥ कृष्णीं निश्चळ ज्याचें मन । त्याचें कर्म तितुकें कृष्णार्पण । त्यासी न अर्पितांही जाण । सहजें मदर्पण होवसे ॥ ६६ ॥ जो रथीं निश्चळ होऊनियां बैसे । तो न चळतांही चालतु दिसे । जाण स्वकर्म त्याचें तैसें । अनायासें मज अर्पे ॥ ६७ ॥ यापरी होऊनि अकामात्मा । सुखें आचरावें स्वधर्मा । तेणें सांडूनि रजतमा । सत्वें पुरुषोत्तमा पावती ॥ ६८ ॥ वर्णाश्रमसमुद्भवा । मूळ आश्रयो मी वोळखावा । कुळकर्मनिजस्वभावा । उपासावा मी एकु ॥ ६९ ॥ वर्णांसी आश्रयो मी प्रसिद्ध । जे जन्मले मुखबाहुरुपाद । आश्रमा आश्रयो मी विशद । गर्जती वेद ये अर्थीं ॥ ७० ॥ देवो देवी कुळाचार । यांचें वस्तीचें मी घर । एवं मी सर्वाधार । हा कर्मीं विचार देखावा ॥ ७१ ॥ गुज परियेसीं उद्धवा । कर्माध्यक्षु मी जाणावा । कर्मीं मीचि अभिलाषावा । क्रियेनि धरावा मी एकू ॥ ७२ ॥ एवं कर्माआदिमध्यअंतीं । मी अविनाशु धरितां चित्तीं । तीं कर्मेंचि निष्कर्में होती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७३ ॥

अन्वीक्षेत विशुद्धात्मा देहिनां विषयात्मनाम् । गुणेषु तत्त्वध्यानेन सर्वारम्भविपर्ययम् ॥ २ ॥

यापरी स्वधर्में जाण । ज्यांचें विशुद्ध अंतःकरण । ते विषयीं उदासीन । हें वोळखण तयांचें ॥ ७४ ॥ तयांसी विषयाची आस्था । नाहीं नाहीं गा सर्वथा । परी सर्वार्थविपरीतता । विषयासक्तता देख ती ॥ ७५ ॥ भरलीं मृगजळाचीं तळीं । तेणें न पिकती साळी केळी । तैसी विषयबुद्धी जवळी ।

घालविण्यासाठीं त्यावर सभोंवार खागीचा लेप करून तें मुशींत घालून आटविलें असतां जसें आपल्या मूळ तेजानें झळकत उठतें, ६३ त्याप्रमाणें मला अर्पण करून स्वधर्म आचरिल्यास तें कर्म सफल होतें. हें गुप्त रहस्य कर्मठांना ठाऊक नसल्यामुळें त्यांना कर्माचा मोठा भ्रम असतो. ६४ कर्में मदर्पण करणें प्रथम अवघड वाटेल, पण ज्याला माझी आवड आहे त्याची दृष्टि मदर्पणच झालेली असते. ६५ ज्याचें मन श्रीकृष्णांत निश्चल झालें आहे तो जेवढें कर्म करितो तें सर्व त्यानें अर्पण न करितांच कृष्णार्पण होतें. ६६ जो रथांत स्वस्थ बसतो, तो जागचा न हलतांच जसा चाललेला दिसतो, त्याप्रमाणें भक्ताचें कर्म सहजच मला अर्पण होतें. ६७ याप्रमाणें निष्काम होऊन सुखानें स्वधर्म आचरावा. त्यामुळें रजोगुण व तमोगुण टाकून सत्त्वगुणामुळें भक्त पुरुषोत्तमाला प्राप्त होतो. ६८ वर्ण व आश्रम यांच्या उत्पत्तीचा मूळ आधार जो मी त्याला ओळखावें. कुलधर्मासाठीं माझीच उपासना करावी. ६९ वर्णांचा आधार मी आहें, 'ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः०' म्ह० ब्राह्मण याच्या मुखापासून; क्षत्रिय बाहूपासून वैश्य मांड्यांपासून व शूद्र पायांपासून उत्पन्न झाले, या श्रुतिवचनानें वेदहि मी वर्णाश्रमांचा आधार असल्याची गर्जना करीत आहे. ७० देव, देवी, कुळधर्म यांच्या वस्तीचें ठिकाण मी आहें. याप्रमाणें मी सर्वांचा आधार आहें. याच दृष्टीनें कर्में करावीं. ७१ हे उद्धवा ! ही गुप्त गोष्ट ऐक. मी सर्व कर्मांचा अध्यक्ष आहें. कर्मांच्या योगानें माझाच अभिलाष धरावा व कर्में करीत असतांनाहि मनांत माझेंच चिंतन करावें. ७२ अशा रीतीनें कर्मांच्या आरंभीं, मध्यें व अंतीं मज अविनाशी ईश्वराचें चिंतन केलें असतां हे उद्धवा ! तीं कर्मेंच निष्कर्म होतात. असें खात्रीनें जाण. ७३.

—वैष्णव निष्काम कसा होऊं शकतो ? उत्तर—

विशुद्धात्मा विषयात्मनां देहिनां गुणेषु तत्त्वध्यानेन सर्वारंभविपर्ययं अन्वीक्षेत्—स्वधर्मानुष्ठानानें ज्याचें चित्त शुद्ध झालें आहे, त्यानें विषयासक्त मनुष्यांच्या विषयांतील सत्यत्वाभिनिवेशानें होणाऱ्या सर्व कर्मांचें फलवैपरीत्य पहावें (त्यांच्या फलांमध्यें अस्थिरत्व हा मोठा दोष आहे असें पाहून स्वतः निष्काम व्हावें, असा याचा भावार्थ.) २.

अशा स्वधर्माच्या योगानें ज्यांचें अंतःकरण शुद्ध होतें ते विषयांविषयीं उदासीन असतात. त्यांना ओळखण्याची हीच खूण आहे. ७४ त्यांची प्रीति विषयांवर सर्वथा नसते. परंतु विषयासक्त लोक मात्र सर्व कर्में विपरीत पहातात. ७५ मृगजलानें मोठालीं तळीं जरी भरलीं तरी त्या पाण्यानें कांहीं भाताचें शेत पिकत

स्वसुखफळीं फळेना ।। ७६ ।। पाहें पां विषयासक्त । कर्मारंभीं संकल्प करित । आयुःकामार्थ क्षेमार्थ । धनधान्यार्थसमृद्धी ।। ७७ ।। या हेतू कर्म आरंभित । तें स्वकर्म नव्हे निश्चित । स्वधर्ममिषें मनोरथ । उपासित सर्वदा ।। ७८ ।। बैलाची कांस दुहितां । शिंपीभरी दूध न ये हाता । तेवीं मनोरथ उपासितां । न लभे सर्वथा निजसुख ।। ७९ ।। कर्मचि तें नव्हे । केल्याही सिद्धी न पवे । तें विघ्नबाहुल्यें नाश पावे । विघ्न संभवे देवांचें ।। ८० ।। विषयसेवनीं आहे सुख । या बुद्धीं शिणाशिणोनि मूर्ख । पावले परम दुःखें दुःख । मुख्य याज्ञिक घालूनी ।। ८१ ।। वेदत्रयी जाणूनी चपळ । यज्ञकर्मीं अतिकुशळ । वांछितां स्वर्गादिक फळ। पतन केवळ अधोमुखें ।।८२।। ऐसेनि विवेकें निपुणदृष्टी । जो स्वर्गु नेघे तृणासाठीं । वैराग्य लागे त्यापाठीं । उठाउठी घर रिघे ।। ८३ ।। तो वैराग्याचें माहेर । विश्रांतीचें विसवतें घर । तो नररूपें साचार । विवेकु साकार पैं झाला ।। ८४ ।। ऐसेनि विवेकें विवेकुदृष्टी । स्वर्गादि विषय मिथ्या सृष्टी । ते मिथ्यात्वाची गोठी । ऐक जगजेठी उद्धवा ।। ८५ ।।

सुप्तस्य विषयालोको ध्यायतो वा मनोरथः । नानात्मकत्वाद्विफलस्तथा भेदात्मधीर्गुणैः ।। ३ ।।

स्वप्न आणि मनोरथ । मनोमात्रविलसित । ते निद्रितासी सत्य पदार्थ । मिथ्या होत जागृतीं ।। ८६ ।। तैसें कामनेचेनि उल्हासें । इंद्रियांचेनि सौरसें । उभय भोगपिसें । नाथिलें वसे बुद्धीसी ।। ८७ ।। शिंपी शिंपपणें असे । धनलोभ्या रुपें भासे । तेवीं विषयाचेनि अभिलाषें । भेदपिसें नसतेंचि

नाहीं किंवा केळीं येत नाहीत. त्याचप्रमाणें विषयासक्ति जवळ असतांना स्वानंद फल केव्हांहि मिळत नाहीं. ७६ विषयासक्त लोकांकडे पहा ! ते 'आयुष्य वाढावें, आरोग्य असावें, धनधान्याची समृद्धि व्हावी' असा कर्माच्या आरंभींच संकल्प करितात. ७७ पण त्यांचें तें हेतुपूर्वक आरंभिलेलें कर्म खरोखर स्वकर्म नव्हे, कारण ते स्वधर्माच्या निमित्तानें निरंतर मनोरथांचीच उपासना करीत असतात. ७८ बैलाची कांस पिळिली असतां थेंबभरहि दूध जसें निघत नाहीं, तसेंच मनोरथांच्या उपासनेपासून आत्मसुख केव्हांहि प्राप्त होत नाहीं. ७९ वस्तुतः तें कर्मच नव्हे. त्यामुळें तें केल्यानें सिद्धि मिळत नाहीं. त्यांत अनेक विघ्नें येऊन त्यांचा नाश होतो व दैवी विघ्न येण्याचाहि संभव असतो. ८० विषयसेवनांत सुख आहे या कल्पनेनें मुख्य यज्ञकर्माला आरंभ करून, मूर्ख लोक परम कष्ट सोसून अतिशय दुःखी होतात. ८१ तीनहि वेद जाणून हुषार झालेले, यज्ञकर्मांत अतिशय निष्णात असलेले ते स्वर्गादि फल इच्छितात. पण त्यांचें अधःपतन मात्र होतें. ८२ विवेकानें ज्यांची दूरदृष्टि झालेली असते ते स्वर्गादिकाला तृणवत् समजून स्वीकारीत नाहींत. वैराग्य त्यांच्या पाठीस लागतें व जागच्याजागींच त्यांच्या घरांत शिरतें. ८३ तेंच वैराग्याचें माहेर घर, विश्रांतीच्या स्वास्थ्याचें ठिकाण व तोच मनुष्यरूपानें मूर्तिमंत विवेक असतो. ८४ असा विचार करून विवेकदृष्टीनें पाहिलें असतां स्वर्गादिविषय सर्व मिथ्या आहेत असें वाटूं लागतें. हे जगन्मान्य उद्धवा ! त्या मिथ्यात्वाची गोष्ट आतां ऐक. ८५.

—शिवाय काम्यविषयांना मिथ्यात्व असल्यामुळेंहि त्यांनीं निष्काम व्हावें असें आतां सांगतात—

सुप्तस्य विषयालोकः ध्यायतः वा मनोरथः गुणैः नानात्मकत्वात् विफलः–निजलेल्या पुरुषाचें विषयदर्शन किंवा मनोराज्य करणाराचा मनोरथ इंद्रियांच्या योगानें नानारूप असल्यामुळें जसा विषयशून्य असतो, तथा भेदात्मधीः– तसा भेदात्मदृष्टीहि विफल आहे. [याविषयीं 'इंद्रियांच्या योगानें होणारी जी बाह्य भेदबुद्धि ती विफल म्ह० अर्थशून्य आहे. कारण ती इंद्रियजन्य आहे. मनोजन्य स्वप्न व मनोरथ, यांप्रमाणें,' असें अनुमान करावें.] ३.

स्वप्न आणि मनोरथ हे दोन्ही मनाचेच विलास आहेत. झोंपेंतच स्वप्न खरें भासतें; जागें होतांच तें खोटें ठरतें. ८६ त्याचप्रमाणें इच्छेच्या उल्हासामुळें आणि इंद्रियांच्या आसक्तीमुळें बुद्धीला येथील व परलोकींच्या भोगाचें खोटेंच वेड लागलेलें असतें. ८७ शिंपी वास्तविक स्वतःच्याच स्वरूपांत असते, पण धनलोभी माणसाला मात्र तें रुपें भासतें. त्याचप्रमाणें विषयांच्या आसक्तीमुळें द्वैताचें वेड लागतें. ८८ स्वप्नांत आपण स्वतःचेंच मरण पहातों व जागे

॥ ८८ ॥ स्वप्नीं देखिलें आत्ममरण । जागृतीं मिथ्या म्हणे आपण । तैसा स्वरूपीं जागा जाल्या जाण । जन्ममरण त्या नाहीं ॥ ८९ ॥ जंववरी भेदाची भेदसिद्धी । तंववरी जन्ममरण बाधी । भेदू मिथ्या जालिया त्रिशुद्धी । अभेदीं बाधी ते नाहीं ॥ ९० ॥ तो भेदू कैसेनि तुटे । निजस्वरूप कैसेनि भेटे । ते अर्थीं साधन गोमटें । ऐक चोखटें विभागें ॥ ९१ ॥

निवृत्तं कर्म सेवेत प्रवृत्तं मत्परस्त्यजेत् । जिज्ञासायां संप्रवृत्तो नाद्रियेत्कर्मचोदनाम् ॥ ४ ॥

चित्तीं वासनांचे मळ । तेणें भेदु भासे सबळ । तो नाशावया चित्तमळ । कर्म निर्मळ सेवावें ॥ ९२ ॥ मागां सांगीतलें निश्चित । जें कां नित्यनैमित्य । तेंचि कर्म गा निवृत्त । साधकीं प्रस्तुत सेवावें ॥ ९३ ॥ जो प्रवर्तला माझ्या भजनीं । तेणें काम्य सांडावें निपटूनी । हें मागां सांगीतलें विवंचूनी । कामना मनीं न धरावी ॥ ९४ ॥ धरोनि मदर्पणाचें बळ । नित्य आचरतां निर्मळ । चित्ताचे चैत्यमळ । जाती तत्काळ नासोनी ॥ ९५ ॥ कृषीवळू करी शेतासी । यथार्थ द्रव्य दे राजयासी । तो न भी ग्रामकंटकांसी । तेवीं कृष्णार्पणेंसीं होतसे ॥ ९६ ॥ जाल्या चित्तमळक्षाळणें । नित्यविवेकु उपजे तेणें । इहामुत्रां लाता हाणे । अनित्य त्यजणें वैराग्यें ॥ ९७ ॥ एवं वैराग्य झालिया अढळ । तेणें सत्व होय प्रबळ । तेव्हां मज जाणावया केवळ । वृत्ति निर्मळ ते काळीं ॥ ९८ ॥ करितां माझी चिंता । कामक्रोध नाठवती चित्ता । थोर लागली माझी अवस्था । न राहे सर्वथा अणुभरी ॥९९॥ हो कां ऐशिये अवस्थेसी । कर्मक्रिया नावडे ज्यासी । तेणें संन्यासूनि सर्व कर्मासी । ब्रह्मज्ञानासी रिघावें ॥ १०० ॥

झाल्यावर आपणच त्याला मिथ्या म्हणतों. त्याचप्रमाणें आत्मस्वरूपांत जागृति आल्यावर त्याला जन्म-मरण मिथ्याच वाटतें. ८९ जोंपर्यंत जीव आत्मा यांतील भेद निवृत्त झाला नाहीं तोंपर्यंतच जन्म-मरणाचा बाध आहे. तो भेद मिथ्या होतांच अद्वैतांत जन्म-मरणाची बाधा नाहीं. ९० आतां तो भेद कसा नाहींसा होतो व आत्मस्वरूपाची प्राप्ति कशानें होते, याविषयींच्या सुंदर साधनांचा उत्कृष्ट विभाग ऐक. ९१.

—‘ काम्य व निषिद्ध कर्मांमध्यें मुमुक्षूनें प्रवृत्त होऊं नये. प्रत्यवायांच्या परिहारासाठीं नित्य-नैमित्तिक कर्म मात्र करावें ’ असें श्रुतिवचन आहे, यास्तव—

मत्परः निवृत्तं कर्म सेवेत—मत्परायण झालेल्या मुमुक्षूनें निवृत्त म्ह० नित्य-नैमित्तिक कर्मच करावें. प्रवृत्तं त्यजेत्—काम्य-कर्मांचा त्याग करावा. जिज्ञासायां संप्रवृत्तः कर्मचोदनां न आद्रियेत्—पण आत्मविचारामध्यें चांगल्याप्रकारें प्रवृत्त झालेल्या मुमुक्षूनें नित्य-नैमित्तिक कर्मविधींचाहि आदर करूं नये. ४.

मनावर वासनांचीं पुटें बसलेलीं असतात. त्यामुळें प्रबळ भेद भासतो. ती चित्ताची मलिनता घालविण्यासाठीं सत्कर्म आचरीत असावें. ९२ पूर्वीं जें नित्य नैमित्तिक कर्म सांगितलें तेंच निवृत्त कर्म होय. साधकानें त्याचेंच आचरण करावें. ९३ जो माझें भजन करण्यांत प्रवृत्त झाला, त्यानें काम्यकर्मांचा निःशेष त्याग करावा. मनांत कसलीहि इच्छा धरूं नये. मागें हें स्पष्ट करून सांगितलेंच आहे. ९४ निर्मल चित्तानें नित्य कर्म आचरिलें असतां चित्ताचा चंचलपणा तत्काल नाहींसा होतो. ९५ शेतकरी शेत पिकवतो. राजाला योग्य सारा भरतो. तो गांवांतील कुटाळांना भीत नाहीं. कर्म कृष्णार्पण केलें असतांहि तसेंच होतें. ९६ चित्ताचा मळ धुवून गेला असतां नित्यवस्तु-विषयींचा विवेक उत्पन्न होतो व इह परलोकींच्या सुखांना तुच्छ लेखून साधक विरक्तीनें अनित्य वस्तूंचा त्याग करितो. ९७ (फलाची इच्छा न ठेवितां कर्म केल्यानें चित्तशुद्धि होते, त्यामुळें वैराग्य येतें. वैराग्यानें वृत्ति निर्मल होते व सत्त्वसंशुद्धि होऊन आत्मस्वरूप जाणण्याची पात्रता येते.) ९८ माझेंच चिंतन करूं लागलें असतां चित्ताला कामक्रोधांचें स्मरणहि होत नाहीं. सारखा माझाच ध्यास लागल्यामुळें त्याचें चित्त क्षणभरहि दुसरीकडे लागत नाहीं. ९९ अशी स्थिति जेव्हां होते तेव्हां त्यास कर्म आवडत नाहीं. त्यावेळीं त्यानें सर्व कर्मांचा त्याग करून ब्रह्म-

श्रवण मनन करितां । कर्मासी जालिया विगुणता । बाधक नव्हे माझ्या भक्तां । कर्मकिंकरता त्यां नाहीं ॥ १ ॥ स्वधर्म केलिया फळ काये । चित्ताचा मळ मात्र जाये । भक्तु भजनें निर्मळ आहे । बाधूं न लाहे स्वकर्म ॥ २ ॥ एवं कर्मांची चोदना । मद्भक्तासी नाहीं जाणा । करितां श्रवणकीर्तना । कर्मबंधना नातळती ॥ ३ ॥ ऐशिया जिज्ञासावस्थेसी । कर्मबाधा नाहीं त्यासी । मुख्य तात्पर्य ब्रह्मज्ञानासी । हेंचि उद्धवासी सांगतु ॥ ४ ॥

यमानभीक्ष्णं सेवेत नियमान्मत्परः क्वचित् । मदभिज्ञं गुरुं शान्तमुपासीत मदात्मकम् ॥ ५ ॥

होआवया वृत्तीचा उपरम । अहिंसासत्यादि धर्म । आचरावे अविश्रम । बाह्य नेम अविरोधें ॥ ५ ॥ आचरतां अहिंसासत्यादिकांसी । तंव तंव दशा उजळे कैसी । अतिप्रीति गुरुभक्तीसी । अहर्निशीं गुरु चिंती ॥ ६ ॥ सद्गुरूवीण ब्रह्मज्ञान । सर्वथा नव्हे नव्हे जाण । हें उपनिषदर्थें प्रमाण । परम निर्वाण सांगीतलें ॥ ७ ॥ डोळां देखणाचि आहे । त्यासी सूर्य नव्हतां साह्य । सिद्ध पदार्थ देखों न लाहे । स्तब्ध राहे अंधारीं ॥ ८ ॥ नाव तारी हे साचार । माजीं बैसले थोर थोर । परी तारकेंवीण परपार । समर्थ नर न पावती ॥ ९ ॥ पर्जन्यें भूमी मार्दवा आली । बीजें कणिंग असे भरली । परी ज्ञातेन पेरणी नाहीं केली । तंव पिकाची बोली पोचट ॥ ११० ॥ रत्न सांपडलें अवचितें । परी खरें खोटें संशय तेथें । रत्नपारखी करी मोलातें । अतियत्न त्यातें मग करिती ॥ ११ ॥ तैसें निजस्वरूप आइतें । श्रद्धा सद्गुरूचेनि हातें । खरें करूनियां ज्ञाते । निजसुखातें पावले

ज्ञानाच्या मार्गें लागावें. १०० श्रवण, मनन करीत असतां कर्मांमध्यें अडथळा आल्यास तो माझ्या भक्तांना बाधत नाहीं. कारण ते कर्माचे दास नाहींत. १ स्वधर्माचरणाचें फल काय ? त्यानें चित्ताचा मळ मात्र जातो. परंतु भक्ताचें चित्त भजनानें अगोदरच निर्मळ झालेलें असतें. त्याला स्वकर्म बाधक होत नाहीं. २ सारांश माझ्या भक्तांना कर्मांचा विधि नाहीं. ते श्रवण-कीर्तन करीत असतां कर्मबंधन त्यांना स्पर्श करीत नाहीं. ३ जे जिज्ञासु अवस्थेंत असतात त्यांना कर्म बाधत नाहीं. ब्रह्मज्ञानाचें मुख्य तात्पर्य हेंच आहे, असें भगवानानें उद्धवाला सांगितलें. १०४.

—तसेंच—

यमान् अभीक्ष्णं सेवेत–अहिंसादि यमांचें मोठ्या आदरानें वारंवार सेवन करावें. **मत्परः नियमान् क्वचित् सेवेत**–पण मत्परायण होऊन शौच्यादि नियमांचें क्वचित् सेवन करावें. (क्वचित् म्ह० जेव्हां सामर्थ्य असेल तेव्हां व आत्मज्ञानाला प्रतिबंध न होईल अशारीतीनें त्यांचें सेवन करावें. यम व बारा नियम पुढें एकोणिसाव्या अध्यायांत सांगतील. यमाविषयींचाहि आदर कमी करून गुरूची उपासना करावी असें आतां उत्तरार्धानें सांगतात–) **मदभिज्ञं मदात्मकं शान्तं गुरुं उपासीत**–मला जाणणाऱ्या मद्रूप शांत गुरूची उपासना करावी. ५.

वृत्ति शांत होण्यासाठीं अहिंसा, सत्य इत्यादि धर्म अविश्रांत आचरावे व बाह्य नियमहि पाळावे. ५ अहिंसा, सत्य इत्यादि धर्म जसे जसे आचरावे तशी तशी वृत्ति कशी उज्वल होत जाते, पहा ! पहिल्यानें गुरुभक्तीची अतिशय आवड उत्पन्न होते व रात्रंदिवस गुरूचेंच वेड लागून रहातें. ६ 'सद्गुरूवांचून ब्रह्मज्ञान केव्हांहि होत नाहीं' हें उपनिषदाच्या आधारानें मी तुला सांगत आहें. उपनिषद् सर्वांत श्रेष्ठ प्रमाण आहे. ७ डोळ्याची पहाण्याची शक्ति चांगली आहे. पण सूर्यानें जर त्याला साह्य केलें नाहीं तर तो पुढें असलेली वस्तूहि पाहूं शकत नाहीं. अंधारांत स्वस्थ बसतो. ८ नाव तारून नेते, हें खरें आहे, पण मोठीं मोठीं माणसें जरी त्यांत बसलीं तरी त्या समर्थांनाहि नावाड्यावांचून परतीराला जातां येत नाहीं. ९ पावसानें जमीन चांगली भिजविली आहे व बियाण्याच्या कणगीहि भरलेल्या आहेत तरी जाणत्या शेतकऱ्यानें पेरणी केल्यावांचून पिकाची आशा व्यर्थच होय. ११० एखाद्याला अकस्मात् रत्न जरी सांपडलें, तरी त्याला त्याच्या खरे-खोटेपणाविषयीं संशय असतो. पण रत्नपारखी जेव्हां परीक्षा करून त्याची किंमत ठरवितो तेव्हां मग तो तें रत्न जपून ठेवण्याचा प्रयत्न करितो. ११ त्याचप्रमाणें आत्मस्वरूप आयतेंच प्राप्त झालेलें असतें; परंतु श्रद्धायुक्त मनानें सद्गुरुमुखानें तें खरें ठरवूनच

॥ १२ ॥ साधावया निजज्ञान । करितां सद्‌गुरूचें सेवन । निवाले संत सज्जन । आनंदघन सद्‌गुरू ॥ १३ ॥ ह्मणसी साधनें केलीं अनेक । तैसें सद्‌गुरूही साधन एक । ह्मणतां मुमुक्षू जाला मूर्ख । निजात्मसुख बुडालें ॥ १४ ॥ सद्‌गुरु केला तो साधन । त्याहून परतें साध्य आन । ह्मणतां आली नागवण । नागवला जाण सर्वस्वें ॥ १५ ॥ जो चित्सुखें सदा संपन्न । चिद्रूपें ज्यासी समाधान । तो चिन्मात्राहोनि भिन्न । नव्हे जाण सर्वथा ॥ १६ ॥ लवण सागरीं रिघालें । तेव्हांचि तें समुद्र जालें । दीपें वणवया आलिंगिलें । वणवाचि झालें तें तेज ॥ १७ ॥ एवं चिद्रूपाचें ज्यासी ज्ञान । तो चिद्रूपचि सत्य संपूर्ण । गुरु ब्रह्म अभिन्न जाण । ये अर्थीं प्रमाण उपनिषद् ॥ १८ ॥ हो कां घृताची पुतळी । नव्हता घृतपणा वेगळी । घृतरूपें रूपा आली । तैसा मूर्ती जाली सद्‌गुरूची ॥ १९ ॥ तो चित्सुखाचा पुतळा । कीं सच्चिदानंदाचा सोहळा । प्रत्यक्ष देखावया डोळां । धरी लीलाविग्रह ॥ १२० ॥ त्याची होआवया भेटी । पाहिजेती भाग्याचिया कोटी । हेळणेवरी दिसे दिठी । तैसी गोठी त्या नाहीं ॥ २१ ॥ सद्‌गुरु जेउती वास पाहे । तेउती सुखाची दृष्टि होये । तो ह्मणे तेथ राहे । महाबोधु लाहे स्वानंदें ॥ २२ ॥ त्या सद्‌गुरूचें देखिल्या पाये । ताहानभूक तत्काळ जाये । कल्पना उठोंचि न लाहे । निजसुख आहे गुरुचरणीं ॥ २३ ॥ त्या सद्‌गुरूचें लक्षण । सांगतां शब्दु थोटावे जाण । जो सनातन ब्रह्म पूर्ण । उणखूण त्या नाहीं ॥ २४ ॥ तऱ्ही स्फुरली एक स्फूर्ती । त्यासी सर्वार्थीं दिसे शांती । शांतीवेगळी उपपत्ती । प्रमाण निश्चितीं रिघेना ॥ २५ ॥ शांति तेचि समाधान । शांति तेचि ब्रह्मज्ञान । शांति तेचि ब्रह्मपूर्ण । सत्य जाण उद्धवा ॥ २६ ॥ ऐसी सद्‌गुरूची स्थिती । एकोनि शिष्याच्या चित्तीं । वाढली अतिप्रीति । गुरुभक्तीलागोनी ॥ २७ ॥ यालागीं गुरुगवेषणा । उसंतु घेवों नेदी अंतःकरणा । अष्टौ प्रहर विचक्षणा । गुरुलक्षणा लक्षितू ॥ २८ ॥ कैं तो स्वामी देखेन ऐसा । कैं हा माझा

ज्ञात्यांनीं आत्मसुख मिळविलें आहे. १२ आत्मज्ञान मिळविण्यासाठीं सद्‌गुरूची सेवा करून संत-सज्जन तृप्त झाले. सद्‌गुरु आनंद देणारा मेघच आहे. १३ कदाचित् तूं असें म्हणशील कीं, अनेक साधनें केलीं, सद्‌गुरुहि त्यांपैकींच एक साधन आहे, तर असें म्हणणारा मुमुक्षु मूर्ख आहे. तो आत्मसुखाला अंतरलाच असें समजावें. १४ सद्‌गुरु एक साधन म्हणूनच केला, साध्य त्याहून निराळेंच आहे, असें म्हणणारा सर्वस्वी नागवला असें समजावें. १५ जो सद्‌गुरु चित्सुखानें सदा संपन्न असतो व चिद्रूपानें ज्याला समाधान असतें तो चिन्मात्राहून भिन्न नाहीं, असें निश्चयानें जाण. १६ मीठ समुद्रांत पडलें कीं लगेच तें समुद्ररूप होतें. दिव्यानें वणव्याला आलिंगन देतांच तो वणवा होतो. १७ याप्रमाणें चिद्रूपाचें ज्ञान झालें कीं, तो स्वतःच चिद्रूप बनतो. गुरु व ब्रह्म भिन्न नाहींत. याला उपनिषद् प्रमाण आहे. १८ तुपाची प्रतिमा केली तर ती कांहीं तुपाहून वेगळी नसते. तुपाच्या रूपानेंच ती पुतळी असते. त्याचप्रमाणें सद्‌गुरु ब्रह्माचीच मूर्ति आहे. १९ मूर्तिमंत चित्सुखाचा पुतळा किंवा सच्चिदानंदाचा सोहळा प्रत्यक्ष दिसण्यासाठींच सद्‌गुरूनें तें लीलाशरीर धारण केलेलें असतें. १२० त्याची भेट होण्यासाठीं फार मोठें भाग्य लागतें. सहज जातां जातां सद्‌गुरु दृष्टीस पडेल ही आशा व्यर्थ आहे. २१ सद्‌गुरु जेथें दृष्टि फेकतो तेथें सुख वाट पहात बसतें, तो म्हणेल तेथें आत्मज्ञान मोठ्या आनंदानें रहातें. २२ त्या सद्‌गुरूचे पाय दृष्टीस पडतांच तहानभूक तत्काळ नाहींशी होते. त्यांची आठवणहि होत नाहीं. गुरुचरणीं असें आत्मसुख आहे. २३ त्या सद्‌गुरूचें लक्षण सांगतांना शब्दच कमी पडतात. तो सनातन पूर्णब्रह्मच असल्यामुळें त्याची अमुक अशी कांहीं खूण सांगतां येत नाहीं. २४ तथापि त्याचें एक लक्षण मात्र स्पष्ट दिसतें. त्याला सर्व वस्तूंमध्यें शांति दिसते. शांतीवांचून दुसरी कोणतीहि युक्ति किंवा प्रमाण त्याच्या ठिकाणीं प्रवेश करीत नाहीं. २५ हे उद्धवा! शांति म्हणजेच समाधान, ब्रह्मज्ञान व पूर्णब्रह्म आहे, असें तूं खात्रीनें जाण. २६ असें सद्‌गुरूचें वर्णन ऐकून शिष्याच्या मनांत गुरुभक्तीची अतिशय आवड उत्पन्न झाली. २७ त्यामुळें गुरु शोधण्याची त्याला उत्कंठा लागली. मन त्याला स्वस्थ बसूं देईना. तो रात्रंदिवस विवेकबुद्धीनें गुरुलक्षण

फिटेल फांसा । कैं उपरमु होईल मानसा । सद्गुरुपिसा तो झाला ॥ २९ ॥ आयुष्य वेंचतां उठाउठी । अज्ञानि नव्हे सद्गुरूसी भेटी । जाल्या मनुष्यदेहासी तुटी । सर्वस्व शेवटीं बुडेल ॥ १३० ॥ ऐकतां गुरूचें नांव । मनापुढें घेत धांव । ते गोठीसीच देत खेंव । येवढी हांव जयाची ॥ ३१ ॥ सद्गुरु प्रत्यक्ष न भेटतां । मनेंचि पूजी गुरुनाथा । परमादरें पूजा करितां । प्रेम तत्त्वतां न संडे ॥ ३२ ॥ सद्गुरु भेटावयाकारणें । हिंडे तीर्थें तपोवनें । गुरु न विसंबे मनें । नित्यविधीनें आचरतां ॥ ३३ ॥ सद्गुरु-प्राप्तीचिया काजा । लहानथोरांची करी पूजा । अत्यादरें मानी द्विजा । गुरु मज माझा भेटावा ॥ ३४ ॥ अस्वलाचिया परी । गुरुनामाचा जप करी । गुरूवांचोनि निरंतरीं । चिंता न करी आनाची ॥ ३५ ॥ आसनीं भोजनीं शयनीं । गुरूतें न विसंबे मनीं । जागृतीं आणि स्वप्नीं । निदिध्यासनीं गुरु केला ॥ ३६ ॥ गुरुस्मरण करितां देख । स्मरणें विसरें तहानभूक । विसरला देहगेहसुख । सदा संमुख पर-मार्थां ॥ ३७ ॥ ऐसी सद्गुरूची आवडी । ज्याची आस्था चढोवढी । त्यासी गुरुरूपें तांतडी । भेटी रोकडी मी देता ॥ ३८ ॥ जंव जंव आस्था अधिक । तंव तंव भेटीची जवळिक । साधनामाजीं हें साधन मुख्य । आस्थाचि एक विशेष ॥ ३९ ॥ करितां वरिष्ठसाधनकोडी । बोधाची जोडेना कवडी । सद्गुरुभजनाची अर्ध घडी । जोडी कोडी बोधाच्या ॥ १४० ॥ सद्गुरुभजनीं लागवेगें । मोक्ष येऊनि पायां लागे । गुरुभक्त तोही नेघे । चरणरंगें रंगला ॥ ४१ ॥ श्रीगुरुचरणाची गोडी । विसरवी मोक्ष-सुखाच्या कोडी । गुरुभजनीं जयां अनावडी । ते संसारबांदवडीं पडियेले ॥ ४२ ॥ छेदावया संसारबंधन । करावें सद्गुरुसेवन । सद्गुरुसेवा तें माझें भजन । गुरु आम्हां भिन्नभावो नाहीं ॥ ४३ ॥ गुरुभक्तांची

कोणामध्यें दिसतें, त्याचा शोध करूं लागला. २८ मी त्या स्वामीला केव्हां पाहीन ! माझा हा भवपाश केव्हां तुटेल ! माझ्या मनाला शांति कधीं मिळेल ! असें त्याला सद्गुरूचें वेड लागलेलें असतें. २९ आयुष्य बोलतां बोलतां संपून जाईल, परंतु सद्गुरूची भेट अद्यापि होत नाहीं. मनुष्य देह निघून गेला कीं सर्वच संपलें. १३० गुरूचें नांव घेतांच तो मनाच्या पुढें धांव घेतो व त्याच्या गोष्टीकडे सर्व लक्ष ठेवितो. इतकी त्याची उत्सुकता असते. ३१ सद्गुरूची प्रत्यक्ष भेट जर झाली नाहीं तर तो मनानेंच गुरुरायाचें पूजन करितो. परम आदरानें पूजा केली असतां त्याच्या मनांतील प्रेमातिरेक आंवरत नाहीं. ३२ सद्गुरूला भेटण्यासाठीं तो तीर्थयात्रा, तपोवनें यांतून हिंडत असतो. नित्यकर्म करीत असतांहि मनानें गुरूला क्षणभरहि विसंबत नाहीं. ३३ सद्गुरु प्राप्त व्हावा म्हणून तो लहान-थोरांची पूजा करितो. माझा गुरु मला भेटावा म्हणून द्विजांचा सत्कार करितो. ३४ अस्वल जसें सारखें गुरु गुरु करीत असतें, तसा हा रात्रं-दिवस गुरूच्या नांवाचा जप करीत असतो. गुरूवांचून दुसरी कशाचीहि चिंता करीत नाहीं. ३५ बसलेला असतांना, जेवतांना, निजतांना, तो गुरूला क्षणभरहि विसंबत नाहीं. जागृतींत व स्वप्नांत गुरूचेंच एकाग्र मनानें चिंतन करीत असतो. ३६ गुरुस्मरण केलें असतां तो तहान भूकहि विसरतो. देहसुख व गृहसुखहि विसरतो. सदासर्वदा तो परमार्थाविषयीं तत्पर असतो. ३७ अशी ज्याला सद्गुरूची आवड असते, ज्याची आस्था अधिक-अधिकच वाढत असते, त्याला गुरुरूपानें मी तत्काल भेट देतों. ३८ आस्था जशी जशी अधिक वाढते तशी तशी भेट जवळ येते. सर्व साधनांमध्यें हें साधन मुख्य आहे. त्यांत आस्थाच विशेष आहे. ३९ कोट्यवधि श्रेष्ठ साधनें जरीं आचरिलीं तरी त्यांनीं आत्मज्ञानाची कवडीहि लाभत नाहीं. परंतु अर्धी घटका जरी सद्गुरुभजन केलें तरी आत्मज्ञानाच्या राशी पदरांत पडतात. १४० सद्गुरूचें भजन केलें असतां मोक्ष लगबगीनें येऊन पायां पडतो. पण गुरुभक्त त्या मोक्षाचाहि स्वीकार करीत नाहीं. इतका तो गुरुचरणांत रंगलेला असतो. ४१ श्रीगुरुचरणाची गोडी कोट्यवधि मोक्षसुखाला विसरविते. ज्यांना भजनाची आवड नाहीं ते संसाराच्या बंदीशाळेंत पडतात. ४२ संसारबंधनाचा छेद करण्यासाठीं सद्गुरूची सेवा करावी. सद्गुरुसेवा हेंच माझें भजन आहे. गुरु व आम्ही यांत भेदभावच नाहीं. ४३ याप्रमाणें गुरुभक्ताची दृढ श्रद्धा व त्याची गुरुभजनाविषयींची

श्रद्धा गाढी । आणि गुरुभजनाची गोडी । तें सांगीतली आवडीं । प्रत्यक्ष उघडी करूनी ॥ ४४ ॥ सहज प्रसंगें येणें । शिष्यांचींही लक्षणें । सांगेन तुजकारणें । कृष्ण म्हणे उद्धवा ॥ ४५ ॥

अमानमत्सरो दक्षो निर्ममो दृढसौहृदः । असत्वरोऽर्थजिज्ञासुरनसूयुरमोघवाक् ॥ ६ ॥

मान देखोनि सहसा । शिष्य सांकडीं लागे कैसा । जेवीं गळीं लागला मासा । चरफडी तैसा सन्मानें ॥ ४६ ॥ नांवें ऐकोनि बागुलातें । बाळ सांडूं पाहे प्राणातें । तेवीं ऐकतांचि सन्मानातें । भये प्राणातें सांकडें ॥ ४७ ॥ प्रचंडवातें जेंवी केळी । समूह कांपे चळचळीं । का लहरींच्या कल्लोळीं । कांपे जळीं रविबिंब ॥ ४८ ॥ सन्मानू तेणें पाडें । दृष्टीं देखोनि नावडे । महत्त्वें थोर सांकडें । अंगाकडे येवों नेदीं ॥ ४९ ॥ आदरें घेतां सन्मान । दृढ होईल देहाभिमान । सांडोनि मानाभिमान हीनदीन होऊनि असे ॥१५०॥ समूळ नामरूप जाये । मज कोणी देखों न लाहे । ऐशी दशा जेणें होये । ते ते उपाये करीतसे ॥ ५१ ॥ लौकिक देखोनि उद्वेगू । देहगेहांचा उबगू । एकलेपणीं अतिचांगू । न धरी संगू द्वैताचा ॥ ५२ ॥ मज कोणी न देखावें । मज कोणी न वोळखावें । मज कोणी न लाजावें । ऐसें जीवें वांछितू ॥ ५३ ॥ मान देखोनियां दिठीं । लपे देहउपेक्षेच्या पोटीं । जेवीं चोर लागलिया पाठीं । लपे संकटीं धनवंतू ॥५४॥ मी एकु लौकिकीं आहे । ऐसें कोणा ठावें नोहे । ऐशी ऐशी दशा पाहे । मानु न साहे यालागीं ॥५५॥ सांडावया अहंममता । मानू न पाहे सर्वथा । लौकिकीं सन्मानू घेतां । दृढ अहंता होईल ॥ ५६ ॥ ज्यांचे पोटीं दृढ अभिमान ते सदा वांछिती सन्मान । त्यासी जो सांडूं रिघे अभिमान । तो मानापमान न पाहे

आवड ही दोन्ही मोठ्या प्रेमानें स्पष्ट करून सांगितल्यावर ४४ श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाले कीं, याप्रसंगीं मी तुला शिष्याचीं लक्षणेंहि सहज सांगतों. १४५.

—गुरुसेवकाचे धर्म सांगतात—

अमानमत्सरः—ज्याला मान आणि मत्सर नाहीं असा, **दक्षः**—सावधान, **निर्ममः**—स्त्री-पुत्रादिकांविषयीं ममताशून्य **दृढसौहृदः**—गुरूवर ज्याचें अत्यंत प्रेम आहे असा, **असत्वरः**—अव्यग्र, **अर्थजिज्ञासुः**—सारभूत अर्थाला जाणण्याची इच्छा, करणारा, **अनसूयुः**—कोणाच्याहि गुणामध्यें दोषदृष्टि न ठेवणारा, **अमोघवाक्**—व्यर्थ आलाप न करणारा. (शिष्याचीं हींचा लक्षणें जाणावीं.) ६.

गळाला लागलेला मासा जसा तळमळतो, तसा शिष्य मान-सन्मानानें मोठ्या संकटांत पडतो. ४६ बागुलबुवाचें नांव ऐकतांच मुलाचा प्राण जसा कासावीस होतो, तसें सन्मानाचें नांव ऐकतांच प्राणावर संकटच ओढवलें असें समजून शिष्य भयभीत होतो. ४७ प्रचंड वादळानें केळी जशा मुळापासून हालूं लागतात. किंवा समुद्रांत लाटा उसळल्या म्हणजे त्यांत पडलेलें सूर्याचें प्रतिबिंब कांपत असलेलें दिसतें, ४८ त्याप्रमाणें त्याला सन्मान दृष्टीनें पहाण्यासहि आवडत नाहीं. सन्मानाचें संकट तो आपल्याकडे येऊंच देत नाहीं. ४९ सन्मानाचा आदरानें स्वीकार केला तर देहाभिमान दृढ होईल, म्हणून तो मानाचा अभिमान टाकून हीन, दीन होऊनच रहातो. १५० नाम-रूप सारेंच नाहींसें होऊन आपल्याला कोणी पहाणार नाहीं अशी स्थिति ज्यायोगें प्राप्त होईल ते उपाय तो योजीत असतो. ५१ लौकिक पाहून त्याला उद्वेग उत्पन्न होतो. देहाचा व गृहाचा कंटाळा येतो. एकांतांत आनंद वाटतो. तो द्वैताची संगति धरीतच नाहीं. ५२ मला कोणीं पाहूं नये, मला कोणीं ओळखूं नये, मला कोणीं लाजूं नये, अशीच तो मनापासून इच्छा करीत असतो. ५३ चोर पाठीस लागले म्हणजे त्या संकटांत धनिक ज्याप्रमाणें लपतो, त्याप्रमाणें शिष्य आपला मान होत आहे असें पाहून देहाचा सन्मान होईल, या भीतीनें एकांतांत जाऊन लपतो. ५४ 'मी एक कोणी तरी आहें' असें लोकांना कळूं नये, अशा स्थितींत तो रहातो. त्यामुळेंच त्याला मान सहन होत नाहीं. ५५ लौकिक सन्मान झाला असतां अहंकार दृढ होईल, यास्तव अहं-ममता सोडण्यासाठीं तो सर्वथा मानाकडे पहात नाहीं. ५६ ज्याच्या मनांत अभिमान प्रबळ असतो तो सदा सन्मानाची इच्छा करितो. परंतु ज्याला अभिमान सोडावयाचा आहे, तो मान-अपमानांकडे ढुंकूनहि पहात नाहीं. ५७ एकदां सन्मान स्वीकारिला कीं मग अपमान सहन

॥ ५७ ॥ जेणें घेतला सन्मान । त्यासी नेघवे अपमान । तेथ सहजें आला देहाभिमान । यालागीं सन्मान नावडे ॥ ५८ ॥ सन्मानु घ्यावया तत्त्वतां । ज्ञातेपण मिरवी ज्ञाता । ते संधीं वसे ममता । अर्थस्वार्थाचेनि लोभें ॥ ५९ ॥ एवं नापेक्षी सन्मान । हें प्रथम शिष्याचें लक्षण । आतां निर्मत्सरत्व संपूर्ण । तें सुलक्षण परियेसीं ॥१६० ॥ सज्ञानामाजीं वैर । ज्ञातृत्वाचाचि मत्सर । तेथें देहाभिमानें केलें घर । अतिदुस्तर जीवासी ॥ ६१ ॥ ज्ञानाभिमानाची गोष्टी । वेंचूनि तपाचिया कोटी । दुजी करीत होता सृष्टी । अभिमान पोटीं ज्ञानाचा ॥ ६२ ॥ ज्ञानाभिमानु दुर्वासासी । व्यर्थ शापिलें अंबरीषासी । म्यां सोशिलें गर्भवासासी । ज्ञानाभिमानासी भिऊनी ॥ ६३ ॥ ज्ञानाभिमानु ब्रह्मयासी । नेलें गोपालवत्सांसी । मज होणें पडिलें त्या वेषांसी । ज्ञानाभिमानासी भिऊनी ॥ ६४ ॥ उद्धवा ज्ञानाभिमान । सर्वां अभिमानांमाजीं कठिण । वसिष्ठ विश्वामित्र जाण । ज्ञानाभिमानें भांडती ॥ ६५ ॥ एवं ज्ञानाभिमानाभेण । म्यां घेतलें गोवळपण । मज मूर्ख म्हणती याज्ञिक ब्राह्मण । त्यांसी ज्ञानाभिमान कर्माचा ॥ ६६ ॥ मुख्य माझीच हे ऐशी दशा । तेथें इतरांचा पाड कायसा । ज्ञानाभिमानाचा दृढ फांसा । नुगवे सहसा ज्ञात्यासी ॥ ६७ ॥ ज्ञानाभिमानाची जाती कैशी । उभा न ठाके मूर्खापाशीं । वैर लावी सज्ञानासी । समत्सरेंसीं वर्तवी ॥ ६८ ॥ एवं निर्मत्सर होणें ज्यासी । तेणें सांडावें ज्ञानाभिमानासी । येरवीं तो ज्ञातयासी । समत्सरेंसीं नांदवी ॥ ६९ ॥ ऐक मत्सराची सामग्री । देहीं देहाभिमान दृढ करी । तोही ज्ञातेपणाचें बळ धरी । लोभ माझारीं अर्थस्वार्थें ॥ १७० ॥ इतुकी सामग्री जेथें होये । तोचि समत्सर द्वेषु वाहे । शुद्ध शिष्य हें न साहे । त्यागोनि जाये मत्सरू ॥ ७१ ॥ मत्सराची जाती कैशी । अवश्य वसे ज्ञात्यापाशीं । मत्सरू थोर पंडितांशीं । यावज्जन्मेंसीं न संडिती ॥ ७२ ॥ पंडित भेटती

होत नाहीं. तेथें सहजच देहाभिमान उत्पन्न होतो. यासाठीं त्याला सन्मान आवडत नाहीं. ५८ वास्तविक सन्मान होण्याच्या इच्छेनेंच ज्ञाता आपलें ज्ञातेपण मिरवीत असतो. त्याच्या संधींत स्वार्थाच्या लोभानें ममता रहाते. ५९ सारांश सन्मानाची अनपेक्षा हेंच शिष्याचें पहिलें लक्षण आहे. आतां निर्मत्सराचें लक्षण सविस्तर ऐक. १६० ज्ञातृत्वाच्या मत्सरामुळें सज्ञान लोकांतहि परस्परांविषयीं वैर उत्पन्न होतें. त्यांच्या ठिकाणींहि देहाभिमान घर करितो. त्याला जिंकणें जीवाला अति कठीण जातें. ६१ ज्ञानाभिमानाची गोष्ट काय सांगावी ! विश्वामित्रानें आपलें अपार तप खर्चीं घालून प्रतिसृष्टि निर्माण केली. इतका त्याच्या मनांत ज्ञानाचा अभिमान होता. ६२ दुर्वास ऋषीनें ज्ञानाभिमानानेंच अंबरिषाला शाप दिला आणि मीं ज्ञानाभिमानाला भिऊनच गर्भवास सोसले. ६३ ब्रह्मदेवानें ज्ञानाभिमानानें गोपाल व वत्सें यांचें हरण केलें..तेव्हां मला ज्ञानाभिमानाला भिऊन त्यांचें रूप घेऊन रहाणें भाग पडलें. ६४ हे उद्धवा ! सर्व अभिमानांत ज्ञानाभिमान फार कठिण आहे. वसिष्ठ व विश्वामित्र यांचें ज्ञानाभिमानामुळेंच भांडण जुंपलें. ६५ अशा या ज्ञानाभिमानाच्या भीतीनें मी गवळ्याचा वेष घेतला; पण याज्ञिक ब्राह्मण मला मर्ख म्हणतात. त्यांना आपल्या कर्माचा ज्ञानाभिमान आहे. ६६ माझीच जर ही स्थिति तर मग इतरांची काय कथा त्यांना ज्ञानाभिमानाचा बिकट फांस उकलतां येत नाहीं. ६७ ज्ञानाभिमान्याचें लक्षण कसें आहे, पहा ! तो मूर्खापाशीं कधीं उभासुद्धां रहात नाहीं, पण सज्ञान लोकांत वैर उत्पन्न करून त्यांना मत्सरानें वागावयास लावितो. ६८ सारांश, ज्याला मत्सरहित व्हावयाचें असेल त्यानें अगोदर ज्ञानाभिमान सोडला पाहिजे ! नाहीं तर तो सज्ञान लोकांनाहि मत्सरानेंच वागवितो. ६९ आतां मत्सराची सामग्री ऐक. तो शरीरावरील देहाभिमान दृढ करितो आणि ज्ञातेपणाचा गर्व वहातो. त्यांत द्रव्यलोभानें स्वार्थ शिरतो. १७० इतकी सामग्री जेथें जमते, तेथेंच मत्सर व द्वेष प्रवृत्त होतो. पवित्र शिष्य हें सहन करीत नाहीं. तो मत्सर सोडून देतो. ७१ मत्सराचें लक्षण कसें असतें, ते ऐक. विद्वान् लोकांत तो अवश्य असतो. मोठमोठ्या पंडितांना तर मत्सर जन्मभर सोडीत नाहीं. ७२ मत्सरयुक्त पंडित एकमेकांना भेटतात, परस्परांपुढें नम्र होतात व प्रशंसा करितात. गोड बोलतात. पण त्यांच्या

समत्सर । लवण भजन अतिनम्र । बोलती अतिमधुर । समत्सर छळणोक्तीं ।। ७३ ।। मत्सरें पंडित येती क्रोधा । असदारोपणें करिती निंदा । एवढी मत्सराची बाधा । नातळे कदा सच्छिष्यु ।। ७४ ।। मत्सरू ज्ञात्यातें न सोडी । मा इतर काइसीं बापुडीं । सच्छिष्य द्वेषाची गोष्टी सोडी । मत्सरू तोडी सर्वस्वें ।। ७५ ।। मत्सर सांडोनि तत्त्वतां । शिष्यें रहावें सर्वथा । निर्मत्सरतेची कथा । ऐक आतां सांगेन ।। ७६ ।। पुढूनि स्वार्थु नेतां । द्वेष उपजों नेदी चित्ता । भूतीं भगवंतू भावितां । द्वेषु सर्वथा येवों नेदी ।। ७७ ।। निंदेचिया वाग्बाणीं । दारुण विंधिल्या दुर्जनीं । द्वेषु उपजों नेदी मनीं । हित मानी निंदेचें ।। ७८ ।। जेणें जेणें निजनिंदा केली । तो तो मानी हित माउली । पापमळांची क्षाळणा झाली । शुद्ध केली माझी वृत्ति ।। ७९ ।। ऐसऐशिया विवंचना । द्वेष आतळों नेदी मना । निर्मत्सरता ते हे जाणा । दुसरी लक्षणा शिष्याची ।। १८० ।। यावरी जे दक्षता । तेही तुज सांगों आतां । शिष्याची प्रगल्भता । निजिस्वार्थालागोनी ।। ८१ ।। उगवल्या सावधानभास्करा । नाशी निद्रेतंद्रेच्या अंधारा । होय धारणेचा दिवसु खरा । धृतीच्या दुपारा वर्ततु ।। ८२ ।। त्या दिवसाचेनि लवलाहें । शमदमादि समुदायें । भक्तिपंथें चालताहे । मार्गीं न राहे क्षणभरी ।। ८३ ।। तेथ उचलतां पाउलीं । निजबोधाची पव्हे ठाकिली । जेथ पांथिकांची निवाली । तृषा हरली तृष्णेची ।। ८४ ।। तेथ निजग्रामींचे भेटले । सोहंसांगाती एकवटले । तेथूनि चुकणया मुकले । नीट लागले निजपंथीं ।। ८५ ।। ऐकें बापा विचक्षणा । आळस विलंबू नातळे मना । त्या नांव ' दक्षता ' जाणा । तिसरी लक्षणा

मनांत मत्सर असल्यामुळें तें सर्व कपटाचरणच असतें. ७३ मत्सरामुळें पंडितांना मोठा क्रोध येत असतो. ते परस्परांवर खोटे आरोप करून निंदा करितात. ही मत्सराची बाधा सच्छिष्याला बाधत नाहीं. ७४ पंडितांना जर मत्सर सोडीत नाहीं, तर मग इतर बिचाऱ्या सामान्य जनांची काय कथा ! सच्छिष्य द्वेषाची वार्ताच सोडून देतो व मत्सर सर्वस्वी तोडून टाकितो. ७५ शिष्यानें सर्वथा मत्सर टाकून रहावें. निर्मत्सर कसें व्हावें, तें आतां सांगतों, ऐक. ७६ आपल्या पुढला स्वार्थ जरी कोणीं नेला तरी तो मनांत द्वेष उत्पन्न होऊं देत नाहीं. सर्व भूतांमध्यें भगवंताची भावना ठेवून तो मनांत द्वेष उत्पन्न होऊं देत नाहीं. ७७ दुर्जनानें निंदेच्या वाग्बाणांनीं कठोर प्रहार जरी केला, तरी मनांत द्वेष उपजूं न देतां तो निंदा हेंच आपलें हित मानितो. ७८ ज्यानें ज्यानें आपली निंदा केली, त्याला तो आपली हितकर्ती माउली समजतो. कारण 'त्यांनीं पापरूपी मळ धुवून टाकून माझी वृत्ति शुद्ध केली,' असें तो मानितो. ७९ असा विचार करून द्वेषाचा स्पर्शहि मनाला होऊं देत नाहीं. निर्मत्सरता ती ही आहे. हें शिष्याचें दुसरें लक्षण आहे. १८० याच्या पुढलें लक्षण दक्षता, म्ह० गुरूनें सांगितलेल्या गोष्टीविषयीं तत्परता. तेंहि तुला आतां सांगतों. आपलें हित साधण्यासाठीं शिष्यानें सदा जागरूक असणें हीच दक्षता आहे. ८१ एकाग्रचित्तरूपी सूर्याचा उदय झाला असतां निद्रा-तंद्रारूपी अंधार नाश पावतो. धारणा म्हणजे मनाला अभ्यासापासून ढळूं न देणें. धारणारूपी दिवस उगवतो. धृतिरूपी दुपार होते. ८२ असा दिवस उगवतांच शम-दमादिकांचा समुदाय गडबडीनें भक्तिमार्गानें चालूं लागतो. वाटेंत क्षणभरहि थांबत नाहीं. (मनाची एकाग्रता हाच सूर्य, अशी कल्पना करून धारणा हाच दिवस व धृति म्ह० निश्चय हीच दुपार म्हटली आहे. दुपारीं सूर्य प्रखर असतो व निश्चय दृढ असला कीं, मन व्यग्र होत नाहीं. शम-दमांनीं युक्त असलेला पुरुष अशी धारणा धरूं लागला कीं, त्याला आत्मबोध होतो व 'देहच मी' हा भ्रम दूर होऊन 'सोहं'चा अनुभव येतो.) ८३ तेथें प्रत्येक पावलागणिक आत्मज्ञानाची पाणपोयी घातलेली असते, ती केवल प्रवाशांचीच तहान भागविते असें नाहीं, तर तृष्णेची तृषाच शांत करिते. ८४ त्या मार्गांत आपल्याच गांवचे शुद्ध ब्रह्मज्ञानी सोबती भेटले व ते सर्व 'सोहं' या भावनेनें एक झाले म्हणजे चुकण्याची भीतीच उरत नाहीं. ते सरळ आपल्या मार्गाला लागतात. ८५ हे चतुर उद्धवा ! ऐक. आळस व विलंब यांचा मनाला स्पर्शहि होऊं न देणें यालाच ' दक्षता ' असें म्हणतात. हें शिष्याचें तिसरें लक्षण झालें. ८६ त्यांच्या पदरीं संचित कर्माचा जो फार जुना संग्रह असतो त्यावरील आसक्ति तो टाकून

शिष्याची ॥ ८६ ॥ जुनाट संग्रहो सर्वै होतां । ते सर्व सांडिली ममता । सांडिल्याची खंती मागुता । न करी सर्वथा निजबोधें ॥ ८७ ॥ देहीं दृढ धरावी अहंता । तेणें देहसंबंधाची ममता । देहाभिमानु नातळे चित्ता । गेली ममता न लगतां ॥ ८८ ॥ देह नश्वरत्वें देखिला । विष्ठामूत्रांचा मोदळा । यालागीं अहंकारू गेला । सोहं लागला दृढभावो ॥ ८९ ॥ दृढ वाढवूनि सोहंता । तेणें सांडविली अहंममता । हे चौथी गा अवस्था । जाण तत्त्वतां शिष्यासी ॥ १९० ॥ गुरु माता गुरु पिता । गुरु गणगोत तत्त्वतां । गुरु बंधू सुहृदता । निजस्वार्थी शिष्याच्या ॥ ९१ ॥ गुरुपरिचर्या नित्यकर्म । गुरुसेवा हाचि स्वधर्म । गुरु तोचि आत्माराम । सुहृदसंभ्रम सद्गुरूसी ॥ ९२ ॥ ऐसें सद्गुरूसी सुहृद्पण । असावें शिष्यासी संपूर्ण । हें पांचवें गा लक्षण । सत्य जाण उद्धवा ॥ ९३ ॥ चंचळत्वें चळू चित्ता । येवों नेदीच सर्वथा । निर्जी निजरूपनिश्चळता । साधी सर्वथा सर्वस्वें ॥ ९४ ॥ जऱ्ही चंचळ झालें अंग । चित्त गुरुचरणीं निश्चळ चांग । अंगीं वाजतां लगबग । वृत्ति अभंग गुरुचरणीं ॥ ९५ ॥ शरीर वर्ततां व्यापारां । ज्याचे हृदयीं नाहीं त्वरा । गुरुचरणीं धरिला थारा । हा शिष्यु खरा परमार्थी ॥ ९६ ॥ ज्यासी हृदयीं चंचळता । तो शिष्य नव्हे निजस्वार्थी । ज्याचे अंतरीं निश्चळता । तोचि परमार्थी साधकू ॥ ९७ ॥ ऐसी साधूनि निश्चळता । ज्यासी निजस्वार्थी जिज्ञासुता । तोचि क्षणार्धें परमार्था । पावे तत्त्वतां गुरुवाक्यें ॥ ९८ ॥ जैसा दीपु दीपें लाविला । लावितांचि तत्समान झाला । तैसा निश्चयेंसीं गुरु भेटला । तो तत्काळ झाला तद्रूप ॥ ९९ ॥ एवं अंतरीं जें निश्चळपण । तें शिष्याचें श्रेष्ठ लक्षण । तो सहावा गा गुण जाण । तेणें निर्दळण षड्विकारां ॥ २०० ॥ षड्विकार देहावरी । शिष्यु देहबुद्धी हातीं न धरी । यालागीं मावळिजे विकारीं । गुरुवाक्यें करीं वर्ततां ॥ १ ॥ ऐसी साध्य करूनि निश्चळता । साधूं रिघे

देतो व त्याबद्दल आत्मज्ञान प्राप्त झाल्यामुळें त्याची त्याला कधीं क्षति वाटत नाहीं. ८७ देहामध्येंच दृढ अहंता ठेविली म्हणजे देहावर ममता जडते. पण देहाभिमानानें जर चित्ताला स्पर्श केला नाहीं, तर ममता नाहींशी होते. ८८ शरीर नाशवंत आहे, तें मळ-मूत्राचें गांठोडें आहे, या दृष्टीनें त्याकडे पाहिल्यास अहंकार नाहींसा होतो व 'सोहं' म्ह० ब्रह्मच मी ही भावना दृढ होते. ८९ यास्तव 'सोहं' ही भावना दृढ करून अहंकार व ममता सोडणें हें शिष्याचें चवथें लक्षण आहे, असें निश्चयानें जाण. १९० शिष्यानें आपल्या हिताकरितां सद्गुरूलाच आपली माता, पिता, आप्त, सोयरे-धायरे, बंधु, मित्र मानावें. ९१ गुरुपूजा हेंच नित्य कर्म, गुरुसेवा हाच स्वधर्म आहे, गुरूच आत्माराम आहे व प्रेमाचा उल्हासहि सद्गुरुच आहे ९२ याप्रमाणें सद्गुरूला सुहृद् मानणें हें शिष्याचें पांचवें लक्षण आहे. असें हे उद्धवा ! तूं खात्रीनें समज. ९३ चित्ताला चंचलपणानें अस्थिरता येऊं देऊं नये. त्याला सर्व प्रकारें आत्म्यांतच स्थिर करून ठेवावें. ९४ अंग जरी चळवळ करूं लागलें तरी चित्त गुरुचरणीं निश्चल ठेवावें. विक्षेप आणणारे प्रसंग अंगावर येऊन जरी कोसळले तरी वृत्ति गुरुचरणांकडे अढळ ठेवावी. ९५ शरीर जरी इतर व्यवहार करीत असलें तरी ज्याचें चित्त चंचल होत नाहीं, तर तें गुरुचरणांचा आश्रय करून रहातें, तोच खरा परमार्थी शिष्य होय. ९६ ज्याच्या मनांत चंचळपणा आहे तो शिष्य स्वहित साधणारा नव्हे. ज्याचें चित्त निश्चल असतें तोच खरा परमार्थाचा साधक होय. ९७ ज्याला स्वहित साधण्याची इच्छा असते तो चित्त निश्चल करून गुरुवाक्यानें क्षणार्धांत निश्चित परमार्थ मिळवितो. ९८ एका दीपानें जसा दुसरा दीप लावतांच तो जसा त्याच्याचसारखा प्रकाश देतो, त्याचप्रमाणें निश्चलपणानें सद्गुरु भेटतांच शिष्य तद्रूप होतो. ९९ सारांश अंतःकरणाचा निश्चलपणा हें शिष्याचें श्रेष्ठ लक्षण आहे. हा सहावा गुण आहे. यानें षड्विकारांचा नाश होतो, असें समज. २०० देहाला षड्विकार असतात, परंतु शिष्य देहबुद्धीला स्पर्शहि करीत नाहीं. म्हणून गुरुवाक्याप्रमाणेंच वागत असतां त्याचे सर्व विकार मावळतात. १ असा निश्चलपणा साध्य करून व अर्थजिज्ञासा मनांत धरून जो परमार्थ

जो परमार्थी । धरोनियां अर्थजिज्ञासुता । होय भजता गुरुचरणीं ॥ २ ॥ ज्यासी अर्थजिज्ञासा नाहीं । तो भजेना गुरूच्या ठायीं । जरी भजेल कंहीबहीं । तरी स्वार्थे पाही विषयाच्या ॥ ३ ॥ सांडोनियां विषय-स्वार्था । इत्थंभूत जाणावया अर्था । जो भजे परमार्था । 'जिज्ञासुता' त्या नांव ॥ ४ ॥ ऐसी धरोनि जिज्ञासुता । चढती आवडी परमार्था । आराणुक नाहीं चित्ता । निजस्वार्थाचेनि लोभें ॥ ५ ॥ अतिप्रीती परमार्था । चढती वाढती आस्था । हे सातवी लक्षणता । जाण तत्त्वतां शिष्याची ॥ ६ ॥ हे सातवी लक्षणा । परमार्थाचे अंगवणा । पावली असे जाणा । जिज्ञासुपणाचेनि नेटें ॥ ७ ॥ गुरु बहुतांची साउली । शिष्यवर्गांची माउली । तेथ असूया जेणें केली । त्याची बुडाली निजप्राप्ती ॥ ८ ॥ यालागीं जो जो गुरूचा अंकितु । तो तो गुरुत्वेंचि मानितु । असूया नाठवे मनांतु । अतिविनीतु सर्वांसी ॥ ९ ॥ गुरुबंधु कनिष्ठ दीन । त्याच्या ठायीं उत्तम गुण । जाणोनि न मनी आपण । असदारोपण तेथें करी ॥ २१० ॥ पुढिलांचा उत्तम गुण । त्यासी मिथ्या लावूनि दूषण । लटिकें म्हणे त्याचें ज्ञान । 'असूया' जाण त्या नांव ॥ ११ ॥ प्रत्यक्ष भेटल्या वर्णी गुण । नम्र होवोनि वंदी चरण । सवेंचि मागें करी छळण । 'असूया' संपूर्ण या नांव ॥ १२ ॥ सच्छिष्यु ये अर्थी निर्मळ । हों नेदी असूयेचा विटाळ । उत्तम मध्यमप्राकृतमेळ । वंदी परी छळ करूं नेणे ॥ १३ ॥ गुरूनें शिकविली वस्तुसमता । तेथ निरंतर ठेवूनि चित्ता । समभावें वंदी समस्तां । छळूं सर्वथा तो नेणे ॥ १४ ॥ यापरी गा उद्धवा । छळूं नेणे कोणा जीवा । हा अनुसूयु म्हणावा । गुण आठवा शिष्याचा ॥ १५ ॥ हे अष्टौमहामणिमाळी । अखंड ज्याच्या हृदयकमळीं । तो पावे सद्‌गुरुजवळी । नवी नव्हाळी भेटीची ॥ १६ ॥ यावरी नववें लक्षण । तें जाण नवविधान । सत्यधूत संभाषण । वाग्विलापन सांडूनि ॥ १७ ॥ सद्‌गुरूप्रति जाण । मृदु विनीत

साधावयास निघतो तो गुरुचरणांचा सेवक होतो. २ ज्याला शास्त्रार्थ जाणण्याची इच्छा नाहीं तो गुरूचें भजन कधींहि करीत नाहीं व त्यानें जरी भजन कसें-बसें केलें तरी तें विषयासक्तीच्या दृष्टीनेंच करितो. ३ विषयांचा स्वार्थ सोडून तत्त्वतः आत्मबोध जाणण्याच्या इच्छेनें जो परमार्थ करितो, त्यालाच 'जिज्ञासुत्व' असें म्हणतात. ४ अशी जिज्ञासा मनांत ठेवून परमार्थाविषयीं अधिक अधिक आवड वाढली असतां स्वार्थाच्या लोभानें त्याच्या चित्ताला समाधान होत नाहीं. ५ परमार्थाविषयीं अत्यंत प्रीति व अधिक अधिक आस्था हें शिष्याचें सातवें लक्षण समज. ६ हें सातवें लक्षण जिज्ञासुत्वाच्या तांतडीनें परमार्थाच्या सामर्थ्यास प्राप्त झालें आहे. ७ सद्‌गुरु ही पुष्कळांना सांवलीच आहे. त्याच्या शिष्यवर्गाची ती साक्षात् माताच आहे. अशा सद्‌गुरूची ज्यानें असूया केली, त्याची आत्मप्राप्ति बुडाली. ८ यास्तव जेवढे गुरूचे एकनिष्ठ भक्त असतील त्या सर्वांस जो गुरूच्याच दृष्टीनें पहातो, त्याच्या मनाला मत्सर स्पर्शहि करीत नाहीं. तो सर्वांशीं अतिनम्र असतो. ९ एखादा गुरुबंधु कमी प्रतीचा व दीन जरी असला तरी त्याच्या ठिकाणीं तो उत्तम गुणांचा आरोप करितो. 'मी त्याच्याहून श्रेष्ठ आहे,' असें तो कधींच मानीत नाहीं. २१० दुसऱ्याच्या अंगच्या उत्तम गुणाला दोष लावून त्याचें ज्ञान खोटें आहे, असें म्हणणें याला 'असूया' असें नांव आहे. ११ समक्ष भेटलें असतां त्याच्या गुणाची स्तुति करावयाची, त्याच्यापुढें नम्र होऊन त्याच्या चरणांना वंदन करावयाचें व लगेच त्याच्यामागें त्याची निंदा करावयाची, याला असूया म्हणतात. १२ सच्छिष्याचें वर्तन याविषयीं फार शुद्ध असतें. तो स्वतःला असूयेचा विटाळहि होऊं देत नाहीं. उत्तम, मध्यम व कनिष्ठ यांच्या समुदायाला सारखेंच वंदन करितो. त्यांचा छळ करणें, त्याला कधीं ठाऊकच नसतें. १३ गुरूनें त्याला सर्वत्र परमात्म्याचें साम्य शिकविलेलें असतें. तें मनांत वागवून तो सर्वांना समत्वबुद्धीनें वंदन करितो. छळ तो कधीं जाणतच नाहीं. १४ हे उद्धवा! याप्रमाणें कोणाहि जीवाचा छळ न करणाऱ्या शिष्याचा अनसूया हा आठवा गुण जाणवा. १५ ही आठ महामण्यांची माळ ज्याच्या हृदयकमलावर रुळत असते तो तत्काल सद्‌गुरूला प्राप्त होतो. त्याच्या भेटीचा नवेपणा काय सांगावा! १६ याच्या पुढलें जें नववें लक्षण तोहि नवाच प्रकार आहे. निष्फळ बडबड सोडून सत्य व पवित्र भाषण करावें. १७ सद्‌गुरूला नम्रतेनें मृदु प्रश्न करावा व गुरुवचन श्रद्धेनें

करी प्रश्न । सत्याचें सत्य तें गुरुवचन । मानी जाण निजभावें ॥ १८ ॥ युक्ति वाढवून उदंड । नाना मतें अकांड तांड । साह्य संचरूनि पाखांड । गर्जत तोंड महावादें ॥ १९ ॥ साधका बाधका युक्ती । माजीं संचरूनि छळणोक्ती । आपुली मिरवावी युक्ती । हें नाहीं चित्तीं शिष्याचे ॥ २२० ॥ सद्गुरूपुढें अतिजल्प । करणें तेंचि महापाप । हें जाणूनि सांडी वृथालाप । मिथ्या जल्प बोलेना ॥ २१ ॥ शिष्याचें बोलणें कैसें । वाचा परिपक्व अमृत जैसें । बोल घोळले प्रेमरसें । प्रश्न पुसे एकांतीं ॥ २२ ॥ मिथ्यावादाचीं अपक्व फळें । तुरटें तिखटें तोंडाळें । सदटें झडलीं पूर्वकाळें । बोले प्रांजळें परिपक्व ॥ २३ ॥ बोलों नेणे छळ छद्म । स्पर्शों नेणे परवर्म । बोलीं नुपजवी अधर्म । मनोधर्मक्षोभक ॥ २४ ॥ व्यर्थ न करी आशंका । निंदेलागीं तो मुका । झकवूं नेणे लोकां । बाळा मूर्खां पंडितां ॥ २५ ॥ बोलों नेणे अतिकर्कश । करूं नेणे उपहास । बोलामाजीं न धरी आस । बोले नैराश्य वैराग्य ॥ २६ ॥ बोलीं बोलूं नेणे आटू । छळणोक्तीं नव्हे शठू । बहु बोलतां मानी विटू । मौननिष्ठ होऊनि राहे ॥ २७ ॥ वाद विवाद अतिवाद । नावडे कोणाचा संवाद । न करी बोलाचा विनोद । लौकिक शब्द न बोले ॥ २८ ॥ वक्रोक्ति नाहीं जाण । बोलीं न बोले विंदाण । करूं नेणे प्रतारण । मिथ्या वचन न बोले ॥ २९ ॥ पोटीं कार्य नाहीं करणें । हो हो म्हणवूनि झकविणें । हेंही नाहीं तया बोलणें । सदा पठणें हरिनाम ॥ २३० ॥ पश्चिमद्वारींचें कवाड । सदा वारेनि करी खडखड । तैशी न करी बडबड । वृथा तोंड पिटीना ॥ ३१ ॥ करितां शब्दब्रह्मसंवादु । युक्तिबाधें विद्वांसा क्रोधु । अनिवार देखोनि बाधु । न बोले शब्दु शाब्दिक ॥ ३२ ॥ न मिरवी शब्दज्ञान । न दाखवी आत्ममौन । न धरी वचनाभिमान । सदा स्मरण गुरूचें

सत्यांतीलहि सत्य मानावें. १८ अनेक वाद-विवाद, आरडा-ओरड करून अनेक मतांचें प्रतिपादन करण्यासाठीं पाखंडाचें साह्य घेऊन महावादानें तोंड वाजवीत बसणें, १९ साधक-बाधक युक्तींमध्यें छळवादाचा संचार करून आपलेंच मत मिरवणें, हें शिष्याच्या कधीं मनांतहि येत नाहीं. २२० सद्गुरूपुढें फाजिल बडबड करण्यांतहि महापाप आहे, असें जाणून तो व्यर्थ बोलणें सोडून देतो, वायफळ भाषण करीत नाहीं. २१ शिष्याचें बोलणें कसें असतें, तें ऐक. तो वाणीनें जणुंकाय परिपक्व अमृताचा स्राव करीत असतो व त्याचे शब्द जणुंकाय प्रेमरसांतच घोळलेले आहेत, असें वाटतें. तो अशा वाणीनें एकांतांत गुरूला प्रश्न विचारितो. २२ मिथ्यावादाचीं कच्चीं फळें तुरट, तिखट, दाठरलेलीं व झडून पडलेलीं अशीं असतात. पण हा प्रांजल व परिपक्व भाषणच करितो. २३ कपटी व मर्मभेदक भाषण करावयाचें त्याला कळत नाहीं. दुसऱ्याचें वर्म तो कधीं उच्चारीतहि नाहीं. दुसऱ्याच्या मनोवृत्ति क्षुब्ध करणाऱ्या अधर्माच्या गोष्टी तो केव्हांहि बोलत नाहीं. २४ व्यर्थ शंका काढीत नाहीं. निंदा करण्याचा प्रसंग आल्यास तो अगदीं मुका होऊन बसतो, लहान बालक, मूर्ख किंवा पंडित या कोणासहि फसविण्याचें त्याला ठाऊकच नसतें. २५ तो कधीं कर्कश वाणी उच्चारीत नाहीं, कोणाचा उपहास करीत नाहीं. आपण पुष्कळ बोलावें अशीहि इच्छा तो धरीत नाहीं व जें बोलावयाचें तें वैराग्यपूर्णच बोलतो. २६ त्याला अर्थहीन कोरडें लाघव करितां येत नाहीं. शठासारखें छलयुक्त भाषण करितां येत नाहीं. पुष्कळ बोलण्याचा तो वीट मानितो. तो मौन धरून रहातो. २७ त्याला वाद-विवाद, वितंडवाद, संवाद करणें आवडत नाहीं. तो थट्टेचें भाषणहि करीत नाहीं व लौकिक शब्द बोलत नाहीं. २८ वांकडा शब्द त्याला ठाऊक नसतो. त्याच्या बोलण्यांत कपट नसतें. तो प्रतारणा करीत नाहीं व खोटें बोलत नाहीं. २९ मनांतून एखादें काम करावयाचें नसलें तरी वरून 'हो हो,' म्हणून एखाद्याला झुलवून अखेर तोंडघशीं पाडणें हेंहि तो कधीं जाणत नाहीं. तो निरंतर हरिनामाचा पाठ करीत असतो. २३० वारा नेहमीं पश्चिमेकडून वहात असतो. त्यामुळें पश्चिमेकडील दार उघडें ठेविलें कीं, वाऱ्यानें त्याचा सारखा खड-खड आवाज होत असतो, त्या दाराप्रमाणें तो तोंड वाजवून व्यर्थ बडबड करीत नाहीं. ३१ शब्दब्रह्माचा संवाद करीत असतां व त्यांच्या मताशीं विरोध आला असतां पंडितांना अनिवार क्रोध येत असतो, हें जाणून तो शाब्दिक वाद घालीत नाहीं. ३२ शब्दज्ञानाची प्रौढी मिरवीत नाहीं किंवा आपलें मौनहि दाखवीत नाहीं. तो आपल्याच बोलण्याचा अभिमान धरीत नाहीं, सदा-सर्वदा सद्गुरूचें स्मरण करीत

॥ ३३ ॥ बोले नुपजवी उद्वेग । बोलावया न करी उद्योग । बोलीं नुठवी महावेग । अनुद्वेग बोलणें ॥ ३४ ॥ सत्य आणि अतिमधुर । आइकतां आल्हादकर । सर्वांसी हितत्वें साचार । बोले सनागर हरिकथा ॥ ३५ ॥ प्रार्थूनियां सद्‌गुरूसी । बहु बोलणें नाहीं त्यासी । पुसणें एकाक्षरासी । निजसुखासी सेवावया ॥ ३६ ॥ एवं शिष्याचीं नव लक्षणें । नवखंड पृथ्वीचीं आभरणें । निजकृपेनें नारायणें । भक्ताकारणें दीधलीं ॥ ३७ ॥ हे नवरत्नमाळा गोमटी । जो घाली सद्‌गुरूच्या कंठीं । तो बैसे सायुज्याच्या पटीं । उठाउठी तत्काळ ॥ ३८ ॥ या नवरत्नांचें पदक । ज्या शिष्याचे हृदयीं देख । तो सद्‌गुरूचा आवश्यक । विश्वासिक सर्वार्थी ॥ ३९ ॥ या नवरत्नांची अभिन्न गांठी । जो सद्‌गुरूसी आणी भेटी । तो स्वराज्याच्या मुकुटीं । झळकत उठी महामणी ॥ २४० ॥ उद्धवा येथें आशंका धरिसी । नांदतां स्त्रीपुत्रधनधान्येंसीं । निर्ममता शिष्यासी । कैसेनि त्यासी उपजवी ॥ ४१ ॥

जायापत्यगृहक्षेत्रस्वजनद्रविणादिषु । उदासीनः समं पश्यन् सर्वेष्वर्थमिवाऽऽत्मनः ॥ ७ ॥

येविखीं सादर ऐक । शिष्य निरसावया निजदुःख । पावावया आत्मसुख । साधी विवेकसाधनें ॥ ४२ ॥ विचारितां आत्मसुख । सर्व देहीं समान देख । विजातीय स्त्रीपुरुषवेष । सुखविशेष तेथ नाहीं ॥ ४३ ॥ पाहें पां स्त्रीपुरुषदेहीं । आत्मा आत्मी हें तंव नाहीं । आत्मसुख आपुल्या ठायीं । असे पाहीं स्वतःसिद्ध ॥ ४४ ॥ सुखाचिलागीं सर्वथा । झोंबती प्रपंचपदार्था । ज्यासी गुरुवाक्यें आलें हाता । अद्वैतता

असतो. ३३ आपल्या भाषणानें संताप उत्पन्न करीत नाहीं व बोलण्याचाहि प्रयत्न करीत नाहीं. आवेशानें भाषण करीत नाहीं. उद्वेग न होईल असें बोलतो. ३४ सत्य, अतिशय मधुर, ऐकण्यास आल्हादकारक, सर्वांना हितकर अशी गोड हरिकथा तो सांगतो. ३५ सद्‌गुरूची प्रार्थना करितांनाहि तो जास्त बोलत नाहीं. आत्मस्वरूपाचा अनुभव घेण्यासाठीं तो फक्त ' ॐ ' या एका अक्षराविषयींच विचारितो. ३६ याप्रमाणें भक्ताचीं हीं नऊ लक्षणें म्हणजे जणुंकाय नवखंड पृथ्वीचीं नऊ भूषणेंच भगवानानें कृपाळु होऊन भक्तासाठीं दिलीं आहेत. ३७ ही सुंदर नवरत्नांची माळ जो सद्‌गुरूच्या गळ्यांत घालितो तो तत्काळ जागच्याजागीं सायुज्य मुक्तीच्या पदाला पोंचतो. ३८ या नवरत्नांचें पदक ज्या शिष्याच्या हृदयावर झळकत असतें त्याच्यावर सर्वप्रकारें सद्‌गुरूचा विश्वास असतो. ३९ ही नवरत्नांची कधीं न तुटणारी माळ जो सद्‌गुरूला भेट देतो तो महामणि आत्मस्वरूपाच्या साम्राज्यमुकुटावर नेहमीं झळकत रहातो. २४० उद्धवा ! येथें तूं अशी शंका घेशील कीं, स्त्री-पुत्र, धन-धान्य यांसहित असलेल्या शिष्याला निर्ममता कशी प्राप्त होईल ! २४१.

—'अहोपण आपल्या स्त्री-पुत्रादिकांविषयीं ममताशून्य कसें व्हावें ' असें उद्धव विचारील म्हणून भगवान् औदासीन्याला कारण होणारा विवेक दाखवितात—

जायापत्यगृहक्षेत्रस्वजनद्रविणादिषु उदासीनः–स्त्री, पुत्र, गृह शेत, आप्त व द्रव्यादि यांविषयीं उदासीन होऊन, आत्मनः अर्थं सर्वेषु समं इव पश्यन्–आपलें प्रयोजन सर्व ठिकाणीं जणुंकाय सारखेंच आहे असें पहाणारा. [सर्व देहांमध्यें एकच आत्मा असल्यामुळें स्त्री-पुत्रादिकांचा देह व इतर देह यांमध्यें आत्म्याचा सुखादि स्वार्थ एकसारखाच जर आहे तर या स्त्रियादिकांच्या देहांमध्येंच इतका ममत्वाभिमान कां ? असा विचार करून व उदासीन होऊन साधकानें गुरूला शरण जावें.) ७.

याविषयीं लक्ष देऊन ऐक. आपलें दुःख घालविण्यासाठीं व आत्मसुख मिळविण्यासाठीं शिष्य विवेकाचीं साधनें साध्य करीत असतो. ४२ आत्मसुखाचा जर विचार केला तर तें सर्व देहांत समान आहे. स्त्री, पुरुष यांच्या शरीरांत जरी भेद आहे तरी दोहोंत आत्मसुख सारखेंच आहे. ४३ पुरुषाच्या देहांत आत्मा आहे व स्त्रीच्या देहांत आत्मी आहे, असा भेद मुळींच नाहीं. आत्मसुख आपल्या जागीं स्वतःसिद्धच आहे. ४४ सुखासाठींच सर्व लोक प्रपंचांतील विषयांना झोंबत असतात. परंतु गुरूपदेश ज्याच्या हातीं येतो त्याला अद्वैताची व आत्मसुखाची प्राप्ति होते. ४५

निजसुख ॥ ४५ ॥ एकपणीं निजात्मसुख । हाता आलें नित्य निर्दोख । आतां द्वैत वांछी तो अतिमूर्ख । थितें सुख नासावया ॥ ४६ ॥ प्रपंचामाजीं असतें सुख । तरी कां त्यजिते सनकादिक । द्वैत तितुकें केवळ दुःख । परम सुख अद्वैतीं ॥ ४७ ॥ हेंचि साधकीं साधूनि ज्ञान । स्त्री पुत्र स्वजन धन । त्यांसी जाले उदासीन । अद्वैतीं मन लागलें ॥ ४८ ॥ तेथ कोणाचें गृह क्षेत्र । कोण पुसे कलत्र पुत्र । धनधान्यसमृद्धि विचित्र । माझें स्वतंत्र देह न म्हणे ॥ ४९ ॥ ऐकें उद्धवा यापरी । माझे भक्त संसारीं । उदास जाले घरदारीं । तत्त्वविचारीं लिगटोनी ॥ २५० ॥ लिगटोनियां गुरुचरणीं । केली प्रपंचाची झाडणी । मग अत्यादरें गुरुभजनीं । निजसुखदानी गुरुरावो ॥ ५१ ॥ गुरुसेवेसी अत्यादर । करितां न राहे आठौ प्रहर । ठेविलें गुरुचरणीं अंतर । निरंतर निजभावें ॥ ५२ ॥ उद्धवा येथ आशंका धरिसी । जे देहावेगळें कोणे वस्तूसी । देखोनी पावला निजसुखासी । विदेहत्वासी अनुभवू ॥ ५३ ॥ देहीं असोनि विदेहता । प्रपंचीं असोनि अद्वैतता । आली शिष्याचिया हाता । तेही कथा परियेसीं ॥ ५४ ॥

विलक्षणः स्थूलसूक्ष्माद्देहादात्मेक्षिता स्वदृक् । यथाग्निर्दारुणो दाह्याद्दाहकोऽन्यः प्रकाशकः ॥ ८ ॥

स्थूलसूक्ष्मदेहांहून । आत्मा तो सर्वदा भिन्न । तेणें वेगळेपणें जाण । करी वर्तन प्रपंचीं ॥ ५५ ॥ जीव उभय देहीं वर्तता । प्राणियांसी देहातीतता । स्फुरत असे सर्वथा । तेचि तत्त्वतां नेणती ॥ ५६ ॥ म्हणे माझा डोळा दुखों लागला । परी न म्हणे मीचि दुखों

एकात्मतेनें नित्य व निर्दोष आत्मसुख प्राप्त झालें असतां जो द्वैताची इच्छा करितो तो असलेलें सुख घालविणारा महामूर्खच होय. ४६ संसारांत जर सुख असतें, तर सनकादिकांनीं तो कशाला सोडला असता ! जेवढें द्वैत तेवढें पूर्णपणें दुःखमय आहे आणि अद्वैतांत परम सुख आहे. ४७ साधकांनीं हेंच ज्ञान मिळविलें व ते स्त्री, पुत्र, आप्त, द्रव्य या सर्वांविषयीं उदासीन झाले व त्यांचें मन अद्वैतांत रंगलें. ४८ तेव्हां घर, दार, शेत कोणाचें ! व स्त्रीपुत्रादिकांस तरी कोण विचारितो ! धन-धान्याची अनेकप्रकारें समृद्धि झाली तरी 'तीं माझीं' व हा देहहि माझा, असें स्वतंत्र आत्मा म्हणत नाहीं. ४९ हे उद्धवा, ऐक ! याप्रमाणें घरोघर माझे भक्त आत्मविचाराला चिकटून संसाराविषयीं उदासीन झाले २५० म्हणजे ते गुरुचरणाला चिकटून प्रपंच झाडून टाकितात व आत्मसुख देणाऱ्या गुरुरायाच्या भजनांत अति आदरानें तत्पर होतात. ५१ भक्त अत्यंत भक्तीनें आठहि प्रहर गुरुसेवाच करीत असतो. तो आपलें अंतःकरण सदोदित गुरुचरणींच अर्पण करितो. ५२ हे उद्धवा ! यावर तूं अशी आशंका घेशील कीं, देहाहून भिन्न अशी कोणती वस्तु पाहून त्याला आत्मसुख लाभतें व विदेहत्वाचा अनुभव येतो ! ५३ म्हणून आतां देहांत असून विदेहत्व म्ह० देहाभिमानरहित अवस्था व संसारांत असून अद्वैतत्व म्ह० जीवात्म्याचें ऐक्य शिष्याला कसें प्राप्त होतें, तो वृत्तान्त ऐक. २५४.

—अहोपण ज्याच्या ऐक्यामुळें सर्व शरीरांतील सुखादि अर्थ सम आहे असा निश्चय करावयाचा तो हा देहादिकाहून विलक्षण आत्मा कोण आहे ? उत्तर—

यथा दाह्यात् दारुणः दाहकः प्रकाशकः अग्निः अन्यः—ज्याप्रमाणें जाळण्यास योग्य असलेल्या काष्ठाहून त्याला जाळणारा व प्रकाशित करणारा अग्नि विलक्षण असतो, तथा स्थूलसूक्ष्मात् देहात् ईक्षिता स्वदृक् आत्मा विलक्षणः—त्याप्रमाणें स्थूल-सूक्ष्म देहांहून त्यांना पहाणारा स्वप्रकाश आत्मा अन्य आहे. कारण तो त्याहून विलक्षण आहे. [द्रष्टा दृश्याहून विलक्षण असतो व स्वप्रकाश जडाहून विलक्षण असतो. कारण दाहक व प्रकाश अग्नि दाह्य व प्रकाश्य काष्ठाहून विलक्षण असतो हें प्रसिद्ध आहे.] ८.

आत्मा स्थूल व सूक्ष्म देहांहून सर्वदा भिन्नच आहे. त्यामुळें तो प्रपंचांत पृथक् राहूनच व्यवहार करितो. ५५ स्थूल व सूक्ष्म या दोन्ही देहांत जीव रहात असूनहि त्याचें देहातीतत्व स्पष्ट असतें. पण लोकांना तें तत्त्वतः कळत नाहीं. ५६ 'माझा डोळा दुखतो' असें मनुष्य म्हणतो. पण 'मीच दुखत आहें' असें कोणी म्हणत नाहीं. 'माझा

आला । माझा पावोचि मोडला । परी मी मोडला हें न म्हणे ॥ ५७ ॥ यापरी देहीं वर्ततां । प्रत्यक्ष सांगे देहातीतता । हे आपुली आपणां अवस्था । न कळे भ्रांता देहभ्रमें ॥ ५८ ॥ द्रष्टा दृश्य नव्हे सर्वथा । तें जड तो चेतविता । एवं आत्म्यासी विलक्षणता । जाण तत्त्वतां या हेतू ॥ ५९ ॥ विलक्षणता दों प्रकारेंसीं । एक ते जाण द्रष्टेपणेंसीं । दुसरी ते स्वप्रकाशेंसीं । देहद्वयासी विलक्षण ॥ २६० ॥ द्रष्टा दृश्याहूनि भिन्न । तरी तो जाला म्हणसी मन । तें चार्वाकमत जाण । मनपण त्या नाहीं ॥ ६१ ॥ अकरा इंद्रियांमाजीं जाण । मन तेंही एक करण । करणत्वें त्या जडपण । आत्मा नव्हे जाण या हेतू ॥ ६२ ॥ प्रपंचीं मनाची दक्षता । तें मनपणेंचि नव्हे तत्त्वतां । जेवीं प्राणेंवीण नृपनाथा । न दिसे सर्वथा निजभाग्य ॥ ६३ ॥ शस्त्राचेनि एक घायें । छेदिले लोहार्गळसमुदाये । तें शस्त्राचें सामर्थ्य नोहे । बळ पाहे शूराचें ॥ ६४ ॥ लोहाचा लोहगोळ । अग्निसंगें जाला इंगळ । धडधडां निघती ज्वाळ । तें नव्हे बळ लोहाचें ॥ ६५ ॥ त्या लोखंडाऐसें जड मन । त्यासी चित्प्रभा प्रकाशून । प्रवृत्तीमाजीं प्रवर्तन । करावी जाण श्रेष्ठत्वें ॥ ६६ ॥ पाव्यामाजीं रागज्ञान । केल्या अतिमधुर गायन । तो पाव्याचा नव्हे गुण । कळा जाण गात्याची ॥ ६७ ॥ तैसा मनाचा जो व्यापार । तो जाण पां परतंत्र । नव्हे त्याचा तो स्वतंत्र । जड विचार मनाचा ॥ ६८ ॥ सूर्याचेनि किरणसंगें । सूर्यकांतीं अग्नि निघे । तैसें आत्म्याचेनि प्रकाशयोगें । मन सवेग वर्तत ॥ ६९ ॥ मन जडत्वें जड जाण । आत्मा स्वप्रकाशें प्रकाशघन । मन तें आत्म्याआधीन । आत्मा स्वाधीन आत्मत्वें ॥ २७० ॥ प्रत्यक्ष म्हणे माझें मन । परी मीचि मन न म्हणे जाण । यालागीं मनाहूनि आत्मा भिन्न । वेगळेपणें साक्षित्वें

पाय मोडला ' असें बोलतो. पण ' मी मोडलों ' असें बोलत नाहीं. ५७ याप्रमाणें तो देहांत असूनहि देहाहून भिन्न आहे असें प्रत्यक्ष सांगतो. परंतु ' देहच मी ' या भ्रांतीनें आपलेंच स्वरूप आपल्याला कळत नाहीं. ५८ पहाणारा दृश्यवस्तु होणार नाहीं. कारण ती वस्तु जड असते व पहाणारा चैतन्ययुक्त असतो. त्याचप्रमाणें आत्मा पहाणारा आहे व देह दृश्य आहे. तेव्हां आत्मा देहाहून भिन्न आहे हें निश्चयानें जाण. ५९ आत्म्याचें विलक्षणत्व दोन प्रकारचें आहे. एक पहाणारा साक्षी व दुसरें स्वयंप्रकाश ज्ञानरूप. त्यामुळें तो स्थूल व सूक्ष्म दोन्ही देहांहून भिन्न आहे. २६० पहाणारा दृश्यवस्तूहून भिन्न आहे. ' तर मग तो मन झाला ' असें जर म्हणशील तर तें चार्वाकाचें मत झालें. आत्म्याला मनपणा नाहीं. (चार्वाक देहालाच आत्मा मानितात. आत्मा देहाहून भिन्न नाहीं. म्हणून देह जिवंत असेपर्यंत यथेच्छ विषयोपभोग घेऊन चैन करावी. मृतदेह एकदां जाळला कीं संपलें. जीवाला पुनर्जन्म नाहीं. असें चार्वाकमत आहे.) ६१ अकरा इंद्रियांपैकीं मन हेंहि एक इंद्रियच आहे व इंद्रिय असल्यामुळें तें जड आहे, त्यामुळें तें आत्मा नव्हे. ६२ जसें राजाला स्वतःचें भाग्य प्राणावांचून कधींच दिसत नाहीं, तशी प्रपंचांत मनाची मोठी दक्षता दिसून येते. परंतु वस्तुतः तो मनाचा धर्म नव्हे. ६३ शस्त्राच्या एका प्रहारानें लोखंडाच्या अर्गळाचे तुकडे जरी केले तरी तें सामर्थ्य कांहीं शस्त्राचें नव्हे. तें शूराचें बळ आहे. ६४ लोखंडाचा मोठा गोळा अग्नींत टाकिला असतां तो तप्त होऊन त्यांतून अग्नीसारख्या ज्वाला निघतात, म्हणून ती लोखंडाची शक्ति नव्हे. ६५ तें अग्नीच्या सान्निध्यानें तप्त होतें. या लोखंडासारखेंच मन जड आहे. त्याला चित्प्रकाश आपल्या शक्तीनें श्रेष्ठत्व देऊन प्रपंचांत प्रवृत्त करवितो. ६६ मुरलीच्या योगानें अतिशय मधुर गायन केलें किंवा विविध ध्वनि काढून रागाचें ज्ञान दाखविलें, तरी तो कांहीं मुरलीचा गुण नव्हे, तें वाजविणाराचेंच कौशल्य होय. ६७ त्याचप्रमाणें मनाचा जो व्यवहार चालतो तो परतंत्र आहे, असें समज. मन स्वतंत्र नाहीं. यास्तव विचारानें पाहिलें असतां मन जडच आहे. ६८ सूर्यकिरणांचा संयोग झाला म्हणजे सूर्यकांतमण्यांतून अग्नि उत्पन्न होतो, त्याचप्रमाणें आत्म्याच्या प्रकाशामुळेंच मन तत्परतेनें वागत असतें. ६९ जडत्वामुळें मन जडच आहे व स्वयंप्रकाशत्वामुळें आत्मा प्रकाशयुक्त आहे. तेव्हां मन आत्म्याच्या अधीन आहे व आत्मा आत्मत्वानें स्वाधीन आहे. २७० आपण ' माझें मन ' असें प्रत्यक्ष बोलतों. पण ' मीच मन ' असें कांहीं बोलत नाहीं. म्हणून मनाहून आत्मा भिन्न आहे.

॥ ७१ ॥ देहद्वयाहूनि भिन्न । दृढ साधूनि आत्मज्ञान । देहात्मबुद्धीचें छेदन । केलें जाण शिष्याचें ॥ ७२ ॥ यालागीं देहात्मवादी । जे सत्य मानिती उपाधी । ते मिथ्या केली त्रिशुद्धी । शुद्ध बुद्धि ते नव्हे ॥ ७३ ॥ मनावेगळा साधिला पाहा हो । तो तूं म्हणसी पितामहो । तो देवांमध्यें श्रेष्ठ देवो । हाही संदेहो न धरावा ॥ ७४ ॥ हो कां कल्पाचिये आदी । ब्रह्मयासी मौढ्य होतें आधीं । करूं न शके स्रजनविधी । जड बुद्धि तयाची ॥ ७५ ॥ त्यासी करूनि सावधान । म्यांचि प्रकाशिलें निजज्ञान । तेव्हां तो जाला ज्ञानसंपन्न । सृष्टिस्रजन करावया ॥ ७६ ॥ नाभिकमळीं जन्मलें केवळ । ब्रह्मा माझे पोटींचें बाळ । माझ्या दोंदावरी खेळे खेळ । आत्मा केवळ तो नव्हे ॥ ७७ ॥ जितुका देवांचा समुदावो । तितुका प्रकाश्यचि पाहा हो । मी प्रकाशकु अनादि देवो । स्वप्रकाशस्वभावो आत्मा तो मी ॥ ७८ ॥ देहद्वय आणि मन । त्यांहूनि आत्मा विलक्षण । हिरण्यगर्भाहूनि जाण । विलक्षणपण आत्म्याचें ॥ ७९ ॥ हिरण्यगर्भचि परमात्मा । हेंही न घडे गा भक्तोत्तमा । मी हिरण्यगर्भाचाही आत्मा । माझी महिमा त्या कैंची ॥ २८० ॥ एवं हिरण्यगर्भउपासना । ते साधनरूपेंचि सेवना । परी केवळ आत्मपणा । न ये जाणा मायिकत्वें ॥ ८१ ॥ तेचि विलक्षणता । आणोनियां दृष्टांता । साधीतसें तत्त्वतां । भक्ताच्या हाता चढे जेणें ॥ ८२ ॥ अग्नि काष्ठामाजीं वसे । परी तो काष्ठ होऊनि नसे । मथिल्या काष्ठीं प्रकट दिसे । जाळीं उल्हासें काष्ठातें ॥ ८३ ॥ तैसा आत्मा देहीं असे । तो दोहीचि होऊनि नसे । ब्रह्मज्ञानें जेव्हां प्रकाशे । जाळी अनायासें देहभाव ॥ ८४ ॥ असोनि एके ठायीं जाण । दाह्याहूनि दाहक भिन्न । तैसें प्रकाश्याहूनि जाण । भिन्नपण स्वप्रकाशा ॥ ८५ ॥ अग्निदृष्टांतें निश्चित । आत्मयाचें निजतत्व । नित्यत्व आणि विभुत्व । असे साधित निजबोधें ॥ ८६ ॥ काष्ठाचेनि योगें अग्नीसी । जन्मनिरोधु नामरूपांसी । पावे तेवीं आत्मयासी । विकारता तैसी देहयोगें ॥ ८७ ॥

तो त्याच्या साक्षित्वानें वेगळाच असतो. ७१ स्थूल व सूक्ष्म अशा दोन देहांहून भिन्न असलेल्या आत्म्याचें ज्ञान पूर्णपणें संपादून शिष्याची देहात्मबुद्धि नाहींशी झालेली असते. ७२ यासाठीं देहात्मवादी म्ह० देहच आत्मा मानणारे उपाधीला म्ह० मायेला सत्य मानितात. पण ती सर्वथा मिथ्या आहे. तें शुद्धज्ञान नव्हे. ७३ तूं कदाचित् असें म्हणशील कीं, मनाहून वेगळा असलेला तो आत्मा ब्रह्मदेव असेल; कारण तो सर्व देवांमध्यें श्रेष्ठ आहे. पण हाहि संदेह तूं मनांत आणूं नकोस. ७४ कल्पाच्या आरंभीं जरी तो उत्पन्न झाला होता तरी तो मूढच होता. त्याला सृष्टि रचण्याचें ज्ञान नव्हतें, तो जडबुद्धि होता. ७५ मींच त्याला सावध करून आपल्या ज्ञानानें प्रकाशित केलें. तेव्हां तो सृष्टि रचण्यास ज्ञानसंपन्न झाला. ७६ ब्रह्मदेव नाभिकमलांतून जन्मला. तो केवल माझ्या पोटचें बाळ आहे, माझ्या अंगावर खेळला आहे, म्हणून तो कांहीं आत्मा नव्हे. ७७ जेवढा देवांचा समुदाय तेवढा सर्व माझ्यापासून प्रकाश मिळविणारा आहे. मी प्रकाश देणारा अनादि देव आहें. जो स्वयंप्रकाशस्वरूप तो आत्मा मी आहें. ७८ स्थूल-सूक्ष्म शरीरें व मन यांहून आत्मा वेगळा आहे. हिरण्यगर्भाहून म्ह० प्रजापतीहूनहि आत्मा भिन्न आहे. ७९ हिरण्यगर्भच परमात्मा आहे, हेंहि म्हणणें बरोबर नाहीं. हे भक्तश्रेष्ठ उद्धवा! मी हिरण्यगर्भाचाहि आत्मा आहें. माझें सामर्थ्य त्याला कोठचें येणार! २८० सारांश हिरण्यगर्भाची उपासना केवळ साधनरूपानें करावी. पण ती मायिक असल्यामुळें तिला आत्मता येणार नाहीं. ८१ तेंच आत्म्याचें विलक्षण स्वरूप भक्तांना समजावें म्हणून मी दृष्टान्त देऊन तत्त्वतः व्यक्त करितों. ८२ लांकडांत अग्नि असतो, पण तो काष्ठ होऊन रहात नाहीं. लांकुड घांसतांच तो एकदम प्रकट होतो व मोठ्या उल्हासानें त्या लांकडाला जाळून टाकितो. ८३ त्याचप्रमाणें आत्मा देहांत असतो, पण तो देह नव्हे. तो जेव्हां आत्मज्ञानानें प्रकाशतो तेव्हां देहभावालाच जाळून टाकितो. ८४ एकाच जागीं राहून जळणाऱ्या वस्तूहून जाळणारी वस्तु जशी निराळी असते, त्याचप्रमाणें प्रकाशित होणाऱ्या वस्तूहून प्रकाश देणारा स्वप्रकाश आत्मा भिन्न आहे. ८५ अग्नीच्या दृष्टान्तावरून आत्म्याचें खरें स्वरूप व्यक्त होतें. त्याचें नित्यत्व व विभुत्व आत्मबोधानें सिद्ध होतें. ८६ काष्ठाच्या योगानें अग्नीला जन्म, नाश, नाम व रूप प्राप्त होतात. त्याचप्रमाणें आत्म्यालाहि देहाच्यायोगानें विकारत्व प्राप्त होतें. २८७.

निरोधोत्पत्त्यणुबृहन्नानात्वं तत्कृतान्गुणान् । अन्तःप्रविष्ट आधत्त एवं देहगुणान्परः ॥ ९ ॥

नाना काष्ठांच्या संयोगीं । काष्ठांचे गुण अग्नीच्या अंगीं । आले दिसती प्रत्यक्ष जगीं । अग्नि ते संगीं अलिप्त ॥ ८८ ॥ काष्ठमथनें अग्नि प्रगटला । त्या नांव म्हणती उपजला । काष्ठाकारीं आकारला । लहान थोर जाला तद्योगें ॥ ८९ ॥ अग्नि काष्ठविकारवशें । त्रिकोण वर्तुळ वक्र आभासे । काष्ठाचेनि निःशेष नाशें । नाशला ऐसें मानिती ॥ २९० ॥ तैसा अज नित्य अव्ययो । त्यासी आकार-विकार-जन्म-लयो । हा देहादिसंबंधस्वभावो । मिथ्या पहा हो मानिती ॥ ९१ ॥ जें साधिलें अग्निदृष्टांतें । तें उद्धवासी न मनेल चित्तें । यालागीं निरूपण मागुतें । श्रीअनंतें मांडिलें ॥ ९२ ॥ उद्धवा तूं ऐसें म्हणसी । मूळीं सिद्धसंयोगू अग्निकाष्ठांसी । तो काष्ठधर्मु लागला अग्नीसी । हें आम्हांसी मानलें ॥ ९३ ॥ आत्मा नित्यशुद्ध अविकारी स्वांगें । जो गगनासी नातळे अंगें । त्यासी देहसंगू केवीं लागे । मग तद्योगें विकारी ॥ ९४ ॥ आत्म्यासी देहसंगु घडे । हें बोलणेंचि तंव कुडें । ऐसें न घडतेंही जरी घडे । तरी तो सांपडे देहबुद्धी ॥ ९५ ॥ जो देहबुद्धीमाजीं आला । तो केवळ देहधारी जाला । पुढें केवीं जाय त्यागू केला । ऐसा उपजला संदेहो ॥ ९६ ॥ कृष्ण म्हणे उद्धवासी । ऐशी शंका झणें धरिसी । मन घालोनि मनाचे मानसीं । या अर्थासी परियेसीं ॥ ९७ ॥ हें शब्दचातुर्यासाठीं । हाता न ये गा जगजेठी । हे माझ्या गुह्याचीही गुह्य गोठी । तुजसाठीं बोलतों ॥ ९८ ॥

—याच दृष्टान्तानें आत्म्याचें नित्यत्व, अनादित्व, विमुक्तत्व, एकत्व, इत्यादिकांचीहि सिद्धि होते, असें भगवान् सांगतात—

अंतप्रविष्टः निरोधोत्पत्त्यणुबृहन्नानात्वं तत्कृतान् गुणान् आधत्ते—ज्याप्रमाणें काष्ठामध्यें प्रविष्ट झालेला अग्नि नाश, उत्पत्ति, अणुत्व, स्थूलत्व, अनेकत्व इत्यादि काष्ठामुळें प्राप्त झालेल्या गुणांना धारण करितो, (पण तो स्वरूपतः नाशादि विकारांनीं युक्त नसतो, एवं परः देहगुणान्—त्याचप्रमाणें देहाहून अगदीं विलक्षण नित्यत्वादिरूप असलेलाहि आत्मा अनित्यत्वादि देहगुणांचा अनुभव घेतो. (अर्थात् नित्यत्वादि धर्मांनींहि परमात्म्याला देहाहून वैलक्षण्य असल्यामुळे तो देहाहून भिन्न आहे.) ९.

अनेक प्रकारच्या लांकडांचा संयोग झाला असतां त्या लांकडाचा गुण अग्नींत आलेला जरी प्रत्यक्ष दिसत असला तरी अग्नि त्यापासून अलिप्तच असतो. ८८ काष्ठ एकावर एक घांसल्यानें त्यांत असलेला अग्नि प्रकट होतो. पण आपण ' अग्नि उत्पन्न झाला ' असें म्हणतों. त्याला काष्ठासारखा आकार येतो व त्यामुळें तो लहान-मोठा झालेला दिसतो. ८९ अग्नि काष्ठाच्या आकाराप्रमाणें त्रिकोणी, वाटोळा, वांकडा असलेला भासतो व काष्ठ पुरतेपणीं जळून गेलें म्हणजे अग्नीहि गेला असें आपण मानितों. २९० त्याचप्रमाणें आपण अज, अव्यय, नित्य असलेल्या आत्म्यावर आकार, विकार, जन्म, नाश, इत्यादि सर्व देहसंबंधी गुणांचा खोटाच आरोप झालेला मानितों. ९१ अग्नीच्या दृष्टान्तानें जें सांगितलें तें उद्धवाच्या मनाला बरोबर पटलें नाहीं. म्हणून श्रीअनंतानें तेंच निरूपण पुनः सांगितलें. ९२ श्रीकृष्ण म्हणाले ' हे उद्धवा ! तूं कदाचित् असें म्हणशील कीं, अग्नीचा व काष्ठाचा संयोग स्वाभाविकच आहे. तेव्हां काष्ठाचे विकार अग्नींत दिसतात, हें आम्हांला मान्य आहे. ९३ परंतु आत्मा नित्य, शुद्ध, निर्विकार स्वरूपाचा असून तो आकाशाशींहि संसर्ग पावत नाहीं; मग त्याला देहाचा संग कसा होणार व त्यामुळें देहसंबंधानें तो विकारी कसा होणार ! ९४ आत्म्याला देहाचा संग घडतो हें तुझें बोलणेंच मुळीं खोटें आहे. असें न घडणारेंहि जर खरोखर घडत असेल तर मग तो आत्मा देहबुद्धींत सांपडेल ९५ आणि जो देहबुद्धींत आला तो केवळ देहधारण करणाराच झाला आणि मग पुढें त्याचा त्याग कसा घडणार, असा संशय मनांत उत्पन्न होतो. ९६ तूं असा संशय मनांत आणूं नकोस. तूं मनाच्या मुळाशीं मनाला नेऊन या अर्थाचा विचार कर. हे श्रेष्ठ भक्ता उद्धवा ! ९७ केवळ शब्दचातुर्यानें हें तत्त्व हातीं लागत नाहीं. माझें हें गुह्याहूनहि गुह्य रहस्य केवळ तुलाच म्हणून सांगतों. २९८.

योऽसौ गुणैर्विरचितो देहोऽयं पुरुषस्य हि । संसारस्तन्निबन्धोऽयं पुंसो विद्या छिदात्मनः ॥ १० ॥

ऐकें पुरुष जो पुरुषोत्तम । ज्या आधीन मायागुणग्राम । ज्यासी ईश्वरू ऐसा नामधर्म । शास्त्रानुक्रम बोलती ॥ ९९ ॥ त्या ईश्वराची जे माया । ज्या उपजविलें नाना कार्या । जीव संसारी करावया । श्रम वायां वाढविला ॥ ३०० ॥ तेथें चैतन्य जें प्रतिबिंबलें । तेंचि जीवपणें वाच्य झालें । जेवीं थिल्लरीं चंद्रबिंब बुडालें । दिसे नाथिलें मूर्खासी ॥ १ ॥ त्या थिल्लरासी नातळत । चंद्रमा असे गगनीं अलिप्त । तैसा आत्मा अविद्यातीत । अविद्या नातळत प्रतिबिंबाला ॥ २ ॥ अहमिति प्रथमाध्यासें । सूक्ष्म लिंगदेह मायावशें । नाना अनर्थ करी कैसें । वासनासौरसें उपजलें ॥ ३ ॥ जरी लिंगदेह जालें सबळ । विषयभोगा दृढ मूळ । तरी भोगूं नव्हे स्थूळ । सूक्ष्म भूतगोळ स्थूळावला ॥ ४ ॥ स्थूळापासोनि स्थूळ देहो । पांचभौतिक घडला पहा हो । एवं उभयदेहअभिप्रावो । जाला निर्वाहो या रीतीं ॥ ५ ॥ ऐसा उभय देहीं वर्ततां । दृढ लागली देहात्मता । तेणें वाढली अहंममता । मी कोण हें तत्त्वतां विसरला ॥ ६ ॥ न कळे निजसुखाची गोडी । पडला विषयांचिये वोढी । पापपुण्यांचिया जोडी कोडी । पडिली बेडी सुबद्धा ॥ ७ ॥ देहाध्यासें देहधर्म । सत्य मानी वर्णाश्रम । मग आचरों लागे कर्म । फळसंभ्रम वांछूनी ॥ ८ ॥ राजा चक्रवर्ती निजमंदिरीं । निजेला सुमनशेजेवरी । तो स्वप्नीं होऊनि भिकारी । अंत्यजाघरीं अन्न मागे ॥ ९ ॥ तेथ कुटका एकु यावया हाता । नीचासी म्हणे राजा रे तूं तत्त्वतां । परी मी राजा हें नाठवे चित्ता । स्वप्नीं भिक्षुकता दृढ झाली ॥ ३१० ॥ तैसी

—अहोपण, अग्नीचा काष्ठाशीं संयोग होत असल्यामुळें त्याला काष्ठधर्मत्व संभवतें, परंतु आत्मा असंग तेव्हां देहाशीं किंवा देहधर्माशीं त्याचा संबंध कसा होणार, जर संबंध होत असेल तर त्याची निवृत्ति कशी होते ? उत्तर——

पुरुषस्य गुणैः यः असौ अयं च देहः विरचितः तन्निबंधः पुंसः अयं संसारः–ईश्वराच्या अधीन असलेल्या मायागुणांनीं हा जो सूक्ष्म व हा जो स्थूल देह रचिला आहे, त्याच्या अभ्यासामुळें जीवाचा हा संसार आहे. हि आत्मनः विद्या छिद्–ज्याअर्थीं असें आहे त्याअर्थीं आत्म्याचें विज्ञान त्या संसाराचा छेद करणारें आहे. (आत्मविद्या त्या आरोपित संसाराची निवृत्ति करिते.) १०.

उद्धवा ऐक ! ज्याला पुरुषोत्तम म्हणतात, मायेच्या सर्व गुणांचा समुदाय ज्याच्या स्वाधीन आहे, शास्त्रांनीं ज्याला ईश्वर असें नांव दिलें आहे, ९९ त्या ईश्वराची माया अनेक कार्यें उत्पन्न करून जीवांना संसारांत प्रवृत्त करण्यासाठीं व्यर्थ श्रम वाढविते. ३०० त्या मायेमध्यें चैतन्याचें जें प्रतिबिंब पडतें, त्यालाच जीव असें म्हणतात. ज्याप्रमाणें चंद्राचें प्रतिबिंब एका लहानशा डबक्यांत बुडालेलें दिसावें, त्याप्रमाणें अविवेक्याला हा मिथ्या जीवभाव दिसतो. १ त्या पाण्याला स्पर्शहि न करितां चंद्र जसा आकाशांत अलिप्त असतो, त्याचप्रमाणें आत्मा त्या मायेपासून अलिप्त आहे. ती आत्मप्रतिबिंबाला स्पर्शहि करीत नाहीं. २ ‘ अहं ’ या पहिल्या अध्यासानें मायावशात् सूक्ष्म लिंगदेह अनेक अनर्थ उत्पन्न करितो. वासनासक्तीमुळें हें सर्व कार्य उत्पन्न झालें आहे. ३ लिंगदेह बलवान् झाला म्हणजे तोच विषयभोगाचें दृढ मूल बनतो. पण लिंगशरीर स्थूलभोग घेऊं शकत नाहीं. म्हणून सूक्ष्म भूतसमूहच स्थूल भूताकार झाला. ४ त्यानंतर स्थूल पंचमहाभूतापासून पांचभौतिक देह होऊन त्या दोन देहांनीं सर्व संसार व्यवस्थित सुरू झाला. ५ याप्रमाणें दोन्ही देहांत वागत असतां देहात्मबुद्धि दृढ होते. त्यामुळें अहंममता वाढते व ‘ मी कोण ’ याचा तत्त्वतः विसर पडतो. ६ त्याला आत्मसुखाची गोडी कळत नाहीं. त्याला विषयांची ओढ लागते. त्यामुळें तो पाप-पुण्यांच्या राशी जोडितो. याप्रमाणें जीव बद्ध होऊन त्याच्या पायांत प्रपंचाची बेडी पडते. ७ ‘ देहच मी ’ ही भावना दृढ झाल्यामुळें देहाचे धर्म व वर्णाश्रमांचे धर्म खरे मानितो व मग फलाच्या ऐश्वर्याची इच्छा धरून कर्माचरण करितो. ८ एखादा सार्वभौम राजा आपल्या महालांत पुष्पशय्येवर निजलेला असतो. तो स्वप्नांत स्वतःला भिकारी झालेला पहातो व एखाद्या अंत्यजाच्या घरीं अन्न मागावयास जातो. ९ तेथें एखादा शिळापाका तुकडा हातावर पडावा म्हणून त्या हीन माणसाला म्हणतो कीं, तूं खरोखर राजा आहेस. परंतु आपण स्वतःच राजा आहों, याचें त्याला विस्मरण होतें. कारण स्वप्नांत ‘ आपण भिकारी आहों ’ हीच कल्पना दृढ

विसरोनि निजात्मता । फळें मागे देवां देवतां । मी देवांचा देवो तत्त्वतां । हें त्यासी सर्वथा नाठवे ॥ ११ ॥ त्या स्वप्नाचेनि अतिअध्यासें । राजा बोसणावे मी भिकारी ऐसें । ऐकोनि सेवकां येत हांसें । राजा स्वप्नवशें जल्पतू ॥ १२ ॥ येथ गाढ मूढ अवस्थाघेरे । सर्वांग गडबडी निदसुरें । नागवें उघडें न स्मरे । निद्राभरें घारला ॥ १३ ॥ त्यासी थापटी पुरोहितू । जागा होतां होय विस्मितू । मग नागवेपणा आच्छादितू । सांगों लाजतू भिक्षुकता ॥ १४ ॥ तेवीं अविद्या निद्रा उद्भटा । जल्पे मी देहीं मी करंटा । मी संपन्नु मी ज्ञाता मोठा । देहात्मनिष्ठा बडबडी ॥ १५ ॥ निदसुरपणाचे लाहें । कर्माकर्मांचे पसरी पाये । हिताहित कोण पाहे । देहमोहें मोहितू ॥ १६ ॥ तो गाढमूढ अवस्थेआंतू । होता दीर्घसंकल्पें लोळतू । लोभें अतिजल्पें जल्पतू । बोसणतू मी माझें ॥ १७ ॥ तेथें दैवयोगें गडबडितू । अवचटें गुरुचरणीं आदळतू । निकटता देखोनि कृपावंतू । थापटितू निजबोधें ॥ १८ ॥ ब्रह्माहमस्मि ऐसी वाणी । एक वेळ पडली कानीं । अविद्या निद्रा गेली पळोनी । तत्क्षणीं जागिन्नला ॥ १९ ॥ जागतांचि होय विस्मित । मी देह म्हणतां लाजत । देहकर्म देखे निंदित । कर्मातीत ब्रह्म मी ॥ ३२० ॥ होआवया संसारबंधन । यासी अविद्याचि गा कारण । तिसी छेदावया जाण । खड्ग तीक्ष्ण ब्रह्मविद्या ॥ २१ ॥ अविद्या निरसी ब्रह्मज्ञान । ते अवश्य ब्रह्माहोनि भिन्न । मोडलें म्हणसी अद्वैतपण । तें नव्हे जाण सिद्धांतीं ॥ २२ ॥ प्रपंचु अज्ञानें लाठा । ज्ञानअज्ञानाच्या सत्ववाटा । फेडिजे कांटेन कांटा । मग खटपटा निमाल्या ॥ २३ ॥ अविद्या जीवबंधनी । ब्रह्मविद्या बंधच्छेदनी । या समूळ तुजलागुनी । सांगीतल्या दोनी सविस्तर ॥ २४ ॥ तेचि ब्रह्मविद्या जाणा । कैसेनि प्राप्त होय आपणा । ते पूर्वपीठविवंचना । सावधमना परियेसीं ॥ २५ ॥

झालेली असते. ३१० त्याचप्रमाणें जीव आपल्या आत्मस्वरूपाला विसरतो व देव-देवतांपाशीं फल मागत सुटतो. परंतु 'मी स्वतःच देवांचाहि देव आहें' हें त्याला सर्वथा आठवत नाहीं. ११ तो राजा जसा स्वप्नाच्या भरांत 'मी भिकारी' असें बरळत असतो, तें ऐकून त्याच्या नोकरांना हंसूं येतें व 'राजा स्वप्नांत बडबडत आहे' असें ते समजतात. १२ राजाला गाढ झोंपेनें घेरलेलें असतें. तो झोंपेच्या भरांत गडबडां लोळत असतो. झोंपेच्या भरांत त्याला नागडाउघडा झाल्याचेंहि भान रहात नाहीं. १३ तेव्हां पुरोहित त्याला हालवून जागा करितो. जाग आल्यावर मग त्याला विस्मय वाटतो व तो आपलें वस्त्र सांवरतों आणि स्वप्नांत भिक्षेकरी झाल्याचें सांगण्याची त्याला लाज वाटते. १४ त्याचप्रमाणें ही मायारूपी निद्रा मोठी भयंकर आहे. ती जीवाला 'मी देहवान्, मी दरिद्री, मी संपन्न, मी मोठा ज्ञाता' अशी देहालाच आत्मा समजून बडबड करावयास लाविते. १५ अज्ञानरूपी निद्रेनें घेरल्यामुळें तो कर्म-अकर्माचे पाय पसरितो. देहाच्या मोहानें मोहित झाल्यावर हित व अहित कोणाला दिसणार! १६ तो गाढ, मूढ अज्ञानरूपी निद्रेंतच दीर्घ-काल लोळत पडलेला असतो. 'मी व माझें' असें लोभानें बरळत असतो. १७ अशा स्थितींत तो गडबडां लोळत असतां दैवयोगानें अकस्मात् गुरुचरणांवर येऊन आदळतो. तेव्हां तो कृपालु सद्गुरु त्याला इतकें निकट आलेलें पाहून आत्मबोधानें थापटून जागें करितो. १८ 'ब्रह्माहमस्मि' म्ह० ब्रह्म मीच आहें, हें शब्द एकदां कानीं पडले कीं अविद्यारूपी निद्रा पळून जाते व तो तत्काळ जागृत होतो. १९ जाग येतांच तो विस्मित होतो. 'देहच मी' असें म्हणावयास तो लाजतो व देहकर्मांची निंदा करितो. मी कर्मातीत ब्रह्म आहें असें मानितो. ३२० संसारबंधनाचें कारण मायाच आहे. तिला तोडून टाकण्याचें तीक्ष्ण शस्त्र ब्रह्मविद्याच आहे. २१ ब्रह्मज्ञान अविद्येला घालवितें, कारण ती ब्रह्माहून भिन्न आहे. पण तिला भिन्न म्हटलें कीं, अद्वैत सिद्धान्ताला बाध येतो, म्हणून हा सिद्धान्त खरा नव्हे. २२ आज्ञानामुळें प्रपंच प्रबळ झाला आहे. त्यांत ज्ञान व अज्ञान यांच्या सात्त्विक वाटा आहेत. यास्तव कांट्यानें कांटा काढून टाकिला कीं सर्व दगदग संपली. २३ अविद्या जीवाला बद्ध करणारी व ब्रह्मविद्या त्या बंधाचा छेद करणारी आहे. या दोन्ही विद्या तुला सविस्तर सांगितल्या. २४ तीच ब्रह्मविद्या आपल्याला कशी प्राप्त होईल हा महत्त्वाचा विचार आतां स्वस्थ चित्तानें ऐक.३२५.

तस्माज्जिज्ञासयाऽऽत्मानमात्मस्थं केवलं परम् । संगम्य निरसेदेतद्वस्तुबुद्धिं यथाक्रमम् ।। ११ ।।

उद्धवा याचिलागीं नित्य । जिज्ञासें बैसवावें चित्त । वृत्तीसि विवेक उपजवित । सत्यासत्यविभागें ।। २६ ।। तेथ असत्य तितुकी अविद्या । जिचेनि जीवासी परम बाधा । तिच्या समूळ करावया छेदा । सद्विद्या साधावी ।। २७ ।। सद्विद्या साधिलिया पाहीं । केवळ वस्तु ते दूरी नाहीं । असे आपुल्याचि ठायीं । येचि देहीं कूटस्थ ।। २८ ।। कार्यकारणसंघात । त्यामाजीं वस्तु असे व्याप्त । व्यापूनियां अलिप्त । नित्यमुक्त स्वभावें ।। २९ ।। करूनि सद्विद्यासाधन । धरूनि आत्मानुसंधान । देहद्वयाचें निरसन । साधकें जाण साधावें ।। ३३० ।। स्थूळ नश्वरत्वें मिथ्या झालें । सूक्ष्म वासनामय कल्पिलें । ते कल्पनेसी मिथ्यात्व आलें । ब्रह्म उरलें निर्विकल्प ।। ३१ ।। जैशा गगनीं नाना मेघपंक्ती । निजबळें हो त्या वर्षती । त्याचि शारदियेचे अंतीं । हरपोनि जाती आकाशीं ।। ३२ ।। तैशी देहीं देहात्मबुद्धी । दृढ केली होती त्रिशुद्धी । तेचि विवेकाचिया प्रबोधीं । नास्तिकसिद्धी पावली ।। ३३ ।। देह असद्भावाची पदवी । ब्रह्मविद्येच्या सद्भावीं । खद्योततेजाची दिवी । सूर्यें देखावी कैसेनी ।। ३४ ।। दोर भासला होता विखार । त्याचा करितां निजनिर्धार । हारपोनियां सर्पाकार । उरे दोर निजरूपें ।। ३५ ।। पाहतां विवेकाचेनि निवाडें । दोराचें सर्पत्व जेवीं उडे । तेवीं ब्रह्मसद्भावीं रोकडें । देह नातुडे सत्यत्वें ।। ३६ ।। नरदेह आश्रवून । ब्रह्मविद्या वाढली जाण । तें आपुलें जन्मस्थान । देहनिर्दळण केवीं करी ।। ३७ ।। उद्धवा तूं ऐसऐशी । आशंका ह्मणीं धरिसी । ते अग्निउत्पत्तिदृष्टांतेंसीं । तुजपाशीं सांगेन ।। ३८ ।।

—त्याअर्थी असें आहे—

तस्मात् जिज्ञासया आत्मस्थं केवलं परं आत्मानं संगम्य—त्याअर्थी विचारानें या शरीर-इंद्रियसंघातांतच स्थित असलेल्या केवल पर आत्म्याला साक्षात् जाणून, एतद्वस्तुबुद्धिं यथाक्रमं निरसेत्—या देहादिकांवरील सत्यत्व बुद्धीचा सूक्ष्म-स्थूल क्रमानें त्याग करावा. ११.

हे उद्धवा ! यास्तव जिज्ञासूनें चित्त नेहमीं स्थिर ठेवावें. सत्यासत्याच्या विभागामुळें वृत्तींत विचार उत्पन्न होतो. २६ त्यांतील जेवढें असत्य तेवढी अविद्या समजावी. तिच्यापासून जीवाला अतिशय पीडा होते. त्या अविद्येला समूळ तोडून टाकण्यासाठीं ब्रह्मविद्या संपादावी. २७ एकदां ती मिळविली कीं मग सद्वस्तु कांहीं दूर नाहीं. ती याच देहांत आपल्याच हृदयांत कूटस्थरूपानें असते. २८ शरीर-इंद्रियांच्या समुदायांत हें ब्रह्म व्यापिलेलेंच असतें; परंतु तें स्वभावतःच नित्यमुक्त असल्यामुळें त्यांत व्यापिलेलें असूनहि अलिप्तच रहातें. २९ साधकानें ब्रह्मविद्या संपादन करून आत्मानुसंधानानें देहद्वयाचें निरसन करावें. ३३० स्थूल देह नाशवंत असल्यामुळें तो मिथ्या झाला. वासनामय सूक्ष्मदेह कल्पित आहे. म्हणून त्यालाहि मिथ्यात्व आलें व निर्विकल्प ब्रह्मच काय तें शिल्लक राहिलें. ३१ आकाशांत मेघांचा जो प्रचंड समुदाय आपल्या शक्तीनें पर्जन्याचा वर्षाव करितो, तोच पावसाळा संपल्यावर आकाशांत नाहींसा होतो. ३२ त्याचप्रमाणें देहावरच जी आत्मबुद्धि दृढ केलेली होती ती विवेकाचा उदय होतांच मिथ्या ठरली. ३३ काजव्याच्या प्रकाशाचें तेज सूर्याला कसें दिसणार ! त्याचप्रमाणें ब्रह्मविद्येचा उदय झाल्यावर देहाचें सत्यत्व कसें टिकाणार ! ३४ दोरीच साप भासला होता, पण त्याचा रज्जुनिश्चयानें निरास केला असतां सर्पभ्रम जाऊन दोरी आपल्या स्वरूपांत रहाते. ३५ विचारपूर्वक पाहिलें असतां दोरीवरील सर्पाचा भास जसा नाहींसा होतो तसेंच ब्रह्माच्या सत्यत्वापुढें देहाचें सत्यत्व टिकत नाहीं. ३६ हे उद्धवा ! तूं जर अशी आशंका घेशील कीं, देहाचा आश्रय करूनच जर ब्रह्मविद्या वाढते, तर मग तीच आपलें उत्पत्तिस्थान जें शरीर त्याचाच नाश कसा करील ! ३७ याचें उत्तर मी तुला अग्नीच्या उत्पत्तीचा दृष्टान्त देऊन सांगतों, ऐक. ३३८.

आचार्योऽरणिराद्यः स्यादन्तेवास्युत्तरारणिः । तत्सन्धानं प्रवचनं विद्या सन्धिः सुखावहः ॥ १२ ॥

दो काष्ठांचिया घसणीं । अग्नि काढिला मंथोनि । तो काष्ठें काष्ठ जाळूनी । अग्नि अग्निपणीं प्रज्वळला ॥ ३९ ॥ तैसी ब्रह्मविद्या जाण । गुरुशिष्यसंवादमंथन । त्या मंथनाचें निरूपण । सावधान परियेसीं ॥ ३४० ॥ येथ आचार्य आद्य अरणी । शिष्य तो जाला उत्तरारणी । उपदेश तो मंथास्थानीं । संवादमंथनीं मंथावें ॥ ४१ ॥ ये मथनीं जरी आळस केला । तरी ज्ञानाग्नीचा आविर्भाव गेला । आपणिया आपण वंचला । थित्या मुकला साधना ॥ ४२ ॥ धरितां आळसाची मागी । येव्हढा अनर्थू वाजे अंगीं । आठही प्रहर शिणताति योगी । या योगालागीं साधावया ॥ ४३ ॥ निजस्वार्थालागीं सावधान । गुरुवचनाचें अनुसंधान । अविश्रम करितां मंथन । ब्रह्मज्ञान तें प्रकटे ॥ ४४ ॥ प्रकटलें ब्रह्मज्ञान । उरों नेदी देहाचें भान । दृश्य द्रष्टा दर्शन । करी प्राशन तत्काळ ॥ ४५ ॥ कार्य कर्म आणि कर्ता । ज्ञान ज्ञेय आणि ज्ञाता । हें उरों नेदी सर्वथा । निजात्मता निजबोधें ॥ ४६ ॥ निजबोधें संसारदुःख । निरसूनि दिधलें निजसुख । निजात्मसुखीं निःशेख । मायागुणदोख नासिले ॥ ४७ ॥

वैशारदी साऽतिविशुद्धबुद्धिर्धुनोति मायां गुणसंप्रसूताम् ।
गुणांश्च संदह्य यदात्ममेतत्स्वयं च शाम्यत्यसमिद्यथाऽग्निः ॥ १३ ॥

—गुरूपासून संपादन केलेली विद्या अविद्या व तिचें कार्य यांचें निरसन करण्यास समर्थ आहे, हें स्पष्ट करण्यासाठीं विद्योत्पत्तीचें अग्न्युत्पत्तीच्या रूपकानें निरूपण करितात—

आचार्यः आद्यः अरणिः स्यात्—आचार्य खालची अरणि आहे. अन्तेवासी उत्तरारणिः—शिष्य वरची अरणि आहे. प्रवचनं तत्संधानं—आचार्यांचा उपदेश हें त्या दोन अरणीमधील मंथनकाष्ठ आहे. विद्या सुखावहः सन्धिः— विद्या हाच सुखावह संधि आहे. [अरणींचें मंथन केलें असतां त्यांत जसा अग्नि उत्पन्न होतो त्याचप्रमाणें विद्या उत्पन्न होते. तै. भा. १. ३. पृ. २१] १२.

दोन काष्ठें एकावर एक घांसून, त्या घर्षणानें त्यांतून अग्नि काढिला तर तो त्या काष्ठांनाच जाळून अग्निरूपानें प्रज्वलित होतो. ३९ त्याचप्रमाणें गुरु-शिष्यांच्या संवादरूपी मंथनानें ब्रह्मविद्या प्रकट होते. त्या मंथनाचें निरूपण स्वस्थचित्तानें ऐक. ३४० त्यांतील आद्य अरणि म्ह० अग्नि उत्पन्न करण्याचें खालचें काष्ठ गुरु आहे व उत्तर अरणि म्ह० वरचें काष्ठ शिष्य आहे. उपदेश हीच रवी आहे, त्या दोघांचा संवाद हीच मंथनक्रिया. ४१ या मंथनांत जर आळस केला तर ज्ञानरूपी अग्नि आविर्भूत होणार नाहीं व आपणच आपल्याला फसवून हातचें साधन घालविल्या-प्रमाणें होईल. ४२ आळसाचा मार्ग धरिला असतां एवढा अनर्थ ओढवतो. हा योग साधण्यासाठीं योगी आठहि प्रहर कष्ट करीत असतात. ४३ आपल्या हिताविषयीं सावध राहून गुरुवचनाचें एकाग्र चित्तानें मनन करून सतत मंथन केलें तरच ब्रह्मज्ञान प्रकट होतें. ४४ एकदां ब्रह्मज्ञान प्रकटलें म्हणजे तें देहभान उरूं देत नाहीं. तें दृश्य, द्रष्टा, दर्शन ह्या त्रिपुटीला क्षणांत नाहींसें करितें. ४५ कार्य, कर्म, कर्ता, ज्ञान, ज्ञेय व ज्ञाता यांपैकीं कांहींच रहात नाहीं. आत्मज्ञानानें आत्मस्वरूपत्व लाभतें. ४६ आत्मज्ञान होतांच संसारदुःखाचा नाश होऊन आत्मसुखाची प्राप्ति होते आणि आत्मसुखांत मायेच्या गुणदोषांचा तत्काल नाश होतो. ३४७.

—अग्नीचें सादृश्यच दाखवितात—

सा वैशारदी अतिविशुद्धबुद्धिः— ती अतिनिपुण शिष्यानें प्राप्त करून घेतलेली किंवा अतिनिपुण गुरूनें उपदेशिलेली अतिशुद्ध बुद्धि, गुणसंप्रसूतां मायां धुनोति—गुणकार्यरूप मायेची निवृत्ति करिते. यदात्मं एतत् तान् गुणान् च संदह्य—आणि ज्या गुणांचें कार्य म्हणूनच गुणरूप असलेलें हें जगत् जीवाच्या संसाराचें निमित्त आहे, त्या गुणांना जाळून, यथा असमिद् अग्निः तथा स्वयंच शाम्यति—ज्याप्रमाणें काष्ठांना जाळून अग्नि शांत होतो, त्याप्रमाणें ती बुद्धीहि आपो-आप शांत होते. [त्यामुळें कार्य, कारण व विद्या यांतील कशाचाच प्रतिबंध न राहिल्यामुळें तो साक्षात् परमानंदरूप होतो.] १३.

नाशावया निजमायागुण । शिष्य विशारद बुद्धिनिपुण । दैवी संपदेचें अधिष्ठान । सद्गुणीं संपन्न सर्वदा ॥ ४८ ॥ ऐसा मुमुक्षु अधिकारवंतू । त्यासी शाब्दपरनिष्णातू । गुरूनीं माथां ठेविला हातू । निजबोध प्राप्तू तत्काळें ॥ ४९ ॥ निजबोधीं बैसतां दृष्टीं । गुणकार्य रिघे गुणांच्या पोटीं । तेव्हां गुणुचि गुणातें आटी । तमातें घोटी मध्यमू ॥ ३५० ॥ तम खाऊनि रजोगुण । अत्यंत उन्मत्त जाला जाण । त्याचें देखोनि उन्मत्तपण । सत्वें सत्वगुण खवळला ॥ ५१ ॥ जेव्हां खवळला सत्वगुण । त्यासी न साहे दुजेपण । रजोगुणाचें प्राशन । केलें जाण तत्काळ ॥ ५२ ॥ केवळ सत्वाचा स्वभावो । तेणें निजसुखाचा अनुभवो । क्षणक्षणां नीच नवा पहा हो । अतिनवलावो अनुभवीं ॥ ५३ ॥ तेणें सुखानुभवें देखा । रजतमांच्या बीजकणिका । ज्या सृष्टिस्रजनीं उन्मुखा । त्याही निःशेखा जाळिल्या ॥ ५४ ॥ तेव्हां गुण प्रसवती माया । शोधित सत्वें आणिली लया । ते सत्ववृत्ति एकलिया । अद्वैततया उरलीसे ॥ ५५ ॥ तेव्हां 'ब्रह्माहमस्मि'–लक्षण । तेंही हों लागलें क्षीण । सोहंहंसाची बोळवण । ते संधीं जाण होतसे ॥ ५६ ॥ तेथ देहींचें गेले देहपण । जन्ममरणा आलें मरण । विश्वाचें न दिसे भान । आनंदघन कोंदला ॥ ५७ ॥ तेणें सुखस्वरूप जाली दृष्टी । आनंदमय जाली सृष्टी । परमानंदें चढली पुष्टी । स्वानंदें मिठी घातली ॥ ५८ ॥ त्या सुखाची मर्यादा । कासयानें नव्हे कदा । जेथ मौन पडिलें वेदां । वृत्ति तत्पदा पावली ॥ ५९ ॥ द्वैत सर्वथा नाहीं पुढे । यालागीं वृत्तीची वाढी मोडे । तेव्हां तेही सुखस्वरूपीं बुडे । पुढें वाढे तें नाहीं ॥ ३६० ॥ जैसा निरिंधन अग्नी । जाय निजतेजीं मिळूनी । तैशी वृत्ति अद्वैतपणीं । मिळे मिळणीं सुखरूपीं ॥ ६१ ॥ गंगा सागरा मीनली । ते समुद्रचि होऊनि ठेली । का लवणजळां भेटी झाली । मिठी पडली जळत्वें ॥ ६२ ॥ दीपीं दीपु एकवटला । मिळणीं एकुचि होऊनि ठेला । तैसा

आत्ममायेच्या गुणांचा नाश करण्यासाठीं चतुर व बुद्धिमान् शिष्य दैवी संपत्तीचा आश्रय करून निरंतर सद्गुणांनीं संपन्न होतो. ४८ असा अधिकारी मुमुक्षु परोक्ष व अपरोक्ष ज्ञानांत निपुण असला म्हणजे सद्गुरूनें त्याच्या मस्तकावर वरदहस्त ठेवतांच त्याला तत्काल आत्मज्ञान होतें. ४९ आत्मज्ञानावर दृष्टि खिळली म्हणजे गुणांचें कार्य गुणांतच लुप्त होतें. गुणच गुणाला आटवून टाकितो. रजोगुण तमोगुणाला गिळून टाकितो. ३५० तमाला खाऊन रजोगुण अत्यंत उन्मत्त होतो. त्याला उन्मत्त झालेला पाहून सत्त्वगुण खवळतो ५१ व एकदां सत्वगुण क्षुब्ध झाला कीं, त्याला दुसऱ्याचा उत्कर्ष सहन होत नाहीं. तो तत्काल रजोगुणाचें प्राशन करितो. ५२ शुद्ध सत्त्वगुणाचा स्वभावच असा आहे कीं, त्यानें आत्मसुखाचा अनुभव येतो. त्या अनुभवाचें काय आश्चर्य आहे पहा! प्रतिक्षणीं नवा नवाच अनुभव येतो. ५३ त्या सुखानुभवानें सृष्टि उत्पन्न होण्यास कारणभूत झालेले रज व तम या गुणांचे जे अवशिष्ट कण राहिलें असतील तेहि जळून जातात. ५४ त्यावेळीं गुणांना उत्पन्न करणारी माया शुद्धसत्त्वानें लय पावते व केवल सत्त्वगुण एकटाच अद्वैतरूपानें शिल्लक रहातो. ५५ तेव्हां 'ब्रह्माहमस्मि' ही भावनाहि नाहींशी होऊं लागते व तें परमात्मतत्त्वच मी आहें 'इत्यादि महावाक्यांचीहि त्यावेळीं गरज रहात नाहीं. तीं निवृत्त होतात. ५६ त्यावेळीं देहाचें देहपण जाऊन जन्म-मरणालाच मरण येतें. जगाचें भान रहात नाहीं. सर्वत्र आनंदघन भरून रहातो. ५७ त्यामुळें दृष्टि सुखस्वरूप होते. सर्व सृष्टि आनंदमय दिसूं लागते. परमानंदाला भरतें येऊन आत्मानंद मिठी घालितो. ५८ त्या सुखाची मर्यादा दुसऱ्या कशानें केव्हांहि निश्चित करितां येत नाहीं. ज्याविषयीं वेदांनींहि मौन धरिलें त्या पदाला वृत्ति प्राप्त होते. ५९ व पुढें द्वैतभाव नाहीं असें पाहून वृत्तीची वाढ खुंटते व तीहि आत्मस्वरूपांत लीन झाल्यामुळें पुढें वाढत नाहीं. ३६० सर्पणावांचून अग्नि जसा आपल्या मूळ तेजांत मिळून जातो, त्याप्रमाणें वृत्तिहि अद्वैतपणानें सुखस्वरूपांत मिळून जाते. ६१ गंगा समुद्राला जाऊन मिळाली कीं, ती समुद्ररूपच होऊन जाते. किंवा मीठ व पाणी यांची भेट होतांच मीठ जळरूप होऊन जातें. ६२ एका दिव्यानें दुसरा दिवा लावतांच त्याच्या प्रकाशांत दुसरा प्रकाश जसा मिळून जातो, त्याचप्रमाणें आत्मस्वरूपांत वृत्तीचा

वृत्तीचा लयो जाला । निर्व्यंग पावला निजसुख ॥ ६३ ॥ तेव्हां आत्मा एकु अद्वैत । तेंही ह्मणणें नाहीं तेथ । एवं द्वैताद्वैतातीत । नित्य निश्चित निजात्मा ॥ ६४ ॥ तो ज्ञानस्वरूप स्वप्रकाश । अविकारी अविनाश । अकर्ता अभोक्ता उदास । निर्विशेष निजरूप ॥ ६५ ॥ तो अदेही अगोत्र । अचक्षु अश्रोत्र । अमनस्क अमंत्रें । मंत्रीं मंत्रार्थ जो कां ॥ ६६ ॥ जो अज आद्य अप्रमेयो । अतर्क्य अलक्ष्य अव्ययो । नामरूपादि अभावो । भावनाभावो ते शून्य ॥ ६७ ॥ जो भोग्य भोगा नव्हे भोक्ता । जो कार्य कर्म नव्हे कर्ता । कर्ता अकर्ता या वार्ता । जेथ सर्वथा निमाल्या ॥ ६८ ॥ जो अविनाशी अभंग । जो शुद्ध बुद्ध असंग । देहद्वयाचा संग । ज्याचें अंग स्पर्शेना ॥ ६९ ॥ आत्म्यावेगळें तें अनित्य । हा पूर्वनिश्चय होतां सत्य । आतां बुडालें नित्यानित्य । सबराभरित निजात्मा ॥ ३७० ॥ नेणपण निमालें सर्वथा । बुडाली जाणपणाची अवस्था । गुण-गुणि-गुणातीतता । हेही तत्त्वतां तेथ नाहीं ॥ ७१ ॥ उद्धवा परमात्मा तो तत्त्वतां । हा माझा निश्चयो सर्वथा । तोचि उपनिषदर्थें अर्थिता । निजात्मता प्रतिपाद्य ॥ ७२ ॥ येथ पावलिया वृत्ति । होय संसारनिवृत्ति । हाचि वेदान्तीं सिद्धान्तीं । निश्चयो निश्चितीं केला असे ॥ ७३ ॥ येथूनि कार्यकर्म-कर्तव्यता । निःशेष खुंटली सर्वथा । निजीं निजरूप निजात्मता । जाण तत्त्वतां पावल्या ॥ ७४ ॥ हे अद्वैतश्रुतिसुरवाडें । सद्गुरुकृपाउजियेडें । निवृत्ति निजात्मपदा चढे । भाग्य केव्हडें पाहें पां ॥ ७५ ॥ मी वंद्य देवादिदेवां । त्या माझाही निजज्ञानठेवा । परम कृपेनें उद्धवा । तुज म्यां आघवा दीधला ॥ ७६ ॥ तुज होआवया निवृत्ती । हाचि अर्थु नानासंमतीं । सांगीतला परम प्रीतीं । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७७ ॥ आतां देहादिक जे असंत । अतिनिंद्यत्व कुत्सित । तेथ आतळों नेदीं चित्त । होईं अलिप्त परमार्थीं

लय होतांच परिपूर्ण आत्मसुखाचा अनुभव येतो. ६३ तेव्हां आत्मा एक अद्वैत आहे हेंहि म्हणणें उरत नाहीं. कारण द्वैत व अद्वैत या दोहोंच्याहि पलीकडे नित्य व निश्चित आत्म्याचें स्वरूप आहे. ६४ तो ज्ञान-स्वरूप, स्वयंप्रकाश, विकाररहित, विनाशरहित, अकर्ता, अभोक्ता, उदासीन व स्वभावतःच निर्विशेष आहे. ६५ तो देहरहित, गोत्ररहित, चक्षुरहित, श्रोत्ररहित, मनोरहित, मंत्ररहित, पण मंत्रांतील मंत्रार्थ आहे. ६६ जो अज, आद्य, अप्रमेय, अतर्क्य, अलक्ष्य, अव्यय, नामरूपरहित, भाव-अभावशून्य, ६७ तो भोक्ता, भोग्य व भोगहि नव्हे आणि कर्ता, कार्य व कर्महि नव्हे. त्याच्याठिकाणीं कर्ता व अकर्ता या वार्ता सर्वथा शांत झाल्या आहेत. ६८ जो अविनाशी, अभंग, शुद्ध, बुद्ध व असंग आहे, त्याला स्थूल व सूक्ष्म या दोन देहांचा कधीं स्पर्शहि होत नाहीं, ६९ आत्म्यावांचून इतर सर्व नश्वर आहे, हा पूर्व निश्चय दृढ झाला असतां नित्य व अनित्य दोन्ही नाहींशी होऊन आंत-बाहेर आत्मस्वरूपच भरून रहातें. ३७० अज्ञान सर्वथा नाहींसें होतें. जाणतेपणा लोपतो. गुण, गुणी व गुणातीतत्व हेंहि वस्तुतः तेथें नाहीं. ७१ हे उद्धवा ! खरोखर परमात्माच सत्य आहे. ७२ हा माझा पूर्ण निश्चय आहे. उपनिषदांनीं विशद करून सांगितलेलें आत्मतत्व तेंच आहे. ७३ वृत्ति येथपर्यंत जाऊन पोंचली कीं संसाराची निवृत्ति होते. हाच निश्चय वेदान्तसिद्धान्तामध्यें दृढ केला आहे. या स्थितीला पोंचल्यावर कार्य, कर्म, कर्तव्यता हीं सर्व निःशेष नाहींशीं होतात व आत्मस्वरूपांतच स्वरूपभूत ‘ स्वात्मता ’ तत्त्वतः प्राप्त होते. ७४ अद्वैतप्रतिपादक वेदवाक्यांच्या मननानें व सद्गुरुरूपी सूर्याच्या प्रकाशानें ही वृत्तिशून्य अवस्था प्राप्त होऊन ती आत्मस्वरूपाला जाऊन मिळतें. हें केवढें भाग्य आहे पहा ! ७५ हे उद्धवा ! जो मी देवांच्या आदिदेवालाहि वंद्य आहें त्या माझा ज्ञानरूपी सर्व ठेवा मीं तुला मोठ्या कृपेनें दिला. तूं प्रपंचापासून निवृत्त व्हावेंस म्हणून मीं हाच विषय अनेक श्रुतींचा आधार घेऊन तुला मोठ्या प्रेमानें सांगितला आहे, असें तूं निश्चयानें जाण आणि हे उद्धवा ! ७७ आतां तूं तिरस्कारास पात्र असलेले, अतिनिंद्य व मिथ्या असे जे देहादिक त्यांत आपलें चित्त आसक्त होऊं देऊं नकोस. त्यापासून अलिप्त राहून परमार्थी हो. ७८ तुला हा अलभ्य लाभ

॥ ७८ ॥ हे तुज जाली अलभ्य प्राप्ती । परी यत्न करावा अतिनिगुतीं । येथ मतांतरें छळूं येती । तेही उपपत्ती परियेसीं ॥ ७९ ॥

अथैषां कर्मकर्तॄणां भोक्तॄणां सुखदुःखयोः । नानात्वमथ नित्यत्वं लोककालागमात्मनाम् ॥ १४ ॥
मन्यसे सर्वभावानां संस्था ह्यौत्पत्तिकी यथा । तत्तदाकृतिभेदेन जायते भिद्यते च धीः ॥ १५ ॥

नाना फळें अभिलाषिते । कर्मांचे जे कर्म कर्ते । सुखदुःखांचे जे भोक्ते । अनेकत्वें येथें अनंत ॥ ३८० ॥ म्हणती जे मानिती एकात्मता । तरी ऐकाचेनि सुखें सुख समस्तां । कां एकाचेनि पापें पापता । न घडे सर्वथा सकळांसी ॥ ८१ ॥ ऐसें कर्मवादियांचें मत । जीव नित्य आणि अनंत । मुख्य ईश्वरूचि नाहीं ह्मणत । । कर्ते येथ निजकर्म ॥ ८२ ॥ मीपणें जें स्फुरे स्फुरण । ते प्रतिशरीरीं जीव

झाला आहे, तरी त्यासाठीं फार सावधपणानें प्रयत्न कर. त्यांत अनेक प्रकारचे मतभेद तुला छळावयास येतील. तरी त्यांच्या युक्ति तूं ऐकूं नकोस. ३७९.

—याप्रमाणें आत्मा स्वप्रकाश, ज्ञानस्वरूप, नित्य व एकच आहे. त्याचे कर्तृत्वादिक धर्म, देह या उपाधीमुळें आहेत. आत्मव्यतिरिक्त सर्व अनित्य व मायामय आहे. म्हणून सर्वांविषयीं विरक्त झालेला पुरुष आत्मज्ञानानें मुक्त होतो, असें 'विलक्षणःस्थूलसूक्ष्मात्०' पृ. ५६१ इत्यादि श्लोकानें सांगितलें व तेंच श्रुतिसमन्वयानें निश्चित केलें. पण त्या निर्णीत अर्थाविषयींहि मतान्तरविरोधानें संदेह उत्पन्न होऊं नये, म्हणून त्या मताचें निराकरण करण्यासाठीं भगवान् त्या मतालाच उत्थापित करितात——

अथ एषां कर्मकर्तॄणां सुखदुःखयोः भोक्तॄणां च नानात्वं—आतां या कर्मे करणाऱ्या व सुख-दुःख भोगणाऱ्या जीवांना नानात्व आहे, असें जर तूं मानीत असशील (कारण पूर्व मीमांसक 'मी' या प्रत्ययानें ज्ञात होणाराच आत्मा आहे. तो प्रत्येक शरीरांत भिन्न व कर्तृ-भोक्तृरूप आहे. त्या जीवाचा स्वरूपभूत, निर्विकार, एक परमात्मा नाहीं. यास्तव तो अहंप्रत्यय-गम्य जीवच सर्वदा ज्ञातव्य आहे, असें म्हणतात. तसेंच वैराग्यहि संभवत नाहीं. कारण भोगस्थानें अनित्य आहेत, म्हणून वैराग्य येणार कीं, भोगकाल, तदुपायभूत कर्मबोधक आगम किंवा भोक्ता जीव अनित्य आहे म्हणून वैराग्य येणार, पण यांतील कशालाच अनित्यत्व नाहीं, अशा आशयानें दुसरा पक्ष—) **अथ लोककालागमात्मनां नित्यत्वं मन्यसे**—किंवा लोक, काल वेद व आत्मे यांना नित्यत्व आहे, असें मानीत असशील (भोग्य पदार्थांचा विच्छेद होत असल्यामुळें त्यांना मायामयत्व आहे. त्यामुळें त्याविषयीं वैराग्य उत्पन्न होईल, असें म्हणाल तर तेंहि बरोबर नाहीं. कारण—) **सर्वभावानां संस्था औत्पत्तिकी हि**—स्त्री-पुत्रादि सर्व पदार्थांची स्थिति प्रवाहरूपानें नित्य आहे, (हें जगत् सर्वदा असेंच आहे. याहून अन्यप्रकारचें केव्हांहि नाहीं. त्यामुळें त्याचा कर्ताहि ईश्वरादि कोणी नाहीं.) तसेंच, **यथा**—ही पदार्थांची स्थिति सत्य आहे, ती मायामयी नाहीं, (आत्मस्वरूपभूत नित्य एक ज्ञानहि नाहीं असें त्यांचें मत सांगतात,—) **तत्तदाकृतिभेदेन धीः जायते भिद्यते च**—भिन्नभिन्न पदार्थांच्या आकारानें ज्ञान उत्पन्न होतें व नाश पावतें [मीमांसकांच्या या म्हणण्याचा गूढ आशय असा—आत्मा नित्य ज्ञानरूप नाहीं, तर तो ज्ञानपरिणामवान् आहे. तर मग तो विकारी व त्यामुळें अनित्य होईल, म्हणून म्हणाल तर तसेंहि नाहीं-कारण या आत्म्याची ज्ञानरूप विक्रिया त्याच्या नित्यत्वाशीं विरोध करीत नाहीं. यास्तव मुक्तिसमयीं इंद्रियादिरहित आत्म्याचा ज्ञानविक्रियारूप परिणाम संभवत नसल्यामुळें त्याला जडत्व येतें व जडत्वप्राप्ति हा पुरुषार्थ केव्हांहि नव्हे. यास्तव प्रवृत्तीच सर्वथा श्रेयस्कर आहे. निवृत्ति नव्हे.] १४-१५.

अनेक प्रकारचीं फळें इच्छिणारे कर्मांचे कर्ते व सुख-दुःखाचे भोक्ते, नानाप्रकारचे व असंख्य आहेत. ३८० कोणी सर्व विश्व एकरूपच आहे असें म्हणतात. परंतु ज्याअर्थीं एकाच्या सुखानें सर्वांना सुख व एकाच्या पापानें सर्वांना पाप लागत नाहीं, त्याअर्थीं त्यांचें म्हणणें खरें नव्हे. ८१ कर्मवाद्यांचें मत असें आहे कीं, जीव नित्य व अनंत आहेत. प्रत्येकाला सुख-दुःखाची भिन्न भिन्न प्रतीति येते. ईश्वर मुख्य नाहीं. आपल्या कर्मांकडेच सर्व कर्तृत्व आहे. ८२ मीपणानें मनांत जो अहंभाव उत्पन्न होतो, तो प्रत्येक शरीरांत भिन्न आसतो. म्हणून जीवहि भिन्न आहेत. कर्ता व भोक्ता हे त्यांच्या स्वरूपाचें प्रमाण आहे, असें ते म्हणतात. (हे मीमांसक एक

भिन्न । त्यांच्या स्वरूपाचें प्रमाण । कर्ता भोक्ता जाण म्हणताती ॥ ८३ ॥ ऐकें विवंचना सावचित्त । लोक काळ श्रुति जीवित । अनेकत्वें अनित्य । हें वेदांतमत पैं माझें ॥ ८४ ॥ उद्धवा कर्मवाद्यांचें ऐसें मत । सत्य मानील तुझें चित्त । तरी बुडवील निजस्वार्थ । अंगीं अनर्थ वाजेल ॥ ८५ ॥ तोचि अनर्थ म्हणसी कैसा । तरी कर्मवाद्यांचा भावो ऐसा । हा पूर्वपक्षाचा ठसा । अभिप्रावो ऐसा परियेसीं ॥ ८६ ॥ परमात्मा निर्विकाररूप । एक न मानिती सर्वस्वरूप । संन्यासु ऐकतां म्हणती पाप । मतजल्प मतवाद्यां ॥ ८७ ॥ त्यागुसंन्यास जे करिती । त्यांतें अनधिकारी म्हणती । कर्म मुख्यत्वें मानिती । वैराग्य निंदिती निजमतें ॥ ८८ ॥ कर्म करोनि भोगिजे सुख । तें कर्म त्यजिती निःशेख । निष्कर्मासी कैंचें सुख । परम दुःख तो त्यागू ॥ ८९ ॥ वैराग्य न घडावया कारण । चौं प्रकारीं बोलती जाण । तेंही सांगेन मी लक्षण । सावधान परियेसीं ॥ ३९० ॥ म्हणती अनित्य असतें कांहीं । तरी वैराग्य घडे ते ठायीं । येथ अनित्याचि नाहीं । वैराग्यें कायी त्यजावें ॥ ९१ ॥ वैराग्य होये चौं प्रकारीं । मीमांसक नित्य मानिती चारी । निजमताचा गर्व भारी । चार्‍ही करी नित्यत्वें ॥ ९२ ॥ कर्मप्रकाशक वेद मूळ । तो आगम नित्य मानी अढळ । जीव नित्यचि म्हणे सकळ । भोगकाळ तोही नित्य ॥ ९३ ॥ स्वर्गादि लोक भोगस्थान । वेदू बोलिला आपण । मिथ्या नव्हे वेदवचन । चार्‍ही प्रमाण नित्यत्वें ॥ ९४ ॥ उद्धवा यापरी पाहीं । म्हणती अनित्य येथ नाहीं । वैराग्यें करावें कायी । मिथ्या पाहीं वैराग्यी ॥ ९५ ॥ हो कां भोग्य जरी नश्वर होतें । अथवा मायिक कांहीं असतें । तरी वैराग्य संभवतें । तें तंव येथें असेना ॥ ९६ ॥

सर्वव्यापी परमात्मा मानीत नाहींत.) ८३ उद्धवा आतां पुढील विवेचन लक्ष देऊन ऐक. लोक, काळ, श्रुति व जीवित यांना अनेकत्व असल्यामुळें तीं अनित्य आहेत, हें माझें वेदान्तमत आहे. ८४ यास्तव कर्मवादी मीमांसकांचें वरील मत जर तूं खरें मानशील तर आपल्या खर्‍या स्वार्थाला मुकशील व अनर्थांत पडशील. ८५ तो अनर्थ कोणता, असें जर म्हणशील तर ऐक! कर्मवाद्यांचा हा भाव म्हणजे पूर्वपक्षच आहे. त्याचा अभिप्राय काय आहे, तो तूं ऐक. ८६ परमात्मा निर्विकाररूप असून तोच एक सर्वात्मा आहे, हें त्याना मान्य नाहीं. 'संन्यास' हा शब्द ऐकतांच त्यांना मोठें पातक वाटतें. ८७ त्याग किंवा संन्यास करणारास ते अनधिकारी म्हणतात. ते कर्मच मुख्य मानितात व वैराग्याची निंदा करितात. ८८ कर्म करावें व सुख भोगावें, जे कर्माचा पूर्णपणें त्याग करितात त्याना कर्म न केल्यामुळें सुख कोठचें! त्यागच अत्यंत दुःख देणारा आहे, असें ते म्हणतात. ८९ विरक्ती न येण्यास ते चार प्रकारचें कारण सांगतात. त्यांचें लक्षण सांगतों, ऐक ३९० अनित्य असें जर कांहीं असतें तर विरक्ति आली असती; पण जेथें अनित्यच नाहीं तेथें वैराग्यानें कशाचा त्याग करावा! ९१ मीमांसकांच्या मतानें वैराग्याचीं चार कारणें आहेत, पण तीं चारहि कारणें नित्य आहेत, असा आपल्या मताचा त्यांना मोठा अभिमान आहे. तीं चार कारणें अशीं—९२ कर्माला प्रकाश देणारा मूळ वेद आहे. पण त्या वेदाला ते नित्य मानितात. सर्व जीवांनाहि ते नित्यच समजतात. भोगाचा काळहि नित्य आहे ९३ व स्वर्गादि लोक भोगाचें स्थान आहे, असें प्रत्यक्ष वेदानें सांगितलें आहे आणि वेदवचन सर्वथा मिथ्या नाहीं. त्यामुळें हीं चारी नित्य व प्रमाण आहेत. ९४ उद्धवा! याप्रमाणें ते 'या जगांत अनित्य असें कांहींच नाहीं' असें म्हणतात. तेथें वैराग्याचें काय काम! त्यालाच मिथ्या मानावें. ९५ भोग्य वस्तु जर नश्वर असत्या किंवा कांहीं मायिक असतें तर वैराग्य संभवलें असतें. पण तसें मिथ्या येथें कांहींच नाहीं, असें ते म्हणतात. ३९६.

जीवाच्या भोगपदार्थां । स्रक्चंदनादि वनिता । त्यांसीं प्रवाहरूपें नित्यता । म्हणती तत्त्वतां स्वमतें ॥ ९७ ॥ आत्मा आहे जग नाहीं । हें घडलेंचि नाहीं कंहीं । जळेंवीण समुद्र पाहीं । उरला नाहीं सर्वथा ॥ ९८ ॥ सृष्टि प्रवाहरूपें नित्य । पितृपुत्रत्वें अखंड वाहत । कर्मास्तव यातायात । सृष्टि अनित्य हें न घडे ॥ ९९ ॥ नित्यासी ईश्वरू कर्ता । हेंही न घडे गा तत्त्वतां । नित्याचा कोण नव्हे कर्ता । ईश्वरू सर्वथा येथ नाहीं ॥ ४०० ॥ वेदांतीं स्वरूपभूत । आत्मा ज्ञानस्वरूप म्हणत । हेंही न घडे गा येथ । ऐसें स्वमत बोलती ॥ १ ॥ घटपटाकार पाहतां । ज्ञानासी त्रिक्षणावस्था । आत्मा ज्ञानस्वरूप म्हणतां । लाज सर्वथा त्यां न ये ॥ २ ॥ एवं वेदांताच्या ठायीं । आत्मनिश्चयो दृढ नाहीं । मोक्ष म्हणती जो कांहीं । तोही पाहीं मिथ्याचि ॥ ३ ॥ इंद्रियसुखेंवीण सुख । मोक्ष म्हणती ते अविवेक । इंद्रियद्वारा जीवांसी हरिख । भोगितांही मूर्ख न मानिती ॥ ४ ॥ देहेंवीण विदेही । सुख भोगिजे कोणें कंहीं । अद्वैतवादी जल्पती कांहीं । तें सत्य नाहीं सर्वथा ॥ ५ ॥ जीवासी जेणें सुखप्राप्ती । तीं इंद्रियेंचि नाहीं म्हणती । डोळे फोडूनि देखणे होती । तैसी वदंती वेदांत्यां ॥ ६ ॥ येथ ईश्वरूचि नाहीं फुडा । मा तो फळ देईल हा बोल कुडा । अद्वैतवादी मूर्ख गाढा । नागवी मूढां वैराग्यें ॥ ७ ॥ गांव ठावो ना पदवी । तो मिथ्या ईश्वरु धरोनि जीवीं । कर्मनैराश्य करवी । अथवा सांडवी कर्मातें ॥ ८ ॥ नरदेहीं ज्ञान उपजलें । तेणें देहचि नाशिलें । फळें वृक्षमूळ छेदिलें । कोणीं देखिलें कोठेंही ॥ ९ ॥ ज्ञानाचे परिपाकदशें । म्हणती अवघा संसारूचि नाशे । सृष्टि प्रवाहरूपें नित्य असे । नित्य नासे कैसेनी ॥ ४१० ॥ मनुष्याचे हृदयींचें ज्ञान । तेणें संसाराचें निर्दळण । तरी खद्योततेजें जाळिले जाण । ग्रहगण शशी सूर्य

गंध, पुष्प, स्त्री, हे जीवाचे भोग्य पदार्थ आहेत. ते नेहमीं असल्यामुळें त्यांस नित्यत्व आहे, असें आपल्या मताप्रमाणें ते बोलतात. ९७ जलावांचून समुद्र असणें जसें सर्वथा शक्य नाहीं त्याचप्रमाणें आत्मा आहे आणि जगत् नाहीं असें केव्हांहि घडत नाहीं. ९८ जगांतल्या घडामोडी सारख्या चालू असल्यामुळें तेंहि नित्यच आहे. पिता-पुत्रांच्या रूपानें त्याचा व्यवहार सतत सुरू आहे. कर्मासाठीं ही सर्व यातायात आहे. तेव्हां सृष्टि अनित्य ठरत नाहीं. ९९ आणि जी नित्य वस्तु आहे, तिचा ईश्वर कर्ता असणें कसें शक्य आहे! कारण नित्य वस्तूला कर्त्याची मुळींच गरज नाहीं. म्हणून येथें ईश्वर सर्वथा नाहीं. ४०० वेदान्ती आत्म्याला ज्ञानस्वरूप म्हणतात, पण तें खरें नव्हे, असें ते आपलें मत प्रतिपादन करितात. १ घट-पट इत्यादि आकार पहात असतांना ज्ञानाची स्थिति तीन क्षण असते. असें असतांना आत्मा ज्ञानस्वरूप आहे असें म्हणण्यास त्यांना लाज कशी वाटत नाहीं, २ असें बोलून ते वेदान्तावरहि दृढ विश्वास ठेवीत नाहींत. वेदान्ती ज्याला मोक्ष म्हणतात तोहि मिथ्याच आहे. ३ इंद्रियजन्यसुखावांचून मोक्षसुख मिळतें हें त्याचें म्हणणें अविचाराचेंच आहे. कारण इंद्रियद्वारा सुखाचा प्रत्यक्ष अनुभव येत असूनहि हे मूर्खलोक त्याला मिथ्या म्हणतात! ४ देहावांचून विदेहत्वानें कोणी कधीं सुख भोगिलें आहे! हे अद्वैतवादी व्यर्थ बडबड करितात, ती खरी नव्हे. ५ ज्यांच्या योगानें जीवाला सुखाची प्राप्ति होते तीं इंद्रियेंच ते मिथ्या म्हणतात. डोळे फोडून डोळस होण्यासारखीच ही वेदान्त्यांची भाषा आहे. ६ ईश्वरच जर मुळांत खरा नाहीं, तर तो फल देतो हें बोलणेंहि खोटें आहे. अद्वैतवादी महामूर्ख असतात. म्हणूनच अज्ञलोकांना वैराग्याच्या मिषानें नागवितात. ७ ज्याला गांव नाहीं, ठिकाण नाहीं किंवा पदवी नाहीं, अशा मिथ्या ईश्वराची मनांत कल्पना करून ते जीवांकडून कर्माविषयीं अनास्था करवितात व त्यांना कर्मत्याग करावयास लावितात. ८ मनुष्यदेहांत ज्ञान प्राप्त झालें व ज्ञानानेंच देहाचा नाश केला! झाडाला फळ लागतांच त्या फळानेंच झाडाचें मूळ तोडून टाकिलें, असें कोणीं कोठें पाहिलें आहे का! ९ ज्ञान परिपक्व झालें म्हणजे सर्व संसार नाश पावतो, असें ते म्हणतात. पण सृष्टि प्रवाहरूपानें नित्य आहे. मग नित्याचा नाश कशानें होणार! ४१० मनुष्याच्या अंतःकरणांत ज्ञान प्रकट होतें व त्यामुळें संसाराचा बाध होतो, असें म्हणावयाचें म्हणजे काजव्यानें नवग्रहांचा समुदाय व चंद्र-सूर्य यांना जाळण्यासारखेंच आहे. ११ याप्रमाणें निवृत्त होऊं लागलें

॥ ११ ॥ एवं करूं जातां निवृत्ति । केले कष्ट ते मिथ्या होती । इंद्रियेंवीण सुखप्राप्ति । नव्हे निश्चितीं जीवासी ॥ १२ ॥ यालागीं निवृत्ति ते वृथा कष्ट । सर्वांसी प्रवृत्तिच अतिश्रेष्ठ । कर्मे करोनियां उद्भट । फळें वरिष्ठ भोगावीं ॥ १३ ॥ संसार म्हणती मायिक । ते जाणावे केवळ मूर्ख । संसारावेगळें सुख । नाहीं देख जीवासी ॥ १४ ॥ मनुष्याधिकारें सुखप्राप्ति । यालागीं देव मनुष्यत्व वांछिती । वेदांती मनुष्यत्व निंदिती । केवीं ते युक्ती मानावी ॥ १५ ॥ वेदें अधिकारू बोलिला । तो वेदूचि इहीं वेडा केला । यांचे लागला जो बोला । तो नागवला सर्वस्वें ॥ १६ ॥ वेदाचें वेदवचन । सर्वार्थीं तें प्रमाण । मिथ्या म्हणती तें वेदवचन । थोर सज्ञान हे जाले ॥ १७ ॥ ऐशी मीमांसकांची वदंती । नाना परींच्या चाळिती युक्ती । आपुलें मत स्थापिती । तें मिथ्या निश्चितीं उद्धवा ॥ १८ ॥ लापनिकाऐसें मिथ्या त्यांचें मत । अंगिकरूनि प्रस्तुत । प्रपंच अनर्थता दावित । दृढ स्थापित वैराग्यें ॥ १९ ॥

एवमप्यङ्ग सर्वेषां देहिनां देहयोगतः । कालावयवतः सन्ति भावा जन्मादयोऽसकृत् ॥ १६ ॥

म्हणे आइकें बापा उद्धवा । हा मिथ्या मतवादू आघवा । म्हणसी कैसेनि जाणावा । विवेक करावा मतांचा ॥ ४२० ॥ निवृत्ति ते केवळ कष्ट । म्हणती प्रवृत्ति अतिश्रेष्ठ । प्रवृत्तीमाजीं परम कष्ट । मरणअरिष्ट अनिवार ॥ २१ ॥ धरोनियां जन्ममूळ । अखंड लागलासे काळ । लवनिमिष पळपळ । काळ वेळ साधित ॥ २२ ॥ जैसें संवचोरांचें साजणें । तैसें काळाचें जोगवणें । वेळ आल्या जीवेंप्राणें । नाहीं राखणें सर्वस्वें ॥ २३ ॥ काळु न म्हणे हाट । न म्हणे अवसी पहांट । न म्हणे देश विदेश वाट ।

असतां केलेले श्रम मिथ्या होतात. जीवाला इंद्रियावांचून सुखप्राप्ति कधींच होत नाहीं. १२ यास्तव निवृत्ति हे वृथा कष्ट आहेत. सर्वांना प्रवृत्तीच अत्यंत श्रेष्ठ आहे. म्हणून प्रचंड कर्में करून स्वर्गप्राप्तीसारखीं उत्तम फळें भोगावीं. १३ जे संसाराला मायिक म्हणतात ते केवळ मूर्ख समजावे. जीवाला संसारावांचून दुसरें सुख नाहीं. १४ मनुष्यदेहांतच सुखाची प्राप्ति होते. म्हणून देवादिकांहि मनुष्यजन्माची इच्छा करितात आणि हे वेदान्ती त्या मनुष्यजन्माची निंदा करितात. १५ तेव्हां त्यांचें मत खरें कसें मानावें ! वेदानें अधिकार सांगितला, तर त्या वेदालाच यांनीं वेडा ठरविलें. १६ यांच्या नादीं जो लागला तो सर्वस्वीं नागवला. वेदाचें जें वेदवचन तें सर्वप्रकारें प्रमाण आहे. त्या वेदवचनालाहि मिथ्या म्हणणारे हे मात्र मोठे ज्ञानी ! १७ अशीं पूर्वमीमांसावाद्याचीं बोलणीं असतात. ते अनेक युक्ति-प्रयुक्तीनें जें आपलें मत प्रस्थापित करितात तें सर्वतोपरी मिथ्या आहे, असें हे उद्धवा ! तूं खात्रीनें समज. १८ आतां भगवान् त्यांचें हें मिथ्या शाब्दपांडित्य क्षणभर खरें मानून व प्रपंचदुःख दाखवून वैराग्याला दृढ करितात. ४१९.

—मीमांसकांच्या या म्हणण्याचा अंगीकार करून वैराग्याचें उपपादन करण्यासाठीं प्रवृत्तिमार्ग अनर्थाचा हेतु आहे, ही गोष्ट सविस्तर सांगतात—

एवं अपि अङ्ग—अरे बा उद्धवा ! असें जरी असलें तरी, सर्वेषां देहिनां देहयोगतः कालावयवतः जन्मादयः भावाः असकृत् सन्ति—सर्व प्राण्यांच्या देहसंबंधामुळें व काळाच्या संवत्सरादिरूप अवयवांमुळें जन्मादि भावविकार वारंवार होतात. १६.

श्रीकृष्ण म्हणाले बाबा उद्धवा ! हा सर्व मतवाद मिथ्या आहे, हें कसें जाणावें, असें जर म्हणशील, तर ऐक ! त्या मतांचा विवेक करावा. ४२० मीमांसक म्हणतात कीं, निवृत्ति केवल क्लेशकारक आहे व प्रवृत्ति अति श्रेष्ठ आहे. परंतु प्रवृत्तींतच अधिक कष्ट आहेत. त्यांत मरण हें अनिवार्य अरिष्ट आहे. २१ जन्ममूळ हातांत घेऊन काळ अखंड पाठीस लागला आहे आणि तो एकेक निमिष व पळ साधित असतो. २२ सावाचें सोंग आणणाऱ्या चोराची मैत्री वरून अशी मोठी प्रेमळ भासते, तसेंच काळाचें लालनपालन आहे. वेळ आली कीं, तो जीवानिशीं सर्वस्व हरण करितो. २३ कांहीं शिल्लक ठेवीत नाहीं. काळ कधीं असें म्हणत नाहीं कीं, हा बाजार

नाशी उद्धट निजतेजें ॥ २४ ॥ करितां प्रवृत्तीचे कष्ट । अवचितां मृत्यूचा चपेट । अंगीं वाजे जी उद्धट । अहा कटकट ते काळीं ॥ २५ ॥ जीवीं वासनेचा थोर हांवा । म्हणे गेलों मेलों धांवा पावा । कोण निवारी मृत्युप्रभावा । उपावो तेव्हां चालेना ॥ २६ ॥ काळु मारोनि नोसंडी । यातना भोगवी गाढी । सर्वेचि गर्भवासीं पाडी । जेथ दुःखकोडी अनिवार ॥ २७ ॥ मातेच्या जठरकुहरीं । विष्ठामूत्रांच्या दाथरीं । अधोमुख नवमासवरी । उकडी भारी जठराग्नी ॥ २८ ॥ विष्ठालेपु चहूंकडे । नाकीं तोंडीं कृमी किडे । गर्भवासींचे कष्ट गाढे । कोणापुढें सांगेल ॥ २९ ॥ कटुवम्ललवणमेळें । गर्भवतीचे पुरती डोहळे । त्वचेवीण गर्भांग पोळे । तेणें दुःखें लोळे अतिदुःखी ॥ ४३० ॥ ते गर्भोदरींची व्यथा । नेणती माता आणि पिता । तेथ नाहीं कोणी सोडविता । जीवींची व्यथा जीव जाणे ॥ ३१ ॥ ज्या ठायाची करूं नये गोठी । प्रकट दाऊं नये दिठी । ते योनिद्वारें अतिसंकटीं । जन्म शेवटीं जीवासी ॥ ३२ ॥ जे नित्य मूत्राची न्हाणी । कीं नवया नरकाची खाणी । जे रजस्वलारुधिराची श्रेणी । जन्म तेथोनि पावती ॥ ३३ ॥ अपवित्र विटाळशीचें रुधिर । तें गोठोनि जालें शरीर । निंद्यद्वारें जन्मोनि नर । आम्ही पवित्र म्हणविती ॥ ३४ ॥ गर्भवासाहूनि गाढें । दुःख कोण आहे पुढें । मतवादी बोले तें कुडें । सुख नातुडे प्रवृत्ती ॥ ३५ ॥ एके जन्में जन्म न सरे । एके मरणें मरण नोसरे । कोटि कोटि जन्मांचे फेरे । काळ योनिद्वारें करवितु ॥ ३६ ॥ पुढतीं जन्म पुढतीं मरण । अनिवार लागलें जाण । प्रवृत्तीमाजीं सुख कोण । दुःख दारुण भोगवी ॥ ३७ ॥ जन्ममरणांमाजिले संधी । आणिकही थोर दुःख बाधी । त्या दुःखाची

आहे, हा नदीचा घाट आहे, आतां पूर्वरात्र आहे, आतां पहाट आहे, तो स्वदेश, परदेश, कांहीं पहात नाहीं. तो आपल्या तेजानें भयंकर नाश करितो. २४ प्रपंचाचें कष्ट सोशीत असतां अकस्मात् मृत्यूचा तडाका अंगावर मोठ्या जोरानें बसतो. त्यावेळीं फार कष्ट होतात. २५ जीवामध्यें वासनांचा फार मोठा सांठा असतो. त्यामुळें तो मरणकालीं गेलों, मेलों, धांवा, या असा आक्रोश करीत असतो. पण त्यावेळीं मृत्यूच्या प्रभावाचें निवारण कोण करणार ! त्याच्यापुढें कांहीं उपाय चालत नाहीं. २६ काळ नुस्ता मारूनच सोडीत नाहीं, तर भयंकर यातना भोगावयास लावितो व लगेच ज्यांत अनिवार दुःखाच्या राशी आहेत अशा गर्भवासांत टाकितो. २७ जठराग्नि मातेच्या उदररूपी गुहेंत मलमूत्राच्या चिखलांत नऊ महिनेपर्यंत अधोमुख स्थितींत त्याला नुस्ता शिजवीत असतो. २८ चोहोंबाजूंनीं विष्ठेचा लेप लागतो. नाका-तोंडांत जंतु, किडे शिरतात. हें गर्भवासांतील भयंकर दुःख कोणाला सांगावयाचें ! २९ गरोदर स्त्री कडु, आंबट, तिखट वगैरे पदार्थ खाऊन आपले डोहाळे पुरविते; परंतु गर्भामध्यें त्वचेवांचून असलेलें याचें कोवळें अंग त्या दाहक पदार्थांनीं पोळत असतें व त्यामुळें तो दुःखानें अतिशय विव्हल होऊन गडबडां लोळत असतो. ४३० ती उदरांतील गर्भाला होणारी व्यथा आई-बापांना समजत नाहीं. तेथें कोणीहि सोडविणारा नसतो. ते जीवाचे क्लेश जीवच जाणे. ३१ स्त्रीशरीराच्या ज्या गुह्य भागाचा कोणी तोंडानें नुस्ता उच्चारहि करीत नाहीं, किंवा जो ती कोणाच्या दृष्टीस पडूं देत नाहीं, त्या द्वारानें जीव मोठ्या संकटानें शेवटीं जन्मास येतो. ३२ जो भाग नित्य मूत्राची मोरी किंवा रोज नव्या नरकाची खाणच, किंवा विटाळशीचें रक्त वाहण्याचें द्वार, तेथून जीव जन्म पावतो. ३३ विटाळशीचें अपवित्र रक्त गोठून हें शरीर बनतें. अशा अमंगल द्वारानें जन्मास येऊन मनुष्य स्वतःला मोठा पवित्र म्हणवितो. ३४ पण या गर्भावस्थेहून दुसरें कोणतें दुःख अधिक भयंकर आहे बरें ! सारांश, हे जड कर्मवादी मीमांसक जें म्हणतात तें खोटें आहे. प्रवृत्तींत सुख मुळींच नाहीं. ३५ एक जन्म घेऊन पुढील गर्भवास सरत नाहीं. किंवा एकदां मरण आलें कीं, त्यांची पुढली परंपरा टळत नाहीं. कोट्यवधि जन्म-मरणांचे फेरे काळ योनिद्वारां करवीत असतो. ३६ पुनः जन्म, पुनः मरण, हें चक्र सतत चाललें आहे. अशा प्रवृत्तींत सुख कसलें असणार ! अपार दुःख मात्र भोगावें लागतें. ३७ जन्म आणि मरण या दोहोंच्या मधल्या काळांतहि अतिशय दारुण दुःखें भोगावीं लागतात.

दुःखसिद्धी । ऐक त्रिशुद्धी सांगेन ॥ ३८ ॥ धाडीभेणें पळतां थोर । आडवे नागवती चोर । तैसें जन्ममरणांचें अंतर । षड्विकार राखती ॥ ३९ ॥ षड्विकारांच्या. पतिव्रता । षडूर्मी लागल्या जीविता । एवं प्रवृत्तीमाजीं परम व्यथा । सुख सर्वथा असेना ॥४४०॥ कर्मवादियांच्या मतां । जीवू स्वतंत्र कर्मकर्ता । म्हणती ते मिथ्या वार्ता । परतंत्रता प्रत्यक्ष ॥ ४१ ॥

अत्रापि कर्मणां कर्तुरस्वातंत्र्यं च लक्ष्यते । भोक्तुश्च दुःखसुखयोः को न्वर्थो विवशं भजेत् ॥ १७ ॥

जीवासी असती स्वतंत्रता । तरी तो दुःखभोगू न भोगितां । सदा सुखीची असता । पापें न करिता अळुमाळु ॥ ४२ ॥ जीवू बापुडें सदा दीन । कर्मे करूनि कर्माधीन । कर्मफळदाता तो भिन्न । सुखदुःखें जाण तो भोगवी ॥ ४३ ॥ यालागीं ईश्वराची सत्ता । तो कर्मफळाचा दाता । जीवु सुखदुःखांचा भोक्ता । स्वतंत्रता त्या नाहीं ॥ ४४ ॥ ऐसें लक्षितां लक्षण । जीवू तितका पराधीन । पराधीनपणें जाण । भोगी दारुण सुखःदुःख ॥ ४५ ॥ मजलागीं दुःख होआवें । ऐसें कोणी भाविना जीवें । न वांछितां दुःख पावे । येणें न संभवे स्वतंत्रता । ॥ ४६ ॥ श्रुतिस्मृतींतें विचारितां । जीवासी नाहीं स्वतंत्रता । पराधीनपणें वर्ततां । भोगी अप्रार्थितां सुखदुःख ॥ ४७ ॥ वादी परिहार करिती । सांग कर्म जे नेणती । ते ते जीव दुःखी होती । सुख पावती कर्मज्ञ ॥ ४८ ॥ जे सदाचार श्रोत्री । जे याज्ञिक अग्निहोत्री । जे उभयलोकव्यापारी । सांग करीत कर्मातें ॥ ४९ ॥ जे अविकळ अव्यंग । कर्मे करूनियां सांग । उभय लोकीं सुखभोग । कर्मयोग भोगिती ॥ ४५० ॥ कर्मी ज्याची योग्यता । तो सुखभोगाचा भोक्ता । हेंही न घडे गा सर्वथा । । ऐक आतां सांगेन ॥ ५१ ॥

त्या दुःखाचा प्रकार सांगतों, तो आतां ऐक. ३८ ज्याप्रमाणें चोर गांठतील या भीतीनें जों त्वरेनें पळत सुटावें, तों वाटेंत चोर आडवे येऊन लुटून नेतात. ३९ त्याप्रमाणें जन्म-मरणांच्या मधला काळ षड्विकाररूपी चोर लुटून नेतात. षड्विकारांच्या क्षुधा, तृषा, जन्म, मरण, सुख व दुःख या सहा पतिव्रता ऊर्मि जीवाला बिलगतात. सारांश प्रवृत्तींत असें अत्यंत दुःख आहे, सुख मुळींच नाहीं. ४४० कर्मवाद्यांच्या मतें जीव स्वतंत्र कर्म करणारा आहे. पण हेंहि त्यांचें म्हणणें खोटें आहे. कारण जीवाचें पारतंत्र्य प्रत्यक्षच दृष्टीस पडतें. ४४१.

अत्र अपि कर्मणां कर्तुः अस्वातंत्र्यं लक्ष्यते–या पक्षींहि कर्मकर्त्यांचें अस्वातंत्र्य प्रत्ययाला येतें. तसेंच, दुःखसुखयोः भोक्तुः च–दुःखसुखांच्या भोक्त्याचेंहि अस्वातंत्र्य प्रवीत होतें. विवशं कः नु अर्थः भजेत्–पराधीन असलेल्या प्राण्याला कोणता अर्थ प्राप्त होणार ! [जीव जर खरोखर स्वतंत्र असता तर त्यानें दुष्कर्म केलें नसतें व दुःखहि भोगिलें नसतें.] १७.

जीवाला जर स्वातंत्र्य असतें तर त्यानें दुःखभोग भोगिले नसते. तो निरंतर सुखीच राहिला असता. पापाचा लेशहि त्यानें आचरिला नसता. ४२ परंतु जीव बिचारा सर्वदा दीन आहे. तो कर्मे करून कर्माच्या अधीन होतो. कर्मफल देणारा वेगळाच आहे. तो सुख-दुःख भोगवितो. ४३ यास्तव ईश्वराची सत्ता मानावी लागते. ईश्वर कर्मफल देणारा व जीव सुख-दुःख भोगणारा आहे. जीवाला स्वतंत्रता नाहीं. ४४ या लक्षणावरून जेवढा जीव तेवढा पराधीन आहे व त्या पराधीनतेमुळें तो दारुण दुःख भोगीत असतो. ४५ हें सहज लक्ष्यांत येतें. ‘ मला दुःख व्हावें ’ असें कोणीहि मनांत इच्छीत नाहीं. परंतु इच्छा नसतांहि दुःख प्राप्त होतें. यावरून त्याला स्वतंत्रता असणें संभवत नाहीं. ४६ श्रुतिस्मृतींचा विचार केला असतांहि ‘ जीवाला स्वतंत्रता नाहीं, तो पराधीनपणानें वागत असतो. त्याला सुख-दुःखाची प्राप्ति न मागतांच होत असते ’ हाच सिद्धान्त निश्चित होतो. ४७ कर्मवादी यावर असें उत्तर देतात कीं, जे जीव सांग कर्मे करीत नाहींत ते दुःख भोगितात व कर्म जाणणारे सुखी होतात. ४८ सदाचारसंपन्न श्रोत्रिय किंवा याज्ञिक, अग्निहोत्री इह व परलोकीं सुख मिळण्यासाठीं सांग कर्मे करितात. ४९ ते सुदृढ व निरोगी कर्मज्ञ सांग कर्मानें दोन्ही लोकांतील सुखांचा उपभोग घेतात. ४५० परंतु कर्म करण्याची ज्यांना योग्यता आहे तेहि केवळ सुखच भोगितात असेंहि कधीं घडत नाहीं. तेंहि आतां सांगतों, ऐक. ४५१.

न देहिनां सुखं किंचिद्विद्यते विदुषामपि । तथा च दुःखं मूढानां वृथाहंकरणं परम् ॥ १८ ॥

कर्माचे जे तत्वतां ज्ञाते । तेही दुःखी देखों येथें । सुखी देखिजे मूर्खांतें । जे कर्मातें नातळती ॥ ५२ ॥ चुकोनि यज्ञपुरुषा अच्युतातें । अग्निहोत्री करिती यागातें । तें स्वकर्मची त्यांचें त्यांतें । विपरीतार्थें फळतसे ॥ ५३ ॥ अग्नि तो तंव स्वरूप माझें । श्रुतिमंत्र ते तंव माझीं बीजें । आणि होमद्रव्य जें जें । तेंही माझें स्वरूप ॥ ५४ ॥ ऐशिया मज सर्वगतातें । नास्तिक्य देवोनि निजचित्तें । अनीश्वरवादी करिती यागातें । तोचि त्यांतें बद्धक ॥ ५५ ॥ स्रुक् स्रुवा प्रणीतापात्र । मांडूं शिकले कर्मतंत्र । मज निजात्मयाचें चुकले सूत्र । तेणेंचि अपवित्र तो यागू ॥ ५६ ॥ सकळ हें सर्वमुखीं । मज अर्पितसे यज्ञपुरुखीं । हें न मनिजे याज्ञिकीं । बुद्धि अल्प कीं सकाम ॥ ५७ ॥ मज न अर्पितां जें सुकृत । तेंचि जाण दुःख दुरित । विषा नांव अमृत म्हणत । तैसें सुकृत सकाम ॥ ५८ ॥ मातें न पवतां जो स्वर्ग । तो जाणावा उपसर्ग । तेथींचा भोग तो महारोग । मूढ उद्योग याज्ञिकां ॥ ५९ ॥ कर्मी कर्म विगुण होत । तेथ स्मरावा मी अच्युत । नामें न्यून तें संपूर्ण होत । हें सामर्थ्य नामाचें ॥ ४६० ॥ तो मी अंगें आपण । याज्ञिकां मागों गेलों अन्न । मज नेदितीच ते ब्राह्मण । कर्मठपण तें कर्माचें ॥ ६१ ॥ मज यज्ञपुरुषातें सांडून । करिती इंद्रादिकांचें भजन । ते इंद्रादिक मजअधीन । कर्मवैगुण्य हें त्यांसी ॥ ६२ ॥ जे कर्म न करिती कृष्णार्पण । त्यांचें माळिण प्राक्तन । तेणें इहलोकीं दरिद्रता जाण । पडे विघ्न परलोकीं

—पण जे कर्म चांगल्याप्रकारें करण्यास जाणतात ते सुखीच असतात आणि जे कर्म चांगल्याप्रकारें कसें करावें हें जाणत नाहींत, तेच दुःखी होतात, असें जर म्हणशील तर सांगतों—

विदुषां अपि देहिनां किंचित् सुखं न विद्यते—विद्वान् जीवांनाहि कांहीं प्रसंगीं सुख मिळत नाहीं. तथा च मूढानां दुःखं—तसेंच मूढांनाहि कांहीं कांहीं प्रसंगीं दुःख होत नाहीं, परं वृथा अहंकरणम्—यास्तव आम्ही कर्मकुशल आहों, म्हणून सुखी आहोंत, हा त्यांचा केवळ वृथा अहंकार आहे. १८.

जे कर्माला तत्त्वतः जाणणारे असतात, तेहि या लोकीं दुःखी असलेले दिसतात आणि जे मूर्ख लोक कर्माला स्पर्शहि करीत नाहींत ते सुखी दिसतात. ५२ यज्ञपुरुष जो भगवान् त्याला सोडून अग्निहोत्री यज्ञ करितात. पण त्यांचें तें स्वकर्म त्यांना विपरीत फल देतें. ५३ त्यांचा तो अग्नि तर माझेंच स्वरूप आहे व श्रुतींतील मंत्रहि माझींच बीजें आहेत आणि जीं होमद्रव्यें आहेत तीं सर्व माझेंच स्वरूप आहे, असें तूं जाण. पण अशा मज सर्व व्यापकाला आपल्या मनानें नास्तित्व देऊन ते अनीश्वरवादी यज्ञ करितात व तोच यज्ञ त्यांना बद्ध करितो. ५५ ते स्रुक्, स्रुवा, प्रणितापात्र इत्यादि यज्ञांतील उपकरणांची मांडणी करण्यास उत्तमप्रकारें शिकलेले असतात. ते कर्माचें तंत्र जाणितात. पण मज आत्मारामाच्या आत्मज्ञानाचा मार्ग जाणत नाहींत, त्यामुळें तो यज्ञ अपवित्र होतो. ५६ वस्तुतः त्याचें तें सर्व कर्म मज विश्वतोमुख यज्ञपुरुषालाच प्राप्त होतें, पण विषयोपभोगाविषयींच्या इच्छेमुळें किंवा मंदबुद्धीमुळें याज्ञिक हें जाणत नाहींत. ५७ ते आपलें सुकृत मला अर्पण करीत नाहींत हेंच त्यांचें दुःखप्रद पातक आहे. सकाम कर्माला पुण्य म्हणणें म्हणजे विषाला अमृत म्हणण्यासारखें आहे. ५८ मला प्राप्त न होतां मिळणारा स्वर्ग विघ्नच आहे, असें जाणावें. त्या स्वर्गांतील भोग म्हणजे महारोगच होत. यज्ञ करणारांचा हा उद्योग केवळ मूर्खपणाचा आहे. ५९ कर्म करितेवेळीं त्या कर्मांत जर कांहीं दोष घडला तर मज अच्युताचें स्मरण करावें, म्हणजे माझ्या केवळ नांवानेंच सर्व उणीव भरून निघते. इतकें त्या नामाचें सामर्थ्य आहे. ४६० पण ज्याच्या नांवाचें असें सामर्थ्य आहे तो मी स्वतः याज्ञिकांजवळ अन्न मागावयास गेलों. पण त्या ब्राह्मणांनीं मला तें दिलें नाहीं. हेंच तें कर्माचें कर्मठपण आहे. ६१ मी जो यज्ञपुरुष त्याला सोडून ते इंद्रादिकांचें भजन करितात; पण ते इंद्रादिक माझ्या अधीन आहेत. त्यांच्या कर्मामध्यें हाच कमीपणा आहे. ६२ जे आपलें कर्म कृष्णार्पण करीत नाहींत, त्यांचें दैव खोटें आहे. त्यामुळें तो या लोकीं दारिद्र्य भोगितो व परलोकीं संकटांत पडतो. ६३ ज्याप्रमाणें तोंड चुक-

॥ ६३ ॥ चूकवूनियां निजमुख । सर्वांगीं खिरीसाकरेचा देख । लेपू देतां न वचे भूक । अधिक दुःख तेणें होय ॥ ६४ ॥ तैसें मज चुकवूनि यज्ञपती । जे यागातें आचरती । बाळविधवे गर्भप्राप्ती । तैशीं फळें येती त्या यागा ॥ ६५ ॥ कर्मउद्देशें द्रव्य मागतां । यज्ञफळ ने द्रव्यदाता । याज्ञिक तो राहे रिता । मी कर्ता हा अभिमानु ॥ ६६ ॥ जैसा चाटू खिरीआंतु । चाटुवेंचि खिरी वाढिजेतु । चाटू खरकटल्या सांडितु । भोक्ते भोगितु परमान्न ॥ ६७ ॥ सरस ऊंस घालिजे घाणा । रस पिळूनि भरे भाणा । रिता चोपटीं करकरी घाणा । ते गती जाण याज्ञिकां ॥ ६८ ॥ तैसे याज्ञिक यज्ञ आचरत । द्रव्यदात्यासी तें फल होत । पशुहिंसा याज्ञिकां प्राप्त । दोषी होत अभिमानें ॥ ६९ ॥ एवं कर्मकुशळ याज्ञिक । यापरी ते भोगिती दुःख । कर्म नेणती जे मूर्ख । ते परम सुख भोगिती ॥ ४७० ॥ नेणती कर्माच्या घडामोडी । परी माझी श्रद्धा पोटीं गाढी । तेणें उल्लंघोनि दुःखकोडी । निजात्मगोडी भोगिती ॥ ७१ ॥ कर्मीं कर्मादरू नेणत । माझ्या ठायीं श्रद्धायुक्त । भाळे भोळे माझे भक्त । सुख अनंत पावले ॥ ७२ ॥ काय केलें गोपाळीं । जे अखंड मजसवें गोकुळीं । भोगिली निजसुखनव्हाळी । करोनि होळी कर्मांची ॥ ७३ ॥ पाहतां गोपिकांचें कर्म । कर्ममार्गीं निंद्य धर्म । पावल्या माझें परम धाम । जीवीं पुरुषोत्तम आवडला ॥ ७४ ॥ खगमृगगोसर्पादि समस्त । माझे निजपदीं झाले प्राप्त । याज्ञिकां कर्माभिमान बहुत । दुःख भोगित निजकर्में ॥ ७५ ॥ केवळ कर्मठ कर्मजड । आम्ही सर्वज्ञ ज्ञाते दृढ । हा अभिमान धरिती मूढ । दुःख वाड तयांसी ॥ ७६ ॥ दीपीं पतंगा मरण देख । तो उडी घालितां मानी सुख । तैसें कर्मठां कर्म केवळ दुःख । मानिती सुख

वून सगळ्या अंगाला जरी खीर व साखर यांचा लेप केला तरी भूक शांत होत नाहीं, उलट जास्त व्यथा मात्र होते. ६४ त्याप्रमाणें जे यज्ञ करणारे मला चुकवून यज्ञ करितात त्यांना बालविधवेला गर्भप्राप्ति होण्यासारखें विपरीत फल मिळतें. ६५ यज्ञादि कर्में करण्यासाठीं दुसऱ्यापाशीं द्रव्य मागितलें कीं, त्या यज्ञाचें फल त्या द्रव्य देणाराला मिळतें व यज्ञ करणारा 'मी कर्ता' असा वृथा अभिमान बाळगून रिकामाच रहातो. ६६ खीर वाढण्याची पळी जशी खिरींतच असते, ती पळीच खीर वाढीत असते परंतु शेवटीं तिला खरकटी म्हणून टाकून देतात व खाणारे मात्र खीर खाऊन तृप्त होतात. ६७ उत्तम ऊंस घाण्यांत घातला, तर तो घाणा रस पिळून भांडें भरितो व स्वतः रिकामा होऊन नीरस चोयट्या करकर चघळीत असतो, त्या घाण्यासारखी याज्ञिकांची स्थिति होते. ६८ त्याच्यासारखेच याज्ञिक यज्ञ करितात, यज्ञाचें फल द्रव्य देणाराला मिळतें व यज्ञांत केलेली पशुहिंसा व अभिमानाचा दोष मात्र याज्ञिकाला लागतो. ६९ याप्रमाणें कर्म करण्यांत निष्णात असलेले याज्ञिक असें दुःख भोगितात व कर्म न करणारे मूढलोक परम सुख भोगितात. ४७० त्यांना कर्माची खटाटोप ठाऊक नसते; परंतु माझ्यावर मात्र त्यांची दृढ श्रद्धा असते, त्यामुळें ते दुःखाच्या राशींतून पार पडून आत्मसुखाची गोडी चाखितात. ७१ त्यांना कर्मांमध्यें कसा आदर ठेवावा, हें कळत नाहीं; परंतु त्यांची मजवर अत्यंत भक्ति असते. त्यामुळें ते माझे भाळेभोळे अज्ञ भक्त परम सुखाला प्राप्त होतात. ७२ माझ्याबरोबर गोकुळांत सतत असणाऱ्या गोपांनीं कोणतें कर्म केलें होतें ! पण त्यांनीं कर्मांची होळी करून नित्य नव्या सुखाचा उपभोग घेतला. ७३ गोपींचें कर्म जर पाहिलें तर कर्ममार्गांत तो निंद्य धर्मच ठरतो; परंतु त्यांना पुरुषोत्तम अंतःकरणापासून आवडल्यामुळें त्याहि माझ्या परम धामाला प्राप्त झाल्या. ७४ इतकेंच नव्हे तर पशु, पक्षी, गायी, सर्प इत्यादि सर्व प्राणी माझ्या पदाला पावले. पण याज्ञिकांना कर्माभिमान फार असल्यामुळें ते आपल्या कर्मामुळेंच दुःख भोगितात. ७५ केवळ कर्मांतच निमग्न होणारे ते कर्मठ मूर्ख असतात. परंतु 'आम्ही सर्वज्ञ, मोठे जाणते' असा अभिमान ते मूढ धरितात, त्यामुळें त्यांना फार दुःख भोगावें लागतें. ७६ दिव्यावर उडी टाकतांच पतंगाला मरण येतें; परंतु तो उडी टाकण्यांत फार सुख मानितो, त्याप्रमाणें कर्मठांना कर्म केवळ दुःखांत टाकणारें असून ते अभि-

अभिमानें ॥ ७७ ॥ अभिमानेंचि सर्वथा । नसती जीवासी ह्मणे स्वतंत्रता । तेंही न घडे विचारितां । ऐक आतां सांगेन ॥ ७८ ॥

यदि प्राप्तिं विघातं च जानन्ति सुखदुःखयोः । तेप्यद्धा न विदुर्योगं मृत्युर्न प्रभवेद्यथा ॥ १९ ॥

दुःख निरसूनि सुखप्राप्ती । यालागीं कर्में आचरती । कर्मवादी ज्ञाते म्हणविती । तेही नेणती दुःखनाशू ॥ ७९ ॥ कर्में करितां नाशू नोहे । ऐसें दुःख कोण आहे । पुसशील तरी पाहें । यथान्वयें सांगेन ॥ ४८० ॥ मरणावरतें दुःख चढे । ऐसें दुःख तंव नाहीं पुढें । तें निवारूं नेणती बापुडे । अतिबळ गाढें मृत्यूचें ॥ ८१ ॥ आंतु घालितां हातु पोळे । तेणें उन्हपणें घर न जळे । तैसा कर्में मृत्यू न टळे । प्रबळबळें अनिवार ॥ ८२ ॥ मारिता मृत्यू जेणें मारिजे । तो उपावो कर्मठीं नेणिजे । कर्मामाजीं जेणें असिजे । अचुक पाविजे तेणें मृत्यू ॥ ८३ ॥ अंतीं येईल मरणदुःख । जंव जीजे तंव भोगिजेल सुख । हें बोलणें बोलती मूर्ख । जितां सुख त्यां कैंचें ॥ ८४ ॥

को न्वर्थः सुखयत्येनं कामो वा मृत्युरन्तिके । आघातं नीयमानस्य वध्यस्येव न तुष्टिदः ॥ २० ॥

जितांही सुखाची वार्ता । कर्मठां नाहीं सर्वथा । तेही सांगेन मी कथा । ऐक आतां उद्धवा ॥ ८५ ॥ विखें रांधिलें मिष्टान्न । तें गोड न म्हणती सज्ञान । पुढें देखोनियां मरण । निःशेष तें अन्न सांडिती ॥ ८६ ॥ आगी लागलिये घरीं । क्षण न राहिजे चतुरीं । मरण नादळतां उरीं । सांडूनि

मानानें त्यांत मोठें सुख मानितात. ७७ ते केवळ अभिमानानेंच जीवाला नसलेली स्वतंत्रता आहे असें म्हणतात; पण विचारानें पाहिलें तर तें खरें नव्हे. तेंच आतां सांगतों, ऐक. ४७८.

—आतां विद्वानांना दुःख होत नाहीं हें गृहीत धरून भगवान् म्हणतात—

यदि सुखदुःखयो प्राप्तिं विघातं च जानान्ति–विद्वान् लोक सुखाची प्राप्ति व दुःखांचा विघात कसा करावा, हें जाणतात असें जरी मानिलें तरी, ते अपि यथा अद्धा मृत्युः न प्रभवेत् तं योगं न विदुः–तेहि ज्याप्रकारें साक्षात् मृत्यु मारण्यास समर्थ न होईल असा उपाय जाणत नाहींत. १९.

कर्मवादी दुःखाचें निवारण होऊन सुखाची प्राप्ति व्हावी म्हणून कर्में आचरितात व आपल्याला मोठे जाणते म्हणवितात. पण दुःखाचा नाश कशानें होतो, हें मात्र त्यांना ठाऊक नसतें. ७९ कर्में करूनाहि नाश न पावणारें दुःख कोणतें असें विचारशील तर तेंहि यथाक्रम सांगतों. ४८० मरणाहून वरचढ असें दुसरें कोणतेंच दुःख नाहीं. त्याचें निवारण कसें करावें हें त्या बिचाऱ्यांना कळत नाहीं. मृत्यूचें सामर्थ्य अत्यंत अनिवार्य आहे. ८१ कढत पाण्यांत हात घातला तर तो पोळतो. पण त्या पाण्यानें घर कांहीं जळत नाहीं. त्याप्रमाणें अतिशय सामर्थ्यवान् मृत्यूला कर्में आचरून टाळतां येत नाहीं. ८२ सर्वांचा मारक असलेला जो मृत्यु त्यालाहि मारितां येईल असा उपाय कर्मठांना ठाऊक नसतो. त्यामुळें ते कर्मांतच दंग असतात व अचुक मृत्युमुखांत पडतात. ८३ शेवटीं मरणाचें दुःख येणारच आहे, म्हणून जिवंत असेपर्यंत सुख भोगून घ्यावें, असें जे मूर्ख लोक बोलतात, त्यांना जिवंतपणीं तरी सुख कोठचें! ४८४.

—तरीपण यावज्जीव सुख होईल म्हणून म्हणशील तर तेंहि शक्य नाहीं, असें भगवान् सांगतात—

एनं कः नु अर्थः कामः वा सुखयति–या पुरुषाला कोणता बरें विषय अथवा अभिलाष सुख देतो! **आघातं नियमानस्य वध्यस्य इव अंतिके मृत्युः न तुष्टिदः**–कारण वधस्थानाकडे नेल्या जाणाऱ्या वध्य पुरुषाला उत्तम विषयहि जसे सुखकर होत नाहींत, त्याप्रमाणें समीप असलेला मृत्यु कोणालाहि संतोष देणारा होत नाहीं. २०.

हे उद्धवा! कर्मठांना जिवंतपणींहि रेसभरसुद्धां सुख कसें मिळत नाहीं, ती कथा मी आतां सांगतों, ऐक. ८५ विष घालून मिष्टान्न तयार केलें, तर त्याला शाहाणीं माणसें मिष्टान्न म्हणत नाहींत. त्यांत आपलें मरण आहे, हें जाणून तें पक्वान्न टाकून देतात. ८६ किंवा घराला आग लागली तर त्या घरांत विचारी मनुष्य

दूरीं पळताती ॥ ८७ ॥ धाडी आल्या निजद्वारीं । गोड न लगे साकरखिरी । तैसा मृत्यू आलिया शरीरीं । विषयाकारीं सुख कैंचें ॥ ८८ ॥ दाढीसी लागलिया आगी । तो शृंगारू न मनीं मुखालागीं । तैसा नीच नवा मृत्यु अंगीं । विषयसंगीं सुख कैंचें ॥ ८९ ॥ उठिल्या मरणान्त व्यथा । जन धन अन्न आणि कान्ता । सुख नेदितीच सर्वथा । जाली वृथा समूळ ॥ ४९० ॥ अंतकाळीं स्त्रीधन । जालीं दुःखासीच कारण । त्यांसी सांडूनि न निघती प्राण । तळमळी जाण प्राणांतीं ॥ ९१ ॥ जैसा सुळीं द्यावया जो नेइजे । त्यासी नाना समारंभू कीजे । मुखीं घालिती पंचखाजें । तेणें तो नव्हीजे सुखिया कीं ॥ ९२ ॥ तैसें संमुख असतां मरण । विषयसुखें सुखावें कोण । विषय त्यागिती सज्ञान । मूर्खासी जाण आसक्ती ॥ ९३ ॥ देहदुःखाची अर्धघडी । नाशी विषयसुखाची कोडी । विषयालागीं शिणती वेडीं । अविनाश गोडी निर्विषयीं ॥ ९४ ॥ एवं या लोकांच्या ठायीं । सुख सर्वथैव नाहीं । लोकांतरीं म्हणती कांहीं । न घडे तेंही उद्धवा ॥ ९५ ॥

श्रुतं च दृष्टवद्दुष्टं स्पर्धासूयात्ययव्ययैः । बह्वन्तरायकामत्वात्कृषिवच्चापि निष्फलम् ॥ २१ ॥

जैसा देखिला हा लोक । तैसाचि श्रुत स्वर्गादिक । अनादि दोषयुक्त देख । सदोष मूर्ख वांछिती ॥ ९६ ॥ स्वर्गीं म्हणसी दोष कोण । ऐक तयांचें लक्षण । स्पर्धा असूया नाश जाण । तप क्षीण दिविं भोगें ॥ ९७ ॥ तपसंपत्ति समान पाही । स्पर्धा मांडी त्याच्या ठायीं । मजसमान भोगू

क्षणभरहि उभा रहात नाहीं. साक्षात् मृत्यु अंगावर येण्यापूर्वींच तो तेथून दूर पळतो. ८७ आपल्या दारावर घाला आला असतां घरांत खीर, साखर खात बसणें गोड तरी लागेल काय ! त्याप्रमाणें देहाला मरण आहे हें जाणल्यावर विषयांमध्यें सुख कोठचें ! ८८ दाढीला आग लागली असतां मनुष्य मुखाला शृंगारण्याचें जसें मनांतहि आणीत नाहीं. तसेंच, नित्य नवा मृत्यु शरीराशीं झगडत असतां विषयसंगांत सुख वाटत नाहीं ! ८९ एकदां मरणाच्या यातना होऊं लागल्या कीं, मग आप्त, द्रव्य, अन्न, पत्नी या कशापासूनहि सुख होत नाहीं. तीं सर्व समूळ व्यर्थ होतात. ४९० मरणकाळीं द्रव्य आणि स्त्री हींच दुःखाला कारण होतात. प्राण त्यांना सोडून जाण्यास तयार नसतात, त्यामुळें अंतकाळीं जीवाची तळमळ होत असते. ९१ ज्याप्रमाणें सुळावर देण्यासाठीं नेल्या जाणाऱ्या माणसाची मोठी मिरवणूक काढिली, किंवा त्याच्या तोंडांत पंचपक्वान्नें घातलीं तरी त्यामुळें त्याला कांहीं सुख होत नाहीं. ९२ त्याप्रमाणें मरण समोर दिसत असतां विषयसुखानें कोणाला सुख वाटेल ! यास्तव विचारी लोक विषयांचा त्याग करितात व मूर्ख त्यांत आसक्त होतात. ९३ शरीरदुःखाची एक अर्धी घटकाहि विषयसुखाच्या राशींचा नाश करिते. पण वेडे लोक विषयसुखासाठीं व्यर्थ शिणतात. एक निर्विषयब्रह्मांतील आनंदच शाश्वत आहे. ९४ याप्रमाणें यालोकीं सर्वथा सुख नाहीं. हे उद्धवा ! परलोकीं सुख आहे असें कोणी म्हणतात, परंतु तेंहि खरें नव्हे. ४९५.

—याप्रमाणें या लोकीं सुख नाहीं असें सांगितलें, लोकांतरींहि तें नाहीं, असें आतां सांगतात—

श्रुतं च स्पर्धा-असूया-अत्यय-व्ययैः दृष्टवत् दुष्टं—वेदानें सांगितलेलें जें स्वर्गादि फल तेंहि स्पर्धा म्ह० दुसऱ्याचें सुख सहन न होणें, असूया म्ह० दुसऱ्यांच्या दोषांचें आविष्करण करणें, अत्यय म्ह० नाश व व्यय म्ह० क्षय या दोषांनीं दूषित झालेलें असतें. (अथवा व्यय म्ह० नाश व अत्यय म्ह० आपल्या सुखाहून अतिशय सुख, पण तें आपल्याला न मिळाल्यामुळें होणारें दुःख.) तसेंच, बह्वन्तरायकामत्वात् कृषिवत् च श्रुतं अपि निष्फलं—त्या सुखांत वैगुण्यादिरूप अनेक विघ्नें असल्यामुळें विघ्नप्रचुर शेतीप्रमाणें बहुसुखरूपत्वानें श्रुत असलेलेंहि स्वर्गादिसुख निष्फल होय. २१.

आपण हा लोक जसा प्रत्यक्ष पहातों, त्याचप्रमाणें स्वर्गादिलोकांविषयींहि ऐकतों. पण तेहि स्वभावतःच दोषानें युक्त आहेत. तथापि मूर्ख लोक त्या सदोष स्वर्गादिकांचीहि इच्छा करितात. ९६ ' स्वर्गांत कोणते दोष आहेत ' असें जर विचारशील तर त्यांचें लक्षण सांगतों, ऐक. स्वर्गांतहि स्पर्धा, मत्सर व नाश हीं आहेतच. शिवाय स्वर्गभोगानेंच तपाचा क्षय होत जातो. ९७ आपल्या बरोबरीनें दुसऱ्याच्या तपाचा प्रभाव दिसतांच

पाही । तें सुख नाहीं मानसीं ।। ९८ ।। आपणाहोनि अधिक पदीं । त्यासी दोष आरोपोनि निंदी । तेथही ऐसी विषमबुद्धी । सुख त्रिशुद्धी तेथें कैंचें ।। ९९ ।। यालागीं स्वर्गभोगें जें सुख । सकळां सारिखें नाहीं देख । तपानुसारें न्यूनाधिक । भोगिती लोक निजकर्में ।। ५०० ।। एक उर्वशी भोगूं लागला । एक काळी विद्रूप पावला । भोगें तपक्षयो झाला । नाशू आला अनिवार ।। १ ।। जंव जंव स्वर्गभोग भोगिती । तंव तंव तपाची क्षीणशक्ती । तपक्षयें क्षया जाती । नाशू पावती स्वर्गस्थ ।। २ ।। स्वर्गप्राप्तीचिये विधी । कर्में करितां विघ्नें बाधी । तेणें नव्हे स्वर्गसिद्धी । जाण त्रिशुद्धी उद्धवा ।। ३ ।। जें गर्भींच सटवलें । त्याचें बारसें न वचे केलें । तेवीं कर्मींचि विघ्न उद्भवलें । पावणें ठेलें स्वर्गाचें ।। ४ ।। म्हणशी विघ्न करी कोण । कर्म करितां होय विगुण । तें कर्मचि कर्मासी जाण । विघ्न दारुण उपजवी ।। ५ ।। कर्मचि कर्मासी साधक । कर्मचि कर्मासी बाधक । कर्मचि कर्मासी मोचक । हें नेणोनि लोक गुंतले ।। ६ ।। काम्य कर्मीं विघ्न विचित्र । देश काळ मंत्र तंत्र । द्रव्य-दक्षिणा-विधि-पात्र-। शुद्धि सर्वत्र पाहिजे ।। ७ ।। जैसे क्षयरोगाचे रोगियासी । अल्प कुपथ्य बाधी त्यासी । तैसें जाण काम्य कर्मासी । अल्पदोषीं सविघ्न ।। ८ ।। प्रचंड दुधाचें भांडें । माजी थेंबु एकु कांजी पडे । तेणें दहीं दूध ना तूप जोडे । करी खवडे दुधाचे ।। ९ ।। तैसें काम्य कर्म जाण । अल्पही होतां विगुण । फळ नव्हे परी दारुण । तें कर्मचि विघ्न उपजवी ।। ५१० ।। कष्टोनियां बारा मासीं । जैसा कृषीवळु करी कृषी । त्याच्या फळाआड विघ्नें कैशीं । केल्या कष्टासी नाशक ।। ११ ।। भूमि शुद्ध शुद्ध बीज । काळीं पर्जन्य कर्ता निरुज । उपकरणसामग्रीसमाज । पहिलें हें बोज पाहिजे ।। १२ ।। पेरणी झालियापाठीं । देखणें राखणें

त्याच्याशीं तो स्पर्धा करूं लागतो. माझ्यासारखें सुख तो भोगण्यास पहातो काय असा मत्सर मनांत उत्पन्न झाला म्हणजे मग त्याला सुख कोठचें ! ९८ आपल्यापेक्षां श्रेष्ठपदावर कोणी आलें कीं त्याच्यावर कांहीं तरी दोषांचा आरोप करून त्याची निंदा करावयाची, तेथेंहि जर अशी भेदबुद्धि असते तर त्यांत खरें सुख कसलें ! ९९ तसेंच स्वर्गभोगानें जें सुख मिळतें तेंहि सर्वांना सारखें मिळत नाहीं. आपल्या तपाप्रमाणें व कर्माप्रमाणें लोक कमी-अधिक प्रमाणानें सुख भोगितात. ५०० एकाला सुंदर उर्वशी लाभली, तर दुसऱ्याला काळी, कुरूप, कर्कशा मिळाली आणि भोगानें तपाचा क्षय व अनिवार नाश मात्र झाला. १ जेवढें जेवढें स्वर्गसुख भोगावें तेवढें तेवढें तपाचें सामर्थ्य क्षीण होत जातें व तपाचा क्षय झाला कीं स्वर्गस्थ लोक नाश पावतात. २ हे उद्धवा ! स्वर्गप्राप्तीसाठीं यथाविधि कर्में करूं लागलें असतां विघ्नें पीडा देतात व त्यामुळें स्वर्गप्राप्ति होत नाहीं. ३ गर्भांत असतांनाच मृत झालेल्या बालकाचें जसें कोणी बारसें करीत नाहीं, तसेंच कर्मांमध्यें विघ्न उत्पन्न झाले कीं, स्वर्गप्राप्ति खुंटलीच. ४ आतां 'कर्मांत विघ्न कोण करितें' असें जर विचारशील तर ऐक. कर्म आचरण्यांत दोष घडले म्हणजे तें कर्मच कर्मामध्यें भयंकर विघ्न उत्पन्न करितें. ५ कर्मच कर्मांचें साधक आहे, तेंच बाधक आहे व तेंच कर्मांतून सोडविणारें आहे. पण हें न समजल्यामुळें अज्ञ लोक त्यांत गुंतून पडले आहेत. ६ काम्य कर्मांत विलक्षण विघ्नें येतात. त्यांत देश, काल, मंत्र, तंत्र, द्रव्य, दक्षिणा, विधि व पात्र या सर्वांची शुद्धता पाहिजे. ७ ज्याप्रमाणें क्षयरोग झालेल्या रोग्यानें थोडेंसें जरी कुपथ्य केलें तरी तें त्याला बाधतें. त्याप्रमाणें काम्य-कर्मामध्यें अल्प दोष जरी घडला तरी विघ्न येतें. ८ दुधाची मोठी थोरली घागर भरलेली असली व त्यांत कांजीचा थेंब जरी पडला तरी त्यापासून दहीं, दूध किंवा तूप हें कांहींच प्राप्त होत नाहीं, उलट त्या सर्व दुधाचें चोथा व पाणी होतें. ९ त्याचप्रमाणें काम्य कर्मांत अल्प जरी दोष घडला तरी त्या कर्माचें फल मिळण्याऐवजीं तें कर्मच भयंकर विघ्न उत्पन्न करितें. ५१० शेतकरी बारा महिने कष्ट करून शेती करितो, परंतु त्याच्या पिकाच्या आड आलेलीं अनेक विघ्नें त्याचे श्रम व्यर्थ कसे घालवितात, ११ तें पहा—प्रथम जमीन चांगली सुपीक पाहिजे. पेरावयाचें बियाणें चांगलें भरींव पाहिजे. योग्य काळीं पाऊस पडला पाहिजे. शेतावर कीड न पडतां तें रोगरहित राहिलें पाहिजे. शिवाय शेतकीचीं आऊतेंहि चांगलीं पाहिजेत. आरंभाला या सर्व गोष्टी चांगल्या जुळल्या पाहिजेत. १२ त्यानंतर

कूपकांटी । सोंकरावें आवशीं पाहाटीं । आळसु पोटीं सांडूनी ॥ १३ ॥ पीक येतयेतां कणशीं । आभाळें हिंसळा पडे त्यासीं । कां कान्ही पडे पिकासी । घाली शेतासी निंदणें ॥ १४ ॥ गर्वाचा तांबारा पडे । कां अहंतेचा रोग पडे । कीं अधर्माची आळी वाढे । पीक बुडे तेणेंही ॥ १५ ॥ सबळ सोंकरणें न घडी । तरी आशेतृष्णेच्या भोरडी । कीजे पिकाची ओरबडी । दाणा बुडीं उरेना ॥ १६ ॥ दंभाची घांटी पडिल्या ठायीं । घांटा दिसे परी दाणा नाहीं । कामक्रोधांच्या उंदरीं पाहीं । मूळाच्या ठायीं करांडिलें ॥ १७ ॥ आल्या विकल्पाची धाडी । शेतामाजी नुरे काडी । कुवासना टोळाची पडे उडी । समूळ सशेंडी खुराट ॥ १८ ॥ एवं कृषीवळाचे परी । सकामासी विघ्नें भारी । बळ अंतरलें दूरी । विघ्नसागरीं बुडाले ॥ १९ ॥ स्वर्ग एकु याज्ञिक बहुत । यागीं देव विघ्नें करित । मुख्य इंद्र विघ्ना प्रवर्तत । स्वर्ग राखत निजभोगा ॥ ५२० ॥ एकी वेश्या एकी राती । येथ सकाम बहुत येती । ते जैसे कलहो करिती । तैशी गती याज्ञिकां ॥ २१ ॥ कां शुनी जैसीं ऋतुस्नात । तिसी भोगूं येती श्वान बहुत । परस्परें गुरगुरित । तैसा स्वर्ग भोगत सकाम ॥ २२ ॥ तेथ ज्यासी भोग घडे । भोगू जातां अडकोनि पडे । भंडिमा होय जगापुढें । सज्ञान तोंडें थुंकिती ॥ २३ ॥ जिचें भोगूं जाय सुख । अडकल्या तें होय विमुख । मैथुनद्वारें गुंतल्या देख । थुंकिती लोक मुखामुखीं ॥ २४ ॥ तैशी याज्ञिकां स्वर्गप्राप्ती । भोगें होय तपच्युती । स्वर्गभोगीं गुंतली आसक्ती । विमुख पडती इहलोकीं ॥ २५ ॥ एवं कृषीवळाचिया परी । स्वर्गप्राप्तीसी विघ्नें भारी । केले कष्ट वृथा करी । भोगु कैशा परी

पेरणी झाल्यावर कांटेरी कुंपण घालून त्यावर देखरेख व राखण ठेवावी लागते व आळस सोडून आवशीं-पहाटें त्याचें रक्षण करावें लागतें. १३ पिकाला कणसें लागल्यावरहि आभाळ येऊन त्या पिकाला एकप्रकारचा रोग होतो, किंवा कणसें काळीं पडतात व सगळें शेत नासून जातें. १४ त्याचप्रमाणें कर्मावर गर्वाची तांब चढते किंवा त्याला अहंकाराचा रोग जडतो किंवा अधर्मरूपी कीड पडून त्यानें कर्मरूपी पीक साफ बुडतें. १५ योग्यप्रकारें जर राखण केली नाहीं तर त्या कर्माला आशा व तृष्णारूपी कीड लागून त्याचा फडशा उडवितें व एक दाणाहि शिलुक ठेवीत नाहींत. १६ त्याला दंभाचा किडा लागला कीं तो सर्व धान्य खाऊन टाकितो. पिकावर घाटा दिसतो, पण दाणा एकहि उरत नाहीं. कामक्रोधरूपी उंदीर तर तें पिक मुळांतूनच कुरतडतात. १७ विकल्पाची धाड आली म्हणजे तर मग त्या शेतांत एक काडीहि उरत नाहीं. दुर्वासनांची टोळधाड आली कीं तें शेत मुळापासून शेंड्यापर्यंत नुसतें खुंट होऊन जातें. १८ याप्रमाणें सकाम कर्में करणाराच्या कर्मांत शेतकऱ्यासारखीं असंख्य विघ्नें येतात. त्याला मिळणारें फल तर दूरच रहातें, पण तो विघ्नरूपी समुद्रांत मात्र बुडून जातो. १९ स्वर्ग एकच पण त्याच्या प्राप्तीसाठीं यज्ञ करणारे अनेक त्यामुळें त्या यज्ञांत देव विघ्न करितात. मुख्य इंद्रच मुळीं विघ्न करण्यास तयार होतो व स्वर्ग स्वतःच्या भोगासाठीं ठेवितो. ५२० वेश्या एकटीच व रात्रहि एक, परंतु तिच्याकडे येणारे कामीजन अनेक असतात त्यामुळें ते आपसांत भांडतात. यज्ञ करणारांची स्थितीहि तशीच होते. २१ किंवा कुत्रीच्या अभिलाषानें अनेक, कुत्रे तिजपाशीं येऊन जसे एकमेकांवर गुरगुरतात, तशीच स्वर्गाच्या अभिलाषानें सकाम लोकांची स्थिति होते. २२ त्यांतील ज्याचा त्या कुत्रीशीं संग होतो, तो तेथेंच अडकून पडतो व लोकांत त्याची दुर्दशा होते. तें पाहून सभ्य लोकांच्या मनांत किळस उत्पन्न होऊन ते त्यावर थुंकतात. २३ त्या सकाम कुत्र्याची अशी दुर्दशा झाली असतां इतर लोकहि त्याच्या तोंडावर थुंकतात. २४ याज्ञिकांची स्वर्गप्राप्तीहि तशीच आहे. तेथील भोग भोगल्यानें त्यांचें तप क्षीण होतें, तरी त्यांचें मन स्वर्गभोगांत गुंतलेलेंच असतें. तथापि ते त्यापासून विमुख होऊन या लोकांत पडतात. २५ याप्रमाणें स्वर्गप्राप्तींत शेतकऱ्यासारखीं विघ्नें फार येतात व तीं केलेले सर्व श्रम व्यर्थ घालवितात. मग भोग कोठून

घडेल ॥ २६ ॥ एके म्हणती कर्मकुशळ । आम्ही कर्म हों नेदूं विकळ । अच्छिद्र साधूनि सकळ । स्वर्गसुखफळ भोगूं ॥ २७ ॥ उद्धवा ऐसेंही न घडे । तें मी सांगेन तुज पुढें । पंचश्लोकीं फाडोवाडें । विशद निवाडें परियेसीं ॥ २८ ॥

अन्तरायैरविहतो यदि धर्मः स्वनुष्ठितः । तेनापि निर्जितं स्थानं यथा गच्छति तच्छृणु ॥ २२ ॥

जेणें अंतराय न पवती । ऐशीं अच्छिद्र कर्में नव्हती । जरी जालीं दैवगतीं । तरी स्थानप्राप्ती ते नश्वर ॥ २९ ॥ कर्में ज्या स्थानाप्रति जाये । तेथ गेलिया जें जें लाहे । तें तें सांगेन मी पाहें । सावध होये उद्धवा ॥ ५३० ॥

इष्ट्वेह देवता यज्ञैः स्वर्लोकं याति याज्ञिकः । भुञ्जीत देववत्तत्र भोगान् दिव्यान्निजार्जितान् ॥ २३ ॥

पावोनि कर्मभूमी उत्तम । वर्णवरिष्ठ ब्राह्मणजन्म । ज्योतिष्टोमादिक करिती कर्म । नित्य काम्य अग्निहोत्र ॥ ३१ ॥ त्रयीविद्या जाणती सकळ । कर्मकलापीं अतिकुशळ । ऐसें सज्ञान मूर्ख केवळ । स्वर्गफळ वांछिती ॥ ३२ ॥ जेणें पुण्यें मी न जोडें । तें पुण्य ह्मणतां वाचा रडे । याज्ञिक विषयासक्त गाढे । स्वर्गभोगाकडे धाविन्नले ॥ ३३ ॥ यजूनि इंद्रादि देवांसी । जेणें अंतर पडे मजसीं । त्या पावले स्वर्गलोकासी । दिव्य भोगासी भोगावया ॥ ३४ ॥ बहुतीं चघळिलें जुनें हाड । तें श्वान स्वलाळा करी

घडणार ! २६ कोणी स्वतःला कर्म करण्यांत मोठे चतुर समजतात. ते म्हणतात कीं, आम्ही कर्मात यत्किंचितहि उणीव राहूं देणार नाहीं, आम्ही सर्व दोषरहित होऊन पार पडूं व स्वर्गसुखाचें फल भोगूं. २७ परंतु हे उद्धवा ! असेंहि घडत नाहीं. पुढल्या पांच श्लोकांत त्याचेंच स्पष्ट विवेचन करून सांगतों, तें लक्षपूर्वक ऐक. ५२८.

——आतां त्या सुखांत विघ्नादिकांचा अभाव आहे असें जरी गृहीत धरिलें तरी नाशाचें दुःख अपरिहार्य आहे, असें पुढील पांच श्लोकांनीं सांगतात——

अन्तरायैः अविहितः धर्मः यदि स्वनुष्ठितः—विघ्नांनीं ज्याला प्रतिबंध केलेला नाहीं असा धर्म जरी चांगल्याप्रकारें अनुष्ठिला तरी, तेन अपि निर्जितं स्थानं यथा गच्छति तत् शृणु—त्या यथाविधि आचरिलेल्या धर्मानेंहि संपादन केलेलें स्थान ज्याप्रकारें नष्ट होतें, तें तू ऐक. २२.

ज्यांत मुळींच विघ्न येणार नाहीं, अशीं निर्दोष कर्में कधीं घडतच नाहींत व जरी दैवयोगानें घडलीं तरी स्वर्गप्राप्ति नश्वर असते. २९ कर्में करून ते ज्या पदाला पोंचतात, तेथें गेल्यावर जें जें कांहीं त्यांना प्राप्त होतें, तें तें सर्व मी तुला सांगतों. तरी हे उद्धवा ! तूं सावधानपणें ऐक. ५३०.

याज्ञिकः इह यज्ञैः देवताः इष्ट्वा स्वर्लोकं याति—याज्ञिक या लोकीं यज्ञांच्या योगानें देवतांच्या उद्देशानें याग करून स्वर्गलोकीं जातो, तत्र निजार्जितान् दिव्यान् भोगान् देववत् भुञ्जीत—व तेथें आपल्या पुण्यानें संपादन केलेल्या देवलोकांतील भोगास देवांप्रमाणें भोगितो. २३.

उत्तम कर्मभूमीला म्ह० या मृत्युलोकाला प्राप्त होऊन सर्व वर्णांतील श्रेष्ठ अशा ब्राह्मणकुलांत जन्म झाला म्हणजे ते ज्योतिष्टोमादि कर्मे व नित्य-काम्य अग्निहोत्र करितात. ३१ ते तिन्ही वेद जाणतात व सर्व कर्मे करण्यांत फार चतुर असतात. पण ते असे विद्वान् असूनहि केवल मूर्ख असतात. कारण ते स्वर्गफलाची इच्छा करितात. ३२ ज्या पुण्यानें मी परमात्मा प्राप्त होत नाहीं, त्याला 'पुण्य' असें म्हणतांना वाणी बोलत नाहीं, तर ती रडते. यज्ञ करणारे विषयसक्तीमध्यें इतके गढलेले असतात कीं, ते स्वर्गांतील भोगांकडे धांवत असतात. ३३ इंद्रादि देवांची उपासना करून ज्यांनीं पुरुषोत्तम दुरावतो असे दिव्यभोग भोगण्यासाठीं ते स्वर्गलोकीं जातात. (सु. गी. ९–२० पृ. १८३) ३४ अनेकांनीं चघळून टाकिलेलें एखादें जुनें हाड मिळतांच कुत्रें तेंच चघळूं लागतें व आपल्याच तोंडांतील लाळेनें त्या हाडाला रुचकर मानितें, त्याचप्रमाणें यज्ञ करणारांना स्वर्ग-

गोड । तैसें याज्ञिकां स्वर्गकोड । स्वपुण्यें गोड करिताती ॥ ३५ ॥ कां स्मशानबळींचें अन्न । कलहें श्वानशेष खाय श्वान । तैसाचि स्वर्गभोग जाण । शेष भोजन बहुतांचें ॥ ३६ ॥ गांठीचें वेंचूनि शुद्ध सुकृत । उच्छिष्ट भोग विकत घेत । याज्ञिक पवित्र म्हणवित । मोलें सेवित बहुशेष ॥ ३७ ॥ केवळ वायसाचें मास । तेंही श्वानमुखींचें शेष । मोलें न मिळेचि बहुवस । तैसी रसकस याज्ञिकां ॥ ३८ ॥ स्वर्ग उच्छिष्ट बहुतांचें । त्यासी मोल वेंचे अतिकष्टांचें । तेंही न मिळेचि धणीचें । भय पतनाचें अहर्निशीं ॥ ३९ ॥ स्वर्गभोग भोगिती देव । तेही म्हणताती आम्ही निर्दैव । याज्ञिकांठायीं थोर हांव । दिव्य वैभवभोगार्थ ॥५४०॥ एवं जालिया स्वर्गप्राप्ती । तेथ जे जे भोग भोगिती । ते मी सांगेन तुजप्रती । ऐक निश्चितीं उद्धवा ॥ ४१ ॥ स्वर्गीं समान भोगू समस्तां । नाहीं जाण गा सर्वथा । ज्यासी जैसी पुण्यअवस्था । तैसी प्राप्तता तयासी ॥ ४२ ॥

स्वपुण्योपचिते शुभ्रे विमान उपगीयते । गन्धर्वैर्विहरन्मध्ये देवीनां हृद्यवेषधृक् ॥ २४ ॥

आपुले पुण्याचेनि मोलें । चंद्रप्रभ विमान आलें । त्यामाजीं आरूढले । भोगूं लागले दिव्य भोगू ॥ ४३ ॥ तेथें दिव्य देहाची प्राप्ती । मनोहर वेषातें धरिती । अतिमधुर गंधर्व गाती । स्वेच्छा क्रीडती स्त्रियांसीं ॥ ४४ ॥ त्या स्वर्गींच्या स्वर्गांगना । देखतां भुली पडिली मना । मग त्यांचेनि छंदें जाणा । नाना स्थानां क्रीडतू ॥ ४५ ॥

स्त्रीभिः कामगयानेन किङ्किणीजालमालिना । क्रीडन्न वेदाऽऽत्मपातं सुराक्रीडेषु निर्वृतः ॥ २५ ॥

भोगाची रुचि असते. त्यासाठीं स्वतःचें पुण्य वेंचून ते स्वर्गसुख गोड करून घेतात. ३५ किंवा स्मशानांतील बळीचा भात पाहून त्यावर कुत्रीं तुटून पडतात व अपसांत भांडून एकमेकांचा उष्टा राहिलेला तो अन्नाचा अवशेष खातात, त्याचप्रमाणें स्वर्गांतील भोग अनेकांनीं भोगून राहिलेला उष्टा अवशेषच आहे. ३६ पण आपल्या पदरचें पवित्र पुण्य वेंचून याज्ञिक स्वर्गांतील उष्टे भोग विकत घेतात. ते स्वतःला पवित्र म्हणवितात व पुण्याचें मोल देऊन इतरांचें उष्टे भोग भोगितात. ३७ अगोदर कावळ्याचें मांस, तेंहि कुत्र्यानें खाऊन राहिलेलें विकत घ्यावयास गेलें तरीहि पुष्कळ मिळावयाचें नाहीं ! यज्ञ करणारांची स्वर्गप्राप्तीविषयींची रसज्ञताहि अशीच असते. ३८ स्वर्गसुख अनेकांचें उष्टें आहे. पण त्यासाठीं स्वतः मोठे कष्ट करून संपादिलेलें पुण्य वेंचावयाचें व तें सुखहि यथेच्छ मिळत नाहीं. रात्रंदिवस अधःपाताचें भय असतेंच. ३९ जे देव स्वर्गभोग भोगितात तेहि म्हणतात कीं, आम्ही दुर्दैवी आहोंत, पण याज्ञिकांची स्वर्गांतील दिव्य ऐश्वर्य भोगण्याची हांव फार दांडगी असते. ५४० याप्रमाणें स्वर्गप्राप्ति झाल्यावर तेथें जे भोग भोगितात ते सर्व आतां मी तुला सांगतों. हे उद्धवा ! लक्ष देऊन ऐक. ४१ स्वर्गामध्यें सर्वांचे भोग एकसारखेच नसतात. ज्यांच्या पदरीं जसा पुण्यसंचय असेल त्यांना तशा भोगाची प्राप्ति होते. ५४२.

स्वपुण्योपचिते शुभ्रे विमाने हृद्यवेषधृक् देवीनां मध्ये विहरन् गन्धर्वैः उपगीयते—आपल्या पुण्यांनीं संपादन केलेल्या सर्व भोगसाधनांनीं युक्त असलेल्या शुभ्र विमानांत रमणीय वेष धारण करून अप्सरांच्या समूहांत विहार करणारा तो गंधर्वांकडून सुंदर गायन ऐकविला जातो. २४.

आपलें पुण्य खर्च करून चंद्रासारखें शीतळ प्रकाश देणारें विमान आलें कीं, त्यांत बसून ते दिव्य स्वर्गीय भोग भोगितात. ४३ स्वर्गांत त्यांना दिव्य शरीर मिळतें. ते मनोहर वेष घेतात. गंधर्व अतिशय मधुर गायन करितात व ते स्वेच्छेनें स्त्रियाबरोबर क्रीडा करीत असतात. ४४ स्वर्गांतील त्या सुंदर स्त्रिया पहातांच मनाला मोह पडतो. त्यांच्या नादानें ते नानाप्रकारच्या स्थानांमध्यें क्रीडा करीत फिरतात. ५४५.

किङ्किणीजालमालिना कामगयानेन सुराक्रीडेषु स्त्रीभिः क्रीडन् निर्वृतः आत्मपातं न वेद—रमणीय घुंगुरांच्या माळांनीं सुशोभित झालेल्या व इच्छेप्रमाणें गमन करणाऱ्या विमानानें देवांच्या नंदनादिवनांमध्यें स्त्रियांसह क्रीडा करणारा व त्यामुळेंच सुखी झालेला तो क्रीडेच्या भरांत आपला अधःपात जाणत नाहीं. २५.

त्या स्त्रियांसमवेत आपण । विमानीं करोनि आरोहण । स्वेच्छागामी गमन । शोभे विमान तें कैसें ॥ ४६ ॥ घंटाघंटिकाजाळमाळा । क्षुद्रघंटिका रत्नमेखळा । किंकिणी लाविलिया सकळा । विमानलीळा विचित्र ॥ ४७ ॥ इच्छिल्या ठाया ने विमाना । चैत्रवना कां नंदनवना । भोगावया स्वर्गांगना । आसक्त जाणा जालासे ॥ ४८ ॥ वनीं सुमनांचे संभार । पराग उधळत सुंदर । कोकिळांचे मधुर स्वर । झणत्कार भ्रमरांचे ॥ ४९ ॥ मंद सुगंध सुशीतळ । झळकतसे मलयानिळ । स्वर्गांगनादारोळ । कामसुकाळ सकामा ॥ ५५० ॥ आगी कापुरा होतां भेटी । एकवेळे भडका उठी । तैसें पुण्य वेंचलें उठाउठी । भोगासाठीं सकामां ॥ ५१ ॥ मज पतन होईल येथ । भोग जातील समस्त । हेंही नाठवी त्याचें चित्त । कामासक्त जालासे ॥ ५२ ॥ दीपासी देतां आलिंगन । पतंगा नाठवे निजमरण । तैसें नाठवे आत्मपतन । भोगीं मन विगुंतलें ॥ ५३ ॥

तावत्प्रमोदते स्वर्गे यावत्पुण्यं समाप्यते । क्षीणपुण्यः पतत्यर्वागनिच्छन्कालचालितः ॥ २६ ॥

जंव असे पुण्यसंपत्ती । तंव स्वर्गभोग भोगिती । क्षीण जाल्या पुण्यशक्ती । पतन पावती तत्काळ ॥ ५४ ॥ जंववरी गांठीं असे धन । तंववरी वेश्येचें सौजन्य । निःशेष वेंचल्या धन । मुख परतोन पाहेना ॥ ५५ ॥ तैशीच स्वर्गींची वस्ती । निजपुण्यें भोगिती । पुण्यक्षयें क्षया जाती । पतन पावती अनिच्छा ॥ ५६ ॥ कष्ट करूनियां याज्ञिकीं । स्वर्गु साधिला होआवया सुखी । ते जालेचि परम दुःखी । पतन अधोमुखीं पावले ॥ ५७ ॥ उडालें स्वर्गभोगाचें सुख । आलें गर्भवासाचें दुःख । जळों

ते त्या स्त्रियांसह विमानांत बसून आपल्या इच्छेप्रमाणें विहार करितात. तें विमान कसें शोभत असतें, तें पहा ! ४६ त्याला लहान मोठ्या घंटांची माळ, रत्नजडित मेखला व बारिक घुंगर लावलेले असतात. त्यामुळें तें विमान विचित्र दिसूं लागतें. त्या विमानाची लीला मोठी विलक्षण असते. ४७ आपण मनांत इच्छिलेल्या ठिकाणीं तें घेऊन जात असतें. इंद्राच्या नंदनवनांत किंवा गंधर्वांच्या चैत्रवनांत तें नेतें. तो पुण्यात्मा स्वर्गांतील स्त्रियांना भोगण्यास फार अधीर झालेला असतो. त्यामुळें त्यांत तो आसक्त होतो. ४८ वनामध्यें फुलांच्या राशी पडलेल्या असतात. त्यांतून सुगंधयुक्त सुंदर पराग उधळत असतात. कोकिळ मंजुळ गायन करीत असतात व भ्रमरांचा गुंजारव चाललेला असतो. ४९ मलय पर्वतावरून शीत, सुगंधित व मंद वायु वहात असतो, स्वर्गांतील अप्सरा आनंदाचे आलाप काढीत असतात. तें ऐकून कामुकाला विलासभोगांचा सुकाळ होतो. ५५० कापराला अग्नीचा स्पर्श होतांच तो एकदम पेट घेतो व जसा भडका उठतो, त्याप्रमाणें सकाम जीवांचें पुण्य या सर्व भोगांत लागलेंच संपून जातें. ५१ आतां हे सर्व भोग संपतील व माझें पतन होईल याचीहि त्याला आठवण रहात नाहीं, इतका तो कामासक्त होतो. ५२ दिव्याला पाहून त्यावर झडप घालणारा पतंग, यांत आपलें मरण आहे, हें जसें विसरतो, त्याप्रमाणें जीव पुण्य सरतांच आपलें अधःपतन होणार हें जीव विसरतो इतकें त्याचें मन भोगामध्यें गुंतलेलें असतें. ५५३.

यावत् पुण्यं समाप्यते तावत् स्वर्गे प्रमोदते–जोंवर त्याचें पुण्य संपलें नाहीं तोंवर तो स्वर्गलोकांत असें अतिशय सुख भोगितो. पण, क्षीणपुण्यः कालचालितः अनिच्छन् अर्वाक् पतति–ज्याचें पुण्य क्षीण झालें आहे असा तो कालानेंच ज्याला त्या स्थानापासून च्युत केलें आहे असा होत्साता त्याची इच्छा नसली तरी खालीं पडतो. २६.

जोंपर्यंत पुण्याचा संचय असतो तोंपर्यंत ते जीव स्वर्गभोग भोगितात. पण पुण्याचें सामर्थ्य क्षीण होतांच ते तत्काळ खालीं येतात. ५४ जोंपर्यंत धनिकाजवळ द्रव्य असतें, तोंपर्यंतच वेश्या त्याच्याशीं प्रेमानें वागते, त्याचें सर्व धन संपलें कीं मग ती पुनः त्याचें कधीं तोंडहि पहात नाहीं. ५५ स्वर्गलोकीची वस्ती पण तशीच आहे. पुण्य असेपर्यंत स्वर्गप्राप्ति. पुण्य संपतांच स्वर्गभोगहि नाहींसे होतात व इच्छा नसली तरी पतन होतें. ५६ याज्ञिक सुखी होण्यासाठीं कष्ट करून स्वर्ग मिळवितात, पण ते अत्यंत दुःखी होऊन अधोगतीला जातात. ५७

सकामाचें सुख । ठकले याज्ञिक सुखलोभें ॥ ५८ ॥ उद्धवा जे ह्मणती स्वर्गसुख । ते या रीतीं पावले दुःख । स्वर्गसुख मानिती मूर्ख । नव्हे निर्दोख तो मार्गु ॥ ५९ ॥ विधियुक्त आचरतां याज्ञिक । पुढती पावले थोर दुःख । तरी अविधीनें होईल सुख । ह्मणीं देख म्हणशील ॥ ५६० ॥ येथ प्रवृत्तिमार्गींची प्रवृत्ती । दों प्रकारें असे वर्तती । एकी विधिरूपें आचरती । दुजी स्थिती अविधीनें ॥ ६१ ॥ आतां सांगीतली तुजप्रती । ते वेदोक्त विधानस्थिती । जे विधीनें स्वर्गप्राप्ती । हे प्रवृत्ती उत्कट ॥ ६२ ॥ पुण्यक्षयें स्वर्गपतन । तेंही सांगीतलें कथन । आतां अविधी जें आचरण । तेंही लक्षण परियेसीं ॥ ६३ ॥ वेद उल्लंघनें कुमती । कुश्चित जनांचे संगती । अप्रवृत्तीची प्रवृत्ती । अधर्मस्थिती अवधारीं ॥ ६४ ॥

यद्यधर्मरतः सङ्गा‌त्सतां वाऽजितेन्द्रियः । कामात्मा कृपणो लुब्धः स्त्रैणो भूतविहिंसकः ॥ २७ ॥

सहज प्राणी कामासक्त । प्राप्तकामें अतिलुब्ध होत । काम न पवतां दीनचित्त । स्वभावो नित्य जीवांचा ॥ ६५ ॥ ऐशिया स्वभावनिष्ठासी । जरी संग होय असंतु पुरुषेंसी । तरी रति वाढे अधर्मासी । अकर्मासी प्रवर्ते ॥ ६६ ॥ चंचलत्वें मर्कट मन । त्यासी असत्संगमदिरापान । कामवृश्चिकें दंशिलें जाण । तेव्हां वर्तन यद्वातद्वा ॥ ६७ ॥ पिशाहातें धेंडेवाळी । दीधल्या तो सर्वत्र जाळी । तेवीं असत्संगें करी होळी । स्वधर्म समूळीं जाळिती ॥ ६८ ॥ बाळकाहातीं दीधलें शस्त्र । खोंचितां न म्हणे आप पर । छेदी आपुलेंचि शरीर । हितविचार तें नेणे ॥ ६९ ॥ जेवीं जनीं अवतरे देव्हारा । तिच्या तोंडा नाहीं

स्वर्गवासाचें सुख संपलें कीं गर्भवासाचें दुःख प्राप्त होतें. जळो तें सकामाचें असलें सुख. यज्ञ करणारे सुखाच्या लोभानें फसले आहेत. ५८ हे उद्धवा ! जे स्वर्गसुखाची हांव धरितात ते अशाप्रकारें दुःखी होतात. स्वर्गसुख मूर्खांना आवडतें. पण तो मार्ग कांहीं निर्दोष नाहीं. ५८ याज्ञिकांनीं यथाविधि कर्म आचरिलें, तरी सुद्धां जर ते फार मोठ्या दुःखांत पडतात, तर मग अविधिपूर्वक केलेल्या कर्मांनीं सुख होईल हें तूं मनांतहि आणूं नकोस ! ६० प्रवृत्तिमार्गाची प्रवृत्ति दोन प्रकारांनीं होत असते. एक विधीनें आचरण करितो व दुसरा अविधीनें. ६१ आतां मीं जी तुला सांगितली ती वेदोक्त विधानाची स्थिति होय. ज्या विधीनें स्वर्गाची प्राप्ति होते तीच मुख्य प्रवृत्ति आहे. त्यानंतर पुण्यक्षयानें पतन कसें होतें, तेंहि तुला सांगितलें. आतां अविधीनें केलेल्या आचरणाचें लक्षण ऐक. ६३ ते दुर्बुद्धि लोक वेदाज्ञेचें उल्लंघन करून दुष्ट लोकांच्या संगतीनें अप्रवृत्तीत प्रवृत्त होऊन अधर्म कसा करितात, तें ऐक. ५६४.

—यथाशास्त्र काम्य कर्माचें अनुष्ठान करणें किंवा विधीचें उल्लंघन करून अधर्मात रत होणें अशी प्रवृत्ति दोन प्रकारची आहे. त्यांतील काम्यप्रवृत्तीची गति सांगितली. आतां अधर्मप्रवृत्तीची गति सांगतात—

यदि असतां संगात् अधर्मरतः–जर पुरुष असज्जनांच्या संगतीमुळें अधर्मांत रत झाला, वा अजितेंद्रियः कामात्मा कृपणः लुब्धः स्त्रैणः भूतविहिंसकः–किंवा जितेंद्रिय नसल्यामुळें कामस्वभावकामी झाला तर त्यामुळेंच तो कृपण, म्हणूनच भोगतृष्णेनें व्याकुळ त्यामुळेंच स्त्रीलंपट आणि या सर्व कारणांनीं भूतांची हिंसा करणारा बनतो. २७.

प्राणी स्वभावतःच कामासक्त असतो व इच्छिलेले भोग प्राप्त होतांच त्यांवर अतिशय लुब्ध होतो. इष्ट वस्तु प्राप्त झाली नाहीं कीं, त्याचें मन अस्थिर होतें. हा जीवाचा स्वभावच आहे. ६५ अशा स्वभावाच्या मनुष्याला दुर्जनाची संगत घडली कीं, त्याची अधर्माविषयीं आवड वाढते व तो अकर्मांत प्रवृत्त होतो. ६६ मन आधींच चंचलपणामुळें माकडासारखें आहे. त्यांत त्यानें दुर्जनसंगतीचें मद्यपान केलें व कामनारूपी विंचवानें त्याला दंश केला कीं, तें मनसोक्त वागूं लागतें. ६७ वेड्याच्या हातीं कोलित दिलें तर तो जसा सर्व ठिकाणीं आग लावीत सुटतो, त्याप्रमाणें जीव दुर्जनसंगतीनें स्वधर्माची होळी करून त्याला समूळ नाहींसें करितो. ६८ लहान मुलाच्या हातांत जर शस्त्र दिलें तर तें खुपसते वेळीं त्याला हें आपलें व हें दुसऱ्याचें हा विचार नसतो त्यामुळें तें स्वतःचेंच शरीर कापून घेतें. कारण त्याला हित-अहित कांहीं कळत नाहीं. ६९ देव अंगांत येतो असा दंभ

वोंवारा । कां बहुरुप्याच्या दिगंबरा । नाहीं थारा वैराग्या ॥ ५७० ॥ तैसा असत्संगें खरा । घाली दंभाचा पसारा । नाहीं विवेकाचा थारा । कामशास्त्रा प्रवर्ते ॥ ७१ ॥ कामशास्त्रें अतिसकाम । कामास्तव जी अधर्म । अधर्मास्तव अकर्म । निंद्य धर्म आचरे ॥ ७२ ॥ निंद्य कर्माचा संयोग । यासी मुद्दल लुब्धभोग । लुब्धभोगामाजीं चांग । अधर्म सांग सविस्तर ॥ ७३ ॥ अधर्म वाढतां उभारा । परद्रव्य आणि परदारा । याचिलागीं शरीरा । उपायद्वारा कष्टवी ॥ ७४ ॥ अंगनेलागीं अतिदीन । स्त्रीध्यानें होय स्त्रैण । स्त्री साधावया जाण । भूतहनन आरंभी ॥ ७५ ॥

पशूनविधिनालभ्य प्रेतभूतगणान्यजन् । नरकानवशो जन्तुर्गत्वा यात्युल्बणं तमः ॥ २८ ॥

विधि म्हणे तें न करावें । वेदु बोले तें नाइकावें । स्मृतिशास्त्र नावडे जीवें । कर्म करावें स्वेच्छा ॥ ७६ ॥ जारण मारण उच्चाटन । स्तंभन मोहन वशीकरण । असाध्य साधूनि अंजन । करी लागवण स्त्रियांसी ॥ ७७ ॥ लोण राई आणि बिबवे । मधुरसीं कालवी आघवे । शाबरी मंत्राचेनि वैभवें । होम करूं धांवे तामस ॥ ७८ ॥ कर्म करावया अभिचार । मेष जंबूक वानर । सरड बेडूक मत्स्य मगर । गीध घार होमिती ॥ ७९ ॥ नग्नभैरव वेताळ । झोटिंग पिशाच कंकाळ । मारको मेसको मैराळ । भूतें प्रबळ उपासी ॥ ५८० ॥ काळी चिडी टोंकण घारी । काग बक उळूक मारी । आंवतूनि काळी मांजरी । शाबरमंत्रीं होमिती ॥ ८१ ॥ वाहत्या घाण्याचें तेल चोरी । प्रदोषसंधीं न्हाये शनिवारीं । शाकिनी डाकिनी मध्यरात्रीं । होमामाझारीं चेतवी ॥ ८२ ॥ मद्याचे घट पूर्ण भरी । मातंगीची पूजा करी । रुधिर घाली प्रेतपात्रीं । मोहनीमंत्रीं मंत्रूनी ॥ ८३ ॥ घेती हळदीची उटी ।

करणाऱ्या देवऋषिणीच्या बडबडण्यास कांहीं मर्यादा नसते. किंवा संन्याशाचें सोंग घेऊन हिंडणाऱ्या बहुरूप्यामध्यें विरक्तीचा लेशहि नसतो. ५७० त्याप्रमाणें हा जीव असत्संगतीनें दंभ माजवितो. त्याजपाशीं विवेकाला थाराहि मिळत नाहीं व तो कामशास्त्रांत प्रवृत्त होतो. ७१ कामशास्त्रामुळें त्याची वासना वाढते व त्या वासनेमुळें तो अधर्माची योजना करितो. अधर्मामुळें अकर्म करितो आणि अखेर निंद्य धर्म आचरितो. ७२ निंद्य कर्मांत प्रवृत्त होण्याचें मूळ कारण भोगाची आसक्ति आहे. भोगासक्तींत अधर्म चांगला पसरतो. ७३अधर्म उत्पन्न होऊन तो वाढला असतां दुसऱ्याचें धन व दुसऱ्याची स्त्री यांच्या प्राप्तीसाठीं तो अनेक उपाय योजून शरीर कष्टवितो. ७४ स्त्रीसाठीं तो अति दीन होतो. स्त्रीच्या ध्यासानें स्त्रैण बनतो व स्त्री मिळविण्यासाठीं प्राण्यांची हिंसा करण्यास आरंभ करितो. ५७५.

अविधिना पशून् आलभ्य–शास्त्रविधींना सोडून पशूंची हिंसा करून, प्रेतभूतगणान् यजन्–प्रेत व भूतसमुदाय यांना उद्देशून याग करणारा, अवशः जंतुः नरकान् गत्वा – पापपराधीन झालेला प्राणी भयंकर दुःखाला प्राप्त होतो व त्यानंतर, उल्बणं तमः याति–स्थावरतेला प्राप्त होतो. २८.

अधर्मी लोक विधि जें अवश्य कर्तव्य म्हणून सांगतो तें करीत नाहींत, वेदाचें वचन ऐकत नाहींत, स्मृति, शास्त्र त्यांच्या चित्ताला रुचत नाहीं व इच्छेस येईल तसें कर्म करितात. ७६ जारण, मारण, उच्चाटण, स्तंभन, मोहन, वशीकरण इत्यादि साधनांनीं असाध्य असलेलें अंजन ते प्राप्त करून घेतात व स्त्रियांचा पाठलाग करितात. ७७ लोण, मोहरी, बिब्बे मधांत कालवून शाबरी मंत्राच्या प्रभावानें ते तामस होम करावयास धांवतात. ७८ जारण-मारणादि कर्म करण्यासाठीं बोकड, कोल्हा, वानर, सरडा, बेडूक, मासा, मगर, गिधाड व घार यांचा ते होम करितात. ७९ आणि नग्नभैरव, वेताळ, झोटिंग, पिशाच, कंकाळ, मारको, मेसको, मैराळ या प्रबळ भूतांची ते उपासना करितात. ५८० काळ्या रंगाची चिमणी, टोंकेची घार, कावळा, बगळा, घुबड यांना शाबरमंत्रीं मारितात. काळ्या मांजराला अंजारून-गोंजारून आणितात व त्याचा होम करितात. ८१ वाहत्या घाण्याचें तेल चोरितात. दर शनिवारीं संध्याकाळीं न्हातात. मध्यरात्रीं होम करून डाकिनी व शाकिनी यांना जागृत करितात. ८२ मद्याचे घडे भरून ठेवितात. मांगिणीची पूजा करितात.

सेंदूर लाविती ललाटीं । काम साधावया हटीं । अंजन कष्टीं साधिती ॥ ८४ ॥ होमपात्रें करावया तांतडी । समूळ अश्वत्थातें तोडी । फलित पुष्पित ओषधी उपडी । आसनाबुडीं घालावया ॥ ८५ ॥ बीज जपावया मंत्राचें । वोलें कातडें प्रेताचें । आणवी मृगअस्वलांचें । भय पापाचें मानीना ॥ ८६ ॥ खेचर भूचर जळचर । जीव पीडिती अपार । घेऊनि ब्राह्मणाचें रुधिर । अभिचार आचरती ॥ ८७ ॥ गायीब्राह्मणांसी जाण । पीडा करिती दारुण । क्षेत्रवित्तदाराहरण । स्वार्थें प्राण घेताती ॥ ८८ ॥ देवालयींचें देवशेष । कां शिवालयींचें शिवशेष । घेतां न करिती आळस । वासना असोस अधर्मीं ॥ ८९ ॥ एवं कर्म करितां ऐसें । तेणें अकर्म कर्मवशें । अंधतमीं तो प्रवेशे । जेवीं कां अवसे चंद्रमा ॥ ५९० ॥ अकर्म जाण अतुर्बळी । जीवाचें निजज्ञान छळी । अतिमूढ करूनि ते काळीं । निरयकल्लोळीं घालित ॥ ९१ ॥ ते नरकींची नवलकथा । कोटि वर्षें तळीं जातां । ठाव न लगे गा सर्वथा । केवीं वरुता येईल ॥ ९२ ॥ त्यातें अंधतम म्हणती । जें देखतां अंध होय वृत्ती । निघतां निर्गमू विसरती । नरकीं बसती मूढत्वें ॥ ९३ ॥ जंव होय कर्मभोगांत । तंव नरक भोगी आकल्पांत । मग स्थावरत्व पावत । वृक्ष होत कां पाषाण ॥ ९४ ॥ ऐशी अवस्था गाढमूढ । केवळ जाड्य जालें जड । स्वप्नीं सुख नेणती गोड । दुःख दुर्वाड भोगिती ॥ ९५ ॥ एवं अधर्मवृत्तीं वर्ततां । सुखलेश न लभे सर्वथा । दुःख अनिवार भोगितां । निर्गमता त्या नाहीं ॥ ९६ ॥

मोहनी मंत्राचा जप करून प्रेताच्या कवटीमध्यें रक्त सांठवून ठेवितात. ८३ अंगाला हळदीची उटी लावितात. कपाळाला शेंदूर लावितात आणि आपली इच्छिलेली कामना साधण्यासाठीं हठयोगानें मोठे कष्ट सोसून अंजन साध्य करून घेतात. ८४ होमाचीं उपकरणें सत्वर तयार करण्यासाठीं पिंपळाचा वृक्ष समूळ तोडितात. आसनाखालीं घालण्यासाठीं फळें व फुलें असलेल्या वनस्पति उपटून घेतात. ८५ मंत्र-बीजाचा जप करण्यासाठीं हरिणाच्या किंवा अस्वलाच्या प्रेताचें ताजें कातडें आणवितात. पापाचें भय मनांतहि आणीत नाहींत. ८६ याप्रमाणें आकाशांत दिसणारे पक्षी, भूमीवर चालणारे पशु व पाण्यांत राहणारे मासे, कांसव इत्यादि सर्व प्राण्यांना ते अपार पीडा देतात. ब्राह्मणांचें रक्त घेऊन ते जारण-मारणादि कर्में करि-तात. ८७ गाई-ब्राह्मणांना भयंकर पीडा देतात व शेत-वाडी, द्रव्य, स्त्री यांचा अपहार करण्याच्या स्वार्थीं इच्छेनें त्यांचा प्राण सुद्धां घेतात. ८८ देवालयांतील देवापुढें किंवा शिवालयांतील शिवापुढें जमलेले तांबूल, पैसा वगैरे घेण्यासहि ते कचरत नाहींत. अधर्माविषयीं त्यांची इतकी अतृप्त वासना असते. ८९ अमावस्येला चंद्र जसा अंधा-रांत लोपून जातो, तसे अशाप्रकारचें दुराचरण करणारे ते अकर्माच्या योगानें नरकाच्या काळोखांत पडतात. ५९०. अकर्म अतिशय प्रबळ आहे. तें जीवांच्या आत्मज्ञानाला नाहींसें करितें व त्यांना मरणोत्तर अत्यंत मूढ करून नरकाच्या भयंकर लाटांत टाकितें. ९१ त्या नरकाची स्थिति मोठी विलक्षण आहे. कोट्यवधि वर्षें जरी खालीं जात असलें तरी तळाचा कांहीं थांग लागत नाहीं. मग तो जीव वर येणार कसा! ९२ त्या नरकाला अंधतम म्हणतात. कारण त्याला पहातांच वृत्ति अंध होते. बाहेर येण्याचा विसर पडतो व तो जीव मूर्खपणानें नरकांतच लोळत पडतो. ९३ कर्मभोग संपेपर्यंत तो कल्पभर नरकवास भोगितो व भोग सरल्यावर स्थावरतेला प्राप्त होतो आणि वृक्ष किंवा पाषाण होतो. ९४ गाढ मूढ अवस्था अशी असते. केवळ जाड्यच जडपणाला प्राप्त होतें. त्यांना स्वप्नांतहि सुखानुभव येत नाहीं. ते अनिवार दुःख मात्र भोगीत असतात. ९५ याप्रमाणें अधर्मवृत्तीनें वागत असतां लेशभरहि सुख लाभत नाहीं. उलट अनिवार दुःख भोगीत असतां जीवाची त्यांतून कधींच सुटका होत नाहीं. ५९६.

कर्माणि दुःखोदर्काणि कुर्वन्देहेन तैः पुनः । देहमाभजते तत्र किं सुखं मर्त्यधर्मिणः ॥ २९ ॥

ऐकें बापा उद्धवा । मरणधर्मात्मका जीवा । सुख न भेटे त्याच्या भावा । दुःखप्रभवामाजीं वासू ॥९७॥ नरदेहा येवोनि केवळ । क्रूर कर्में करिती प्रबळ । ज्यांसी उत्तरोत्तर दुःखफळ । यातना सकळ भोगवी ॥ ९८ ॥ मरमरों दुःख भोगी दारुण । उपजोनि कर्में करी हीन । दुःखावर्ती पडे जाण । आपणिया आपण घातक ॥ ९९ ॥ जे संतचरणींविमुख । त्यासी स्वप्नींहि नाहीं सुख । क्रूर कर्में करी कामुक । चढतें दुःख सकामा ॥ ६०० ॥ एवं प्रवृत्तीमाजीं असतां । सकाम कर्में आचरतां । सविधि अविधि कर्में करितां । दुःख सर्वथा अनिवार॥ १ ॥ सविधि काम्यें स्वर्गपतन । अविधि काम्यें नरक दारुण । एवं प्रवृत्तीमाजीं जाण । सुख कोण सकामा ॥ २ ॥ म्हणशी लोकपाळांच्या ठायीं । नित्य सुख असेल पाहीं । त्यासी जन्ममरण नाहीं । अमरत्व आम्हींही साधावें ॥ ३ ॥ लोकपाळांचे नित्य लोक । लोकपाळही नित्य देख । तेथें असेल नित्य सुख । ऐसें मूर्ख कल्पिती ॥ ४ ॥

लोकानां लोकपालानां मद्भयं कल्पजीविनाम् । ब्रह्मणोऽपि भयं मत्तो द्विपरार्धपरायुषः ॥ ३० ॥

—याप्रमाणें कर्मामध्यें प्रवृत्त झालेल्या पुरुषाला सुख नाहीं व शांतीहि नाहीं असा उपसंहार करितात—

देहेन दुःखोदर्काणि कर्माणि कुर्वन् पुनः तैः देहं आभजते—पुनरपि त्या कर्मांच्या योगानें देह धारण करितो. तत्र मर्त्यधर्मिणः किं सुखं—तेव्हां त्यांत मरणधर्मी पुरुषाला सुख कसलें ! २९.

बाबा उद्धवा ! ऐक. जीव मरणधर्मानें युक्त आहे. त्याला सुख मुळींच लाभत नाहीं. दुःखदस्थितींतच त्याचा नित्य वास असतो. ९७ मनुष्यजन्माला येऊन ते भयंकर क्रूर कर्में करितात. त्यामुळें त्यांना उत्तरोत्तर दुःखें हींच फलें मिळतात व सर्व यातना भोगाव्या लागतात. ९८ मरेमरेतों कष्ट करून ते भयंकर दुःख भोगितात व पुनः जन्म घेतला कीं तसलींच दारुण कर्में करितात. आपणच आपला घात करून दुःखरूप भोंवऱ्यांत पडतात. ९९ जे संतचरणापासून विमुख होतात त्यांना स्वप्नांतहि कधीं सुख लाभत नाहीं. ते कामेच्छु क्रूर कर्में करितात व त्यामुळें त्यांना वाढतें दुःख भोगावें लागतें. ६०० याप्रमाणें प्रवृत्तीमध्यें राहून विधियुक्त किंवा अविधियुक्त सकाम कर्में आचरीत असतां त्यांस अनिवार दुःखच भोगावें लागतें. १ विधियुक्त काम्य कर्मानें स्वर्गांतून पतन होण्याचें दुःख व अविधियुक्त कर्मानें भयंकर नरकवास, यांची प्राप्ति होते. तेव्हां सकाम प्राण्याला प्रवृत्तीमध्यें सुख कोठचें ! २ आतां तूं कदाचित् असें म्हणशील कीं, इंद्र, अग्नि, यम, निर्ऋति, वरुण, वायु, कुबेर, ईशान या आठ लोकपालांना शाश्वत सुख मिळत असेल, कारण त्यांना जन्ममरण नाहीं, तेव्हां आपणहि त्यांच्यासारखेंच अमरत्व साधावें. ३ पण दिक्पाळांचे लोक नित्य आहेत, तेव्हां त्यांचें सुखहि नित्य असेल, अशी जे कल्पना करितात, ते मूर्ख होत. ६०४.

—'तथापि लोक नित्य असल्यामुळें व त्यांना अमर्त्यधर्मत्व असल्यामुळें लोकपालांना सुख होईल' असें उद्धव म्हणेल म्हणून भगवान् सांगतात—

कल्पजीविनां लोकानां लोकपालानां मद्भयं—एक कल्पपर्यंत जिवंत रहाणाऱ्या लोकांना व लोकपालांनाहि काळरूपी मज परमेश्वराचें भय आहे. द्विपरार्धपरायुषः ब्रह्मणः अपि मत्तः भयं—ज्याचें परम आयुष्य दोन परार्ध दीव्य वर्षें आहे, त्या ब्रह्मदेवालाहि मजपासून भय आहे. ['या परमात्म्याच्या भीतीनें वारा वहातो, सूर्य उगवतो आणि अग्नि, इंद्र व मृत्यु हे आपापल्या कार्यांत नियमानें प्रवृत्त होतात. ' तै. भा. २. ८. १. पृ. १५० अशी याविषयीं श्रुति आहे. यास्तव प्रवृत्तिमार्ग असा अनर्थाचें निमित्त असल्यामुळें त्यापासून विरक्त होऊन निवृत्त होणेंच सर्वथा युक्त आहे, असा याचा भावार्थ.] ३०.

लोकपाळांमाजीं अमरेंद्र । मरुद्‌गणांचा राजा इंद्र । ज्यासी मानिती सूर्यचंद्र । वरुण कुबेर यमादि ॥ ५ ॥ ज्या अमरावती सिंहासन । ऐरावताचें आरोहण । उच्चैःश्रवा अश्व जाण । पुढें आपण खोलणिये ॥ ६ ॥ ज्यासी उर्वशी भोगपत्नी । रंभा मुख्य विलासिनी । जेथ तिलोत्तमा नाचणी । चिंतामणी लोळती ॥ ७ ॥ अष्टमासिद्धींचीं भांडारें । रत्नजडित धवळारें । मर्गजाचे डोल्हरे । सुवर्णसूत्रें लाविले ॥ ८ ॥ वैदूर्याचे शहाडे । कामधेनूंचे वाडे । कल्पद्रुमांचे मांदोडे । चहूंकडे शोभती ॥ ९ ॥ लोकपाळ आज्ञेचे । सुरसेना सैन्य ज्याचें । एवढें ऐश्वर्य जयाचें । राज्य स्वर्गींचें भोगित ॥ ६१० ॥ त्यासी माझी काळशक्ती । ब्रह्मयाचे दिनांतीं । चौदा इंद्र क्षया जाती । येरांची गती कायशी ॥ ११ ॥ ब्रह्मायु म्हणती समता । जो द्विपरार्धआयुष्यवंता । जंव न पवे माझी काळसत्ता । तंव श्लाघ्यता आयुष्याची ॥ १२ ॥ ज्यासी अग्रपूजेची मान्यता । जो लोकलोकपाळांचा कर्ता । त्या ब्रह्मयासी माझी काळसत्ता । ग्रासी सर्वथा सलोकें ॥ १३ ॥ मी काळात्मा दंडधरू । शास्ता नियंता ईश्वरू । अंतर्यामी सर्वेश्वरू । अतिदुर्धरू व्यापकू ॥ १४ ॥ माझा काळक्षोभ दारुण । त्यातें आवरूं शके कोण । धर्मअर्थकामें जाण । निवारण त्या नव्हे ॥ १५ ॥ प्रळयकर्त्या महाकाळासी । माझी कीर्ति ग्रासी । माझें महाभय सर्वांसी । लोकपाळांसी सुख कैंचें ॥ १६ ॥ लव निमेष पळापळें । माझेनि भयें सूर्य चळे । माझेनि भयें प्राण खेळे । वायू चळे माझेनि भेणें ॥ १७ ॥ माझे आज्ञेवरी अग्नि जाण । वसवीतसे जठरस्थान । मद्भयें नव्हे अधिक न्यून । पचवी अन्न चतुर्विध ॥ १८ ॥ यथाकाळीं पर्जन्यधारीं । इंद्र वर्षे मद्भयेंकरीं । मृत्यु स्वकाळें प्रळय करी । भय भारी त्या माझें ॥ १९ ॥ माझेनि भयेंकरीं देखा । समुद्र नोलांडी निजरेखा । माझिया भयाची थोर शंका । तिहीं लोकां कांपवी ॥ ६२० ॥ तिहीं लोकांचा शास्ता । ईश्वर तो मी

लोकपालांमध्यें अमरेंद्र म्हणजे मरुद्गणांचा राजा इंद्र श्रेष्ठ आहे. ज्याला सूर्य, चंद्र, वरुण, कुबेर, यम वगैरे सर्व मानितात. ५ ज्याचें सिंहासन अमरावती नगरींत आहे, जो ऐरावतावर बसतो, ज्याच्यापुढें कोतवाल घोडा होण्यास उच्चैःश्रवासारखा श्रेष्ठ अश्व आहे. ६ उर्वशीसारखी भोगपत्नी, रंभेसारखी अप्सरा विलास करावयास, तिलोत्तमेसराखी नृत्य करणारी, त्याला लाभलेली असते. चिंतामणीसारखीं रत्नें त्याच्याजवळ लोळत असतात. ७ अष्टसिद्धींचीं भांडारें, रत्नजडित शुभ्र प्रासाद, सोन्याच्या साखळदंडानें बांधलेले पाचूचे झोंपाळे, ८ वैडूर्याचे मोठाले वृक्ष, कामधेनूंचीं खिल्लारें आणि कल्पवृक्षांचे मळे चोहोंकडे शोभतात. ९ लोकपाळ त्याच्या आज्ञेंत रहातात. देवांच्या समुदायाचें सैन्य त्याच्या पदरीं आहे. इतकें ज्याचें वैभव आहे तो इंद्र स्वर्गाचें राज्य भोगितो. ६१० पण त्याला सुद्धां ब्रह्मदेवाचा कल्प संपतांच माझा काळ ग्रासितो. एका कल्पांत अशा चौदा इंद्रांचा क्षय होतो, मग इतरांची काय कथा ! ११ ब्रह्मदेवाचें आयुष्य सर्वांहून अधिक, त्याला दोन परार्ध वर्षें आयुष्य असतें. पण त्यावरहि माझी काळसत्ता जोंपर्यंत झडप घालीत नाहीं तोंपर्यंतच सर्व आयुष्याची मातब्बरी १२ ज्याला अग्रपूजेचा मान आहे, जो लोकांच्या लोकपालांचा कर्ता, त्या ब्रह्मदेवालासुद्धां माझी काळसत्ता ब्रह्मलोकासह ग्रासून टाकिते. १३ मी काळाचा आत्मा, दंड धारण करणारा, शासन करणारा, नियमन करणारा, ईश्वर, अंतर्यामी, सर्वेश्वर अति दुर्धर व सर्वव्यापी आहें. १४ माझा काळक्षोभ मोठा भयंकर आहे. त्याला कोण आवरूं शकणार ! धर्म, अर्थ व काम यांनीं त्याचें निवारण होत नाहीं. १५ प्रलय करणाऱ्या महाकाळालाहि माझी सत्ता ग्रासून टाकिते. माझें महाभय सर्वांना आहे. मग लोकपाळांना सुख कोठून मिळणार ! १६ माझ्या भीतीनें सूर्य लव, निमेष, पळ या कालक्रमानें सतत चालत असतो. माझ्या भयानेंच प्राण खेळवतो व वारा वहातो. १७ माझ्याच आज्ञेनें अग्नि जठरांत रहातो. व माझ्या भयानें कमी-जास्त न होतां खाण्याचें, पिण्याचें, चाखण्याचें व चोखण्याचें असें चार प्रकारचें अन्न पचवितो. १८ इंद्र माझ्याच भयानें योग्यवेळीं पाऊस पाडितो. मृत्यु त्याची वेळ होतांच प्रलय करितो कारण त्यालाहि माझें भारी भय वाटतें. १९ माझ्या भीतीनें समुद्र आपल्या मर्यादेचें उल्लंघन करीत नाहीं. माझी भीति तिन्ही लोकांचा थरकांप करविते. ६२० जो त्रैलोकीचें शासन करणारा ईश्वर तोच मी

नियंता । तेणें कर्मे जडाची वार्ता । अनीश्वरता छेदिली ।। २१ ।। प्रवृत्तीसी अनर्थता । मागां दाविली तत्त्वतां । वैराग्य स्थापिलें सदृढता । निवृत्ति सर्वथा अतिश्रेष्ठ ।। २२ ।। आपुल्या ऐश्वर्याच्या आविष्कारें । साधूनि ईश्वरत्व केलें खरें । मीमांसकमतनिराकारें । निरूपण पुढारें चालवी ।। २३ ।। मीमांसकमतवार्ता । बोलिले जीवासी अनेकता । तोचि कर्ता आणि भोक्ता । हेंचि सर्वथा निराकारी ।। २४ ।।

गुणाः सृजन्ति कर्माणि गुणोऽनुसृजते गुणान् । जीवस्तु गुणसंयुक्तो भुङ्क्ते कर्मफलान्यसौ ।। ३१ ।।

कृष्ण म्हणे उद्धवातें । एकादश इंद्रियें समस्तें । करिती नानाविध कर्मातें । आत्मा तो येथें सर्वसाक्षी ।। २५ ।। दीपु उजळलिया घरीं । लोक वर्तती व्यापारीं । तो नेमी ना निवारी । तैशापरी जीवू येथें ।। २६ ।। जीवू प्रेरोनि इंद्रियांतें । म्हणाल करवितसे कर्मातें । जेवीं कुऱ्हाडी घेऊनि हातें । छेदी वृक्षातें कृषीवळु ।। २७ ।। ऐशी इंद्रियांची प्रेरकता । जीवासी न घडे सर्वथा । ते न घडावयाची ऐक कथा । तुज तत्त्वतां सांगेन ।। २८ ।। इंद्रियां कर्मी प्रेरण । करिते सत्त्वादिक गुण । जीवू उभयसाक्षी जाण । कर्मकारण त्या नाहीं ।। २९ ।। अंगें नातळतां आपण । चुंबक संनिधिमात्रें कारण । अचेतन लोहा करी चळण । तैसा जाण जीव येथें ।। ६३० ।। कां उगवल्या दिवाकर । सुष्टुदुष्टु लोकव्यापार । तो सूर्यासी नातळे कर्मभार । साक्षी साचार कर्माचा ।। ३१ ।। तैसी जीवासी कर्तव्यता । सत्य नाहीं गा सर्वथा । दिसे जें कांहीं आपाततां । ते आध्यासिकता मिथ्यात्वें ।। ३२ ।। कवळें अध्यासिला

नियामक आहें. अर्थात् मी जड अनीश्वर आहें, अशी जी कित्येकांची समजूत आहे तिची निवृत्ति झाली. २१ प्रवृत्तिमार्गांतील अनर्थ मागें मी स्पष्ट दाखविले, वैराग्याची दृढ स्थापना केली. निवृति सर्वथैव अतिश्रेष्ठ आहे, २२ असें सांगून आपलें ऐश्वर्य प्रकट करून, ईश्वरत्व सिद्ध करून, मीमांसकांच्या मताचें निरसन केलें. आतां पुनः तेंच निरूपण पुढें चालवितात. २३ जीवाला अनेकत्व आहे, तोच कर्ता व भोक्ता आहे असें जें मीमांसकमतवादी सांगतात, त्याचें आतां पूर्ण निरसन करितात. ६२४.

— या कथनानेंच स्वतः ईश्वरत्वाचे आविष्करण करून ईश्वराच्या अभावाचा जो अंगीकार केला होता, त्याचा त्याग केला. आतां पूर्वीं प्रौढवादानें मीमांसकांच्या इतर मतांचाही जो अंगीकार केला होता त्याचें पुढील चार श्लोकांनीं निराकरण करितात. त्या श्लोकांतील पुढील एकतिसाव्या श्लोकानें आत्मा कर्तृरूप व भोक्तृरूपच आहे या मीमांसकांच्या म्हणण्याचें निराकरण करितात.

गुणाः कर्माणि सृजान्ति—गुण कर्मांना उत्पन्न करितात. आत्मा उत्पन्न करीत नाहीं. (आत्माच इंद्रियांना प्रवृत्त करून कर्मे करितो, म्हणून म्हणाल तर तें बरोबर नाहीं.) **गुणः गुणान् अनुसृजते**—सत्त्वादिगुण इंद्रियांना प्रवृत्त करितात. आत्मा करीत नाहीं. (त्यामुळें आत्म्याला कर्तृत्व नाहीं. आत्म्याचें भोक्तृत्वहि औपाधिकच आहे, असें उत्तरार्धानें सांगतात—) **जीवः तु गुणसंयुक्तः**—पण जीव इंद्रियादिकांनीं संयुक्त होतो. कारण, **असौ कर्मफला निभुङ्क्ते**— हा इंद्रियादिकांच्या ठिकाणीं ‘ मी ’ असा अहंकार धरितो व त्यामुळें कर्मफलें भोगितो. ३१.

श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाले कीं, हीं सर्व म्ह० अकरा इंद्रियें अनेक प्रकारचीं विचित्र कर्मे करितात व आत्मा त्या सर्वांचा साक्षी असतो. २५ घरांत दिवा लावून ठेविला कीं, सर्व माणसें आपापलीं कामें करण्यांत व्यग्र होतात. परंतु दिवा कांहीं कोणाला काम करण्यास सांगत नाहीं. किंवा तो कोणाचें निवारण करीत नाहीं. त्याचप्रमाणें शरीरांत आत्मा आहे. २६ तूं कदाचित् म्हणशील कीं, शेतकरी जसा हातांत कुऱ्हाड घेऊन झाडें तोडितो तसा जीव इंद्रियांना प्रेरणा करून त्यांच्याकडून कर्में करवितो, २७ तर त्याला इंद्रियांची प्रेरकता मुळींच संभवत नाहीं. त्याचें कारण मी तुला तत्त्वतः सांगतों, तें ऐक. २८ सत्त्व, रज व तम हे तीन गुण इंद्रियांना प्रेरणा करणारे आहेत आणि आत्मा, गुण व इंद्रियें या दोहोंचा साक्षी आहे. त्याला कर्माचें प्रेरकत्व नाहीं. २९ लोहचुंबक जसा स्वतः स्पर्श न करितांच लोखंडाला आकर्षण करून आपल्याकडे ओढितो तसाच हा आत्मा साक्षित्वानें शरीरांत कार्य करितो. ६३० सूर्य उगवला कीं लोकांचें चांगले व वाईट असे दोन्ही प्रकारचे व्यापार सुरू होतात. परंतु त्यांच्या त्या कर्मांचें प्रेरकत्व सूर्याकडे येत नाहीं. तो केवळ सर्व कर्मांचा साक्षी असतो. ३१ त्याप्रमाणें आत्म्याकडे खरोखर कर्तृत्व नाहीं. आपल्याला बाहेरून जें दिसतें तो केवळ मिथ्या भास आहे. ३२ कावीळ झालेल्या माणसाच्या

डोळा । तो चंद्रमा देखे पिंवळा । तेवीं आत्मा कर्ता भासे स्थूळा । केवळ निश्चळा नेणती ।। ३३ ।। सवेग चालतां आभाळें । बाळें म्हणती चंद्रमा पळे । तेवीं आत्मा कर्ता मानिती स्थूळें । उपाधिमेळें अध्यासु ।। ३४ ।। देह मी कर्म माझें । हें आत्मेनि स्वप्नीं नेणिजे । मृगजळीं बुडाले राजे । सत्य मानिजे तैसें हें ।। ३५ ।। एवं आत्म्यासी कर्तव्यता । सत्य नाहीं गा सर्वथा । त्यासी म्हणताती फळभोक्ता । तेही वार्ता मिथ्यात्वें ।। ३६ ।। स्वप्नीं जोडिल्या सहस्र गायी । जागृतीं त्यांचें दुभतें नाहीं । आत्मा भोक्ता तैसा पाहीं । उपाधीच्या ठायीं मिथ्यारूपें ।। ३७ ।। डबकीं प्रतिबिंबला रवी । तो जैं तेथील कर्दम सेवी । तैं भोक्ता आत्मा देहगांवीं । सत्य मानवीं मानावा ।। ३८ ।। मृगजळामाजीं मासे । बिंबला चंद्र गिळिती आवेशें । तैसा आत्मा देहाभिमानवशें । भोगविशेषें भोगिता ।। ३९ ।। एवं आत्मा जो भोक्ता । ते सोपाधिक वार्ता । उपाधि मिथ्या गा तत्त्वतां । आत्मा भोक्ता कैसेनी ।। ६४० ।। आत्मा अकर्ता अभोक्ता । सद्दढ साधिलें तत्त्वतां । जीवासी बोलिली अनेकता । ते मिथ्या आतां साधितू ।। ४१ ।।

यावत्स्याद्गुणवैषम्यं तावन्नानात्वमात्मनः । नानात्वमात्मनो यावत्पारतंत्र्यं तदेव हि ।। ३२ ।।

सत्वरजतमांचा । अंतरीं धुमाड्ड गुणकर्मांचा । तंव जीवासी अनेकत्वाचा । आभासु साचा मानला ।। ४२ ।। अहंकारादि देहपर्यंत । जंव जीवासी मीपण भासत । तंव नानात्व मानी सत्य । तें मिथ्या निश्चित उद्धवा ।। ४३ ।। जैसें आपुलेंचि मुख । आरिसा करी आपणासन्मुख । तैसें अविद्यायोगें मायिक । द्वैत देख ते दाखवी ।। ४४ ।। आरिशामाजीं आपुला । जो द्वैतप्रभावो स्वयें देखिला । तेणें आपण नाहीं द्विधा जाला । मिथ्या भासला आभासु ।। ४५ ।। तो आभास झालिया समोर ।

डोळ्यांना चंद्र जसा पिवळा दिसतो, त्याप्रमाणें जडबुद्धि माणसांना आत्माच कर्ता आहे, असें वाटतें. तो केवळ निश्चल आहे, हें ते जाणत नाहींत. ३३ आकाशांत मेघ वेगानें धांवत असतात, परंतु लहान बालकांना वाटतें कीं, चंद्रच पळत आहे. त्याचप्रमाणें जड बुद्धीचें लोक आत्म्याला कर्ता समजतात. मायेच्या उपाधीमुळें त्यांना हा भ्रम होतो. ३४ 'मीच देह, हीं कर्में माझीं' असें आत्म्याच्या स्वप्नींहि नसतें. 'मृगजलांत राजे बुडून मेले' हें खरें मानण्यासारखेंच हे म्हणणें आहे. ३५ याप्रमाणें आत्म्याला खरोखर कर्तृत्व नाहीं. त्याला फलाचा भोक्ता म्हणतात, पण तेंहि खोटेंच आहे. ३६ स्वप्नांत हजार गायींचा संग्रह केला तरी जागेपणीं जसें त्यांचें दूध मिळत नाहीं, त्याचप्रमाणें आत्मा भोक्ता नाहीं, उपाधीमुळें त्याचें खोटेंच भोक्तृत्व भासतें. ३७ डबक्यांत पडलेले सूर्याचें प्रतिबिंब जर तेथल्या चिखलाचें सेवन करील, तर मनुष्यदेहांतील आत्मा भोक्ता आहे, हें खरें मानितां येईल. ३८ चंद्राच्या प्रतिबिंबाला मृगजळांतील मासे मोठ्या वेगानें जसे गिळितात तसाच आत्माहि देहाभिमानामुळें अनेक प्रकारचे भोग भोगितो. ३९ आत्मा भोक्ता आहे, असें म्हणणें ही सोपाधिक वार्ता आहे. उपाधि खरोखर मिथ्या आहे, मग आत्मा भोक्ता कसा होईल ! ६४० याप्रमाणें आत्मा अकर्ता, अभोक्ता आहे, हें सप्रमाण सिद्ध केलें आतां जीवाला अनेकत्व आहे, या म्हणण्यांतील मिथ्यात्व दाखवितात. ६४१.

—मीमांसक आत्म्याचें नानात्व मानितात, पण तेंहि औपाधिक आहे, असें या श्लोकांत सांगतात—

यावत् गुणवैषम्यं स्यात् तावत् आत्मनः नानात्वं—जोंवर गुणांचें अहंकारादि कार्यरूप वैषम्य असतें तोंवर आत्म्याचें नानात्व प्रतीत होतें. (अहोपण, आत्म्याला जर एकत्व आहे तर जीवांना पारतंत्र्य कसें सांगितलें आहे ! व लोकपालादिकांनाहि ईश्वराचें भय कसें सांगितलें आहे ? उत्तर—) **यावत् आत्मनः नानात्वं**—जोंवर आत्म्याचें नानात्व असतें, **तदेव हि पारतंत्र्यं**—तोंवरच जीवांना पारतंत्र्य असतें. ३२.

सत्त्व, रज, तम व त्यांचीं गुणकर्में यांची अंतःकरणांत जोपर्यंत धुमाकुळ चालते तोंपर्यंत जीवाला अनेकत्व आहे, हा भ्रमहि खरा वाटतो. ४२ अहंकारादिकांपासून शरीरापर्यंत जोंवर जीवाला 'मीपणा' भासतो, तोंवरच जीवाचें अनेकत्व खरें भासतें, पण हे उद्धवा ! तें खोटें आहे. ४३ आरसा जसें आपलेंच मुख आपल्याला दाखवून आपण दोन व्यक्ति असल्याचें भासवितो, त्याचप्रमाणें माया अविद्येमुळें जीवाला मिथ्या द्वैत दाखविते. ४४ आरशांत आपलेंच रूप आपण पाहिल्यावर आपण खरोखर कांहीं दोन व्यक्ति होत नाहीं. त्याला मिथ्या भासच मानितो. ४५

त्रिगुण गुणांचे विकार । एकचि दावी नानाकार । दिसे साचार गुणक्षोभें ।। ४६ ।। जैसें आपुलेंचि मुख केवळ । शस्त्र आदर्श आणि जळ । लांब निश्चळ चंचळ । करी प्रबळ विकारी ।। ४७ ।। एवं त्रिप्रकार कार्यविशेखें । मुखचि देखिजे निजमुखें । तैसें तें नानात्व लटिकें । गुणक्षोभकें भासतु ।। ४८ ।। सूत्रचि विणिलें पटाकारीं । पटावरी तंतूंच्या हारी । दिसती तेवीं चराचरीं । नानाकारीं एकुचि ।। ४९ ।। साकरेचा केला ऊंसू । वरी कठिण आंत बाकसू । मधील पिळून घ्यावा रसू । हा त्रिगुण दोषू त्या नाहीं ।। ६५० ।। तैसा परमात्मा श्रीहरी । अद्वितीय एकु चराचरीं । त्यासी अनेकत्वाची परी । सत्वादि करी गुणक्षोभू ।। ५१ ।। जैसा बहुरूपी आपुल्या ठायीं । नाना सोंगें धरी देहीं । तितुकीं रूपें त्यासी नाहीं । एकला पाहीं अद्वैत ।। ५२ ।। तैसा सच्चितानंद श्रीहरी । आत्मा एक चराचरीं । नांदताहे नानाकारीं । द्वैतामाझारीं अद्वैत ।। ५३ ।। अद्वैत साधिलें जीवासी । सत्य मानलें आम्हांसी । परी एक आशंका ऐसी । निजमानसीं वर्तत ।। ५४ ।। तूंचि म्हणसी जीव परतंत्र । आतां अद्वैतपणें स्वतंत्र । बोलसी बोलणें विचित्र । केवीं साचार मानावें ।। ५५ ।। अद्वैतपणा संपादिसी । माझें भय लोकपाळां म्हणसी । हें न मनें गा आम्हांसी । अद्वैतासी भय कैंचें ।। ५६ ।। ऐशिया रीतीं उद्धवा । झाल्या संदेहासी रिघावा । तो तूं आतळों नेदीं जीवा । ऐक बरवा निर्धारू ।। ५७ ।। जीवासी उपाधीसीं तादाम्यता । तंव तंव आभासे नानात्मता । नानात्वीं परतंत्रता । ईश्वरसत्ता नियामक ।। ५८ ।। अमित मीनलिया दळ । सेनापतीवीण विकळ । आंबा पिकलिया रसाळ । राखण सबळ त्यापासीं ।। ५९ ।। तैसी जीवासी जंव अनेकता । तंव सृष्टीसी कर्ता हर्ता नियंता । जाण ईश्वरूचि सर्वथा । परतंत्रता ते जीवासी ।। ६६० ।। अनेकत्वें परतंत्रता । यालागीं ईश्वर नियंता । ऐसी देखोनि ईश्वरसत्ता । भय समस्तां

तो आभास समोर आला असतां त्रिगुणांचे विकार एकालाच त्रिविध करून दाखवितात व गुणक्षोभामुळें तें सर्व खरें आहे, असें वाटतें. ४६ ज्याप्रमाणें आपलें मुख तलवारीच्या पाजळलेल्या पात्यावर पाहिल्यास तें लांबट दिसतें. तेंच आरशांत पाहिलें कीं, निश्चल दिसतें व त्याचें पाण्यांतील प्रतिबिंब चंचळ दिसतें. ४७ या तीन प्रकारच्या भिन्न पदार्थांमुळें आपलें मुख जसें भिन्न प्रकारचें दिसतें, त्याचप्रमाणें गुणक्षोभामुळें भासणारें नानात्व खोटें आहे. ४८ सर्व वस्त्र सुतानेंच विणिलेलें असतें व त्या वस्त्रांत त्या धाग्यांच्या ओळी सारख्या दिसत असतात. त्याचप्रमाणें या चराचर सृष्टींत जरी अनेक आकार भासले तरी त्यांत मुख्य तत्त्व एकच आहे. ४९ साखरेचा जर ऊंस बनविला तर तो वरून दिसावयाला कठीण व आंतून पोकळ असतो. त्यांतील रस पिळून घेणें, हा त्रिगुणांचा दोष त्यांत नसतो. ६५० त्याचप्रमाणें परमात्मा श्रीहरि हा एक अद्वितीय असून सर्व चराचरामध्यें भरून राहिला आहे. सत्त्व, रज व तम या गुणांच्या क्षोभामुळें त्याच्यांत अनेक प्रकार भासतात. ५१ बहुरूपी जसा नानाप्रकारचीं सोंगें घेतो, पण खरोखर कांहीं त्याचीं तेवढीं रूपें नसतात. त्याचें स्वाभाविक रूप एकच आहे. ५२ तसाच सच्चिदानंद हरि एकाच आत्मरूपानें सर्व चराचरांत अनेक आकारानें रहातो. सर्व द्वैतांत तो अद्वैत आहे. ५३ जीवाचें अद्वैत जें तूं सिद्ध केलेंस तें आम्हांला पटलें; परंतु आमच्या मनांत आतां एक शंका राहिली आहे. ५४ तूंच म्हणतोस कीं जीव परतंत्र आहे व आतां अद्वैतपणानें त्यालाच स्वतंत्र म्हणतोस. हें तुझें परस्परविरोधी चमत्कारिक बोलणें आम्हीं खरें कसें मानावें ! ५५ तूं अद्वैतपणाचें प्रतिपादन करितोस आणि लोकपाळांनाहि माझें भय आहे म्हणतोस ! पण हें आमच्या मनाला पटत नाहीं. कारण अद्वैताचें भय कसलें ? ५६ हे उद्धवा ! असा जर तुला संशय आला असला तर तर तो तूं मनांत ठेवूं नकोस. त्याचा निर्णय ऐक. ५७ जीव उपाधीशीं जसा जसा तादाम्य पावतो तसा तसा अनेकत्वाचा भास होऊं लागतो. अनेकत्व आलें कीं, पारतंत्र्य आलेंच व पारतंत्र्याबरोबर ईश्वराची नियामक सत्ताहि आलीच. ५८ असंख्य सैन्य जमलें तरी तें सेनापतीवांचून व्यर्थ आहे. आंब्याला असंख्य फळें लागलीं म्हणजे त्याच्याजवळ राखणहि ठेवावी लागतेच. ५९ त्याप्रमाणें जोंवर जीवाचें अनेकत्व भासतें, तोंवर सृष्टीचा उत्पत्ति, स्थिति व लय करणारा नियंता ईश्वर सर्वथैव असतो. म्हणून जीव परतंत्र आहे. अनेकत्वामुळें त्याला पारतंत्र्य प्राप्त होतें. ६६० म्हणूनच ईश्वर नियंता आहे. ईश्वराची ही सत्ता पाहिली कीं, सगळ्या जीवांना

जीवांसी ॥ ६१ ॥ माझे ईश्वरी सत्तेचे भयें । देखोनि अंतकूही भीताहे । इंद्रादिकांचा पाडू काये । भय वाहे विधाता ॥ ६२ ॥ माझी अत्यंत प्रळयींची सत्ता । वाजे हरिहरांचे माथां । अनेकत्वाचा संहर्ता । मीचि सर्वथा निजकाळु ॥ ६३ ॥ यालागीं अनेकत्व जंव आहे । तंववरी दुस्तर काळभये । जेव्हां अनेकत्व नाहीं होये । तेव्हां काळु काये नाशील ॥ ६४ ॥ एवं अनेकत्वाचे माथां । ईश्वरभयाची काळसत्ता । अनेकत्वें परतंत्रता । जाण सर्वथा उद्धवा ॥ ६५ ॥ तें अनेकत्व जैं जाये । तैं काळ नाहीं मा कैंचें भये । पर नसतां परतंत्र न होये । एकत्वीं आहे स्वानंद ॥ ६६ ॥ जेथ द्वैताचा मळु तुटी । ऐक्य देखे सकळ सृष्टीं । तेव्हां स्वानंदाचिया कोटी । भोगी उठाउठी निजबोधें ॥ ६७ ॥ ज्या सुखाची मर्यादा । देशें काळें न करवे कदा । त्या सुखाची सुखसंपदा । भोगिती सदा अद्वैतें ॥ ६८ ॥ निजात्मज्ञानें अलोलिक । दुर्जेनवीण अद्वैत सुख । सांडूनि कर्मवादी परम मूर्ख । नाना लोक वांछिती ॥ ६९ ॥ मागां कर्मवादी कर्मठ । बोलिलें प्रवृत्ति अतिश्रेष्ठ । कर्मे करूनियां उद्भट । भोग वरिष्ठ भोगावे ॥ ६७० ॥ तेंचि निरसोनि आतां । पुढारीं चालविली कथा । उद्धवासी अद्वैतता । दृढ सर्वथा सांगत ॥ ७१ ॥

यावदस्याऽस्वतंत्रत्व तावदीश्वरतो भयम् । य एतत्समुपासीरंस्ते मुह्यन्ति शुचार्पिताः ॥ ३३ ॥

गुणवैषम्य ज्यांचे ठायीं । ते नरभोगासक्त पाहीं । यागादि कर्मे करूनि देहीं । भोगस्थान तेंही ठाकिलें ॥ ७२ ॥ जे जे ठाकूनि गेले लोक । तेथूनि याज्ञिका पतनधाक । तंव दुःखी देखे लोकनायक । अनित्य लोक देखोनि ॥ ७३ ॥ पदच्युती लोकच्युती । भोगकर्मे भोगच्युती । केले कष्ट वृथा जाती । दुःखी

भय वाटतें. ६१ माझ्या ईश्वरीसत्तेच्या भयाला पाहून साक्षात् मृत्युहि घाबरतो. तेथें इंद्रादिकांची काय कथा ! ब्रह्मदेवालाहि माझें भय वाटतें. ६२ माझी महाप्रलयकाळची सत्ता हरि-हरांच्याहि मस्तकांवर आदळते. अनेकत्वाचा संहार करणारा महाकाळ मीच आहें. ६३ यास्तव जोंपर्यंत अनेकत्व आहे तोंपर्यंत काळाचें दुस्तर भय आहे. जेव्हां अनेकत्वच नाहींसें होईल तेव्हां काळ तरी नाश कशाचा करणार ! ६४ याप्रमाणें अनेकत्वाच्या ठिकाणीं ईश्वरभयाची काळसत्ता रहाते. अनेकत्वामुळेंच ही परतंत्रता आहे, असें हे उद्धवा ! तूं निश्चयानें जाण. ६५ तें अनेकत्व जेव्हां नाहींसें होतें तेव्हां काळहि जातो. मग भय कशाचें ! परच नाहीं, तेव्हां परतंत्र कोण होणार ! एकत्वामध्येंच आनंद असतो. ६६ जेथें द्वैताची कुबुद्धि नसते तेथें सर्व सृष्टि ऐक्यरूपानेंच दिसते. त्यावेळीं तत्काळ आत्मज्ञानानें स्वानंदाच्या राशी पडतात. ६७ ज्या सुखाला देश-कालादिकांनीं केव्हांहि मर्यादित करितां येत नाहीं , त्या सुखाचा सांठा अद्वैतांत निरंतर भोगावयास मिळतो. ६८ आत्मज्ञानानें प्राप्त होणारें विलक्षण अद्वितीयं अद्वैतसुख सोडून अत्यंत मूर्ख कर्मवादी स्वर्गादि नानाप्रकारच्या लोकांची इच्छा करितात. ६९ मागें कर्मवादी कर्मठांनीं 'प्रवृत्तिमार्गच अतिशय श्रेष्ठ आहे म्हणून उत्तम कर्मे करून उच्चप्रतीचे भोग भोगावे,' असें म्हटलें होतें. ६७० त्याचें निरसन करून भगवान् आतां उद्धवाच्या मनांवर पूर्ण अद्वैत ठसविण्यासाठीं आपलें निरूपण पुढें चालवितात. ६७१.

यावत् अस्य अस्वतंत्रत्वं तावत् ईश्वरतः भयं– जोंवर याला अस्वतंत्रत्व असतें तोंवरच त्याला ईश्वरापासून भय असतें. (आतां प्रवृत्तीच श्रेयस्कर आहे असें जें वर सांगितलें आहे, त्याविषयीं सांगतात.) **ये एतत् समुपासीरन् ते शुचार्पिताः मुह्यन्ति**–जे या गुणवैषम्याचें, त्यामुळें होणाऱ्या भोगांचें व कर्मांचें सेवन करितात ते या लोकादिकांना अनित्यत्व असल्यामुळें शोकांत मग्न होऊन मोहित होतात. ३३.

ज्या माणसांत गुणांचें वैषम्य असतें तेच भोगांमध्यें आसक्त होतात, हें लक्षांत ठेव. ते देहवान् यज्ञयागादि कर्मे करून भोगाचें स्थान प्राप्त करून घेतात. ७२ परंतु जेवढे याज्ञिक स्वर्गीं जातात तेवढ्यांना तेथून पतन होण्याचा धाक असतोच. म्हणून स्वर्गहि अनित्यच आहे, हें जाणून तेथला अधिपति जो इंद्र तोहि दुःखीच असतो. ७३ तो आपल्या पदापासून च्युत होतो. जीव स्वर्गलोकापासून च्युत होतात. भोग भोगल्यानें त्यांच्य

होती निजपतनें ॥ ७४ ॥ घायाळा कीजे तरटमार । तैसें ओतप्रति दुःख फार । भंवे जन्ममरण-व्यवहार । भोगी अघोर गर्भवास ॥ ७५ ॥ रहाटमाळेचे करे । पुढतीं रिता पुढतीं भरे । तैसा अविश्रम फिरे । गर्भद्वारें मरणांतीं ॥ ७६ ॥ विंचें खादिल्या दुःखितासी । दाढीसी आग लागे त्यासी । तेवीं भोगक्षयें पतितासी । गर्भवासीं पीडा होय ॥ ७७ ॥ लोकांची अनित्यता नेणती । यालागीं परमदुःखी होती । कष्टाचें फळ दुःखप्राप्ती । संसारावर्ती अडकले ॥ ७८ ॥ केवळ लोकभोग नित्य । हेंही न घडे गा येथ । भोगलोक होत सत्य । तरी अनित्य म्हणावे ॥ ७९ ॥ जेवीं दोरीं सर्पाभास । तेवीं लोक चतुर्दश । केवळ मायामय विलास । सुखलेश तेथ कैंचा ॥ ६८० ॥ केवळ जें कां मायिक । त्यामाजीं कैंचें भोगसुख । कर्मठ ते केवळ मूर्ख । विषय मायिक वांछिती ॥ ८१ ॥ भरलें मृगजळाचें तळें । तेणें जैं पिकती साळीकेळें । तैं विषयभोगीं सुख फळे । हें न कळे भ्रांतासी ॥ ८२ ॥ जग दुमदुमित भरलें दिसे । तें तूं मायिक म्हणसी कैसें । हेंचि कळे आनायासें । तुज मी तैसें सांगेन ॥ ८३ ॥

काल आत्माऽऽगमो लोकः स्वभावो धर्म एव च । इति मां बहुधा प्राहुर्गुणव्यतिकरे सति ॥ ३४ ॥

केवळ मायामय कल्पित । संसार तो अज्ञानजनित । एकातें अनेक म्हणत । चित्तें दुश्चित होउनी ॥ ८४ ॥ कनकबीजसेवनें जैसें । शहाणें माणूस होय पिसें । मग त्यासी नसतेंचि आभासे । ससे मासे गो सर्प ॥ ८५ ॥ तैसें मायावशें अतिभ्रांता । नसतें अनेकत्व भासे चित्ता । नभीं गंधर्वनगर पाहतां । दिसे शोभित पुरदुर्ग ॥ ८६ ॥ कां अंधारीं दोरू दिसे डोळां । म्हणे

भोगांचा क्षय होतो व केलेले सर्व श्रम व्यर्थ जातात आणि त्यांना अधःपाताचें दुःख भोगावें लागतें. ७४ एखाद्याच्या जखमेवर जर तरटानें मारिलें तर त्याला जशा असह्य वेदना होतात, तशा यातना जन्म-मरणाची परंपरा व भयंकर गर्भवास भोगितेवेळीं जीवाला होतात. ७५ रहाटगाडग्याच्या क्रमांत एकदां पोहरा भरतो, पुनः रिकामा होतो, पुनः भरतो, त्याप्रमाणें मरणानंतर गर्भवासाचे फेरे अव्याहत चालले आहेत. ६५ विंचू चावल्यामुळें अगोदरच तळमळ होत असावी व त्यांत आणखी दाढी पेटावी म्हणजे त्या दुःखाला जसा पारावर रहात नाहीं, त्याप्रमाणें भोग संपतांच स्वर्गांतून खालीं पडलेल्या जीवाला गर्भवासाची असह्य व्यथा होते. ७७ स्वर्ग अशाश्वत आहे हें त्यांना कळत नाहीं, म्हणून ते असे अत्यंत दुःखी होतात. 'दुःखप्राप्ति' हेंच त्यांच्या सर्व परिश्रमाचें फल त्यांना मिळतें व ते दुःखरूपी भोंवऱ्यांत सांपडतात. ७८ ज्या स्वर्गलोकीं भोग भोगावयास मिळतो तो स्वर्ग तरी नित्य असेल म्हणावें तर तेंहि खरें नव्हे. हे स्वर्गलोक जर सत्य असते तर त्यांना अशाश्वत कशाला म्हटलें असतें ! ७९ दोरीवर जसा सर्पाचा भास व्हावा, त्याप्रमाणें हीं चवदा भुवनें केवळ मायेचा खेळ आहे. तेथें सुखाचा लेश नाहीं ! ६८० जें केवळ मिथ्याच आहे, त्यामध्यें भोगाचें खरें सुख कसें मिळणार ? परंतु हे कर्मठ निव्वळ मूर्ख असतात, म्हणून अशाश्वत विषयांची इच्छा करितात. ८१ मृगजलानें भरलेल्या तळ्यांतील पाण्यानें जशीं भाताचीं शेतें व केळ्यांच्या बागा पिकवाव्या, त्याप्रमाणेंच या विषय-भोगांतील सुख आहे, पण भ्रांताला हें कळत नाहीं. ८२ उद्धवा ! तूं विचारशील कीं, हें जगत् तर सगळें गजबजलेलें दिसत आहे. मग त्याला तूं मायिक कसें म्हणतोस, तर तेंच आतां तुला सहज कळेल अशा रीतीनें मी सांगतों. ६८३.

—लोकांना केवल अनित्यत्वच नाहीं, तर मायाममत्वहि आहे, असें आतां सांगतात—

कालः आत्मा आगमः लोकः स्वभावः धर्मः एव च इति गुणव्यतिकरे सति मां बहुधा प्राहुः—काल, आत्मा, वेद, लोक, देवत्वादि परिणामाचा हेतु, धर्म व त्याच्या भोगाचें कारण असें मायेचा क्षोभ झाला असतां मलाच अनेक प्रकारें बोलतात; पण त्या कालादिकांतील कोणीहि माझ्याहून भिन्न नाहीं. ३४.

हा संसार अज्ञानापासून उत्पन्न झालेला व केवळ मायिक असून काल्पनिक आहे. मनाच्या विकल्पामुळेंच संसारी जीव एकाला अनेक म्हणतो. ८४ धोत्र्याचें बीं खाल्लें म्हणजे शहाणा मनुष्यहि जसा वेडा होतो व त्याला ससा, मासा, गाय, सर्प वगैरे नसलेल्या प्राण्यांचा भास होतो. ८५ त्याप्रमाणें संसारीं जीव मायेच्या वश होऊन भ्रमिष्ट होतात व त्यांच्या चित्ताला अनेकत्व भासतें. आकाशांत गंधर्वनगर पाहिलें म्हणजे त्यांत शोभिवंत किल्ले

सर्प दंड कीं सुमनमाळा । नाना एकावळी मुक्ताफळां । कोणी अबळा विसरली ॥ ८७ ॥ तेवीं निजात्मा मी पुरुषोत्तम । त्या मज नाना रूपें नाम कर्म । काळु आत्मा आगम । स्वभावो धर्म मज म्हणती ॥ ८८ ॥ 'काळु' म्हणती प्रकृतिक्षोभकू । 'आत्मा' म्हणती प्रकृतिनियामकू । 'वेद' म्हणती कर्मबोधकू । अदृष्टद्योतकू 'धर्म' म्हणती ॥ ८९ ॥ अदृष्ट दृष्ट करूनि भोगविजे । यालागीं 'धर्म' तो म्हणिजे । आतां 'स्वभावो' जेणें बोलिजे । तेंही सहजें परियेसीं ॥ ६९० ॥ आत्मा भोक्ता हा 'स्वभावो' । जेणें परिणामे देवाधिदेवो । इत्यादिका हेतू पहा हो । मजचि 'स्वभावो' म्हणताती ॥ ९१ ॥ अदृष्टाचें फळ नाना लोक । 'लोक' म्हणावया हेतु हे देख । एवं मज एकातें अनेक । मिथ्या मूर्ख मानिती ॥ ९२ ॥ नानारंगाचिया वृत्ती । चित्र लिहिलें यथानिगुतीं । तेंही नानाकारें दिसे भिंतीं । सर्वव्यक्तिद्योतक ॥ ९३ ॥ तैसे नानाकार नाना धर्म । नाना नामें नाना कर्म । तें मी अवघा आत्माराम । सर्वोत्तम सर्वथा ॥ ९४ ॥ मजवेगळा रिता कांहीं । अणुभरी ठाव उरला नाहीं । मीं सर्वात्मा सर्व देहीं । सर्वगत पाहीं सर्वदा ॥ ९५ ॥ जैसे सागरामाजीं तरंग । तैसें मजमाजीं दिसे जग । जग नव्हे तें मीचि चांग । सुख अव्यंग मजमाजीं ॥ ९६ ॥ मी शुद्ध बुद्ध मुक्तस्वभाव । त्या मज नानात्वें ठेविती नांव । उद्धवा ज्यासी जैसा भाव । तैसा मी देव तयासी ॥ ९७ ॥ नास्तिक्य वसे ज्याचे ठायीं । त्यासी मी सर्वथा कोठें नाहीं । आस्तिक्यवंतालागीं पाहीं । मी सर्वांठायीं तिष्ठतू ॥ ९८ ॥ भावार्थें ज्या मज जेथें पाहे । त्यासी मी तेव्हांचि तेथें आहें । मज पावावया उपायें । बहुत पाहें न लगती ॥ ९९ ॥ मी सर्वात्मा सर्वगत एकू । ऐसा जयाचा भाव निष्टंकू । तोचि पढियंता मज एकू । ज्ञानतिलकू तो माझा ॥ ७०० ॥ तो आत्मा मी त्याचें देह । मी ध्याता तो माझें ध्येय ।

दिसतात. ८६ किंवा अंधारांत एखादी दोरी पडलेली असली कीं, कोणाला तो सर्प वाटतो, कोणी तिला कांठी समजतो. कोणाला ती फुलांची माला दिसते, तर कोणी एखादी स्त्री हा येथें मोत्यांचा एक सर विसरली आहे, असें म्हणतो. ८७ त्याप्रमाणें लोक आपलाच आत्मा जो मी पुरुषोत्तम, त्या माझी नानाप्रकारचीं नांवें, रूपें व कर्में कल्पून मला काळ, आत्मा, वेद, स्वभाव व धर्म म्हणतात. ८८ मी प्रकृतीला क्षुब्ध करणारा म्हणून कोणी मला काळ म्हणतात. प्रकृतीचें नियमन करणारा म्हणून आत्मा म्हणतात. कर्मांचा बोध करणारा म्हणून वेद व अदृष्टाचा द्योतक म्हणून धर्म असें म्हणतात. ८९ मी अदृष्टाला दृश्यरूपानें भोगवितों म्हणून मला धर्म म्हणतात. आतां ज्यामुळें मला 'स्वभाव' म्हणतात, तेंहि कारण ऐक. ६९० आत्मा भोक्ता हाच स्वभाव आहे. ज्या परिणामानें देवाधिदेव आत्मा, भोक्ता, स्वभाव इत्यादिकांचें कारण होतो, त्या माझ्या परिणामालाच स्वभाव म्हणतात. ९१ अनेक लोक हेंच अदृष्टाचें फल आहे आणि मला लोक म्हणण्याचें कारणहि हेंच आहे. सारांश मी एकच असून मूर्ख लोक मला अनेक समजतात. ९२ निरनिराळे रंग घेऊन व्यवस्थित चित्र तयार केलें तर भिंतीवर तें चित्रच अनेक आकृति दाखवितें व अनेक व्यक्तींचा बोध करून देतें. पण वस्तुतः ती एक भिंतच असते. ९३ त्याचप्रमाणें अनेक रूपें, नानाप्रकारचें धर्म, असंख्य नांवें व विविध कर्में हें सर्व मीच एक आत्मराम, सर्वोत्तम आहें. ९४ माझ्याहून निराळी अशी रेसभरहि जागा नाहीं. मी सर्वांच्या शरीरांत असणारा सर्वांचा आत्मा आहें. सर्वदा सर्वव्यापी आहें. ९५ समुद्रावर जशा लाटा येतात त्याप्रमाणें माझ्यांत सर्व जगत् दिसतें. हें सर्व जगत् नसून वास्तविक मीच आहें. अव्यंग सुख माझ्यांतच आहे. ९६ मी शुद्ध, बुद्ध, मुक्तस्वभाव असूनहि मला अनेक प्रकारचीं नांवें देतात. हे उद्धवा ! ज्याची जशी श्रद्धा असते, तसा मी त्याला देव दिसतों. ९६ ज्याची नास्तिकवृत्ति असते त्याला मी कोठेंच दिसत नाहीं व आस्तिक्य बुद्धीच्या माणसाला मी सर्वत्र दिसतों. ९७ भक्तीनें जो मला जेथें पाहूं इच्छितो तेथें मी त्याच्या दृष्टीस पडतों. मला प्रसन्न करण्यास त्याला फारसे आयासहि करावे लागत नाहींत. ९९ मी सर्वांचा अंतर्यामी, सर्वव्यापी, एक आहें, असा ज्यांचा पूर्ण भाव आहे तोच माझा अत्यंत आवडता व ज्ञानाचा तिलक आहे. ७०० असा भक्त माझा आत्मा व मी त्याचा देह

मी ज्ञाता तो शुद्ध ज्ञेय । ऐसा पढिये तो आम्हां ।। १ ।। उद्धवा हे एकात्मताभक्ती । सज्ञान ज्ञाते येणें भजती । तयां मज अभेदप्रीती । तुवांही या रीतीं भजावें ।। २ ।। परमात्मा एक नित्य शुद्ध । त्यासी मायामय संसारबंध । मिथ्या जाण देहसंबंध । हा निजात्मबोध पैं माझा ।। ३ ।। हा मिथ्यासंबंध पडे जीवासी । आत्मज्ञानें मुक्ति त्यासी । हें मागें बोलिलों तुजपाशीं । तेंचि मत निरासीं दृढ केलें ।। ४ ।। धरोनि श्लोक चौदावा । अंतीं श्लोक चौतिसावा । मीमांसकमताचा आघवा । निरासू बरवा येणें केला ।। ५ ।। एवं निरसोनि मतांतर । अद्वैत स्थापिलें दृढतर । हेंचि निजज्ञान साचार । चराचरवरिष्ठ ।। ६ ।। अद्वैतज्ञान शुद्ध चोख । ऐकोनि उद्धवा जालें सुख । हृदयीं दाटला जी हरिख । पाहे श्रीमुख कृष्णाचें ।। ७ ।। चालिलें सात्विकाचें भरितें । चित्त विसरलें चिंतनातें । अश्रु लोटिले जी तेथें । आपआपणियातें विसरला ।। ८ ।। उद्धवासी नावेक । पडोनि ठेलें जी ठक । सावध होऊनियां देख । कृष्णासंमुख तो जाला ।। ९ ।। अद्वैतभजनें जे भजते । ते भक्त कृष्णासी आवडते । तें केवीं प्राप्त होय मातें । यालागीं हरीतें पुसतु ।। ७१० ।।

उ० उ०- गुणेषु वर्तमानोऽपि देहजेष्वनपावृतः । गुणैर्न बध्यते देही बध्यते वा कथं विभो ।। ३५ ।।

उद्धव म्हणे कृष्णनाथा । आत्मा देहामाजीं असतां । बंधन पावे जी तत्त्वतां । कीं सर्वथा पावेना ।। ११ ।। गुण असतां मुक्ति घडे । कीं गुण गेलिया मुक्ति जोडे । हेंचि सांगावें मज पुढें ।

आहें. तो माझ्या ध्यानाचा विषय व मी त्याचें ध्यान करणारा आहें. तो पवित्र ज्ञानाचा विषय व मी जाणणारा इतका तो मला प्रिय असतो. १ हे उद्धवा ! हीच अनन्य भक्ति होय. ज्ञानयुक्त विद्वान् याच भक्तीनें मला भजतात. त्यांच्यांत व माझ्यांत अभेद प्रेम असतें. करितां तूं देखील अशाच रीतीनें माझी भक्ति कर. २ परमात्मा एक, नित्य व शुद्ध आहे. त्याला मायामय संसारबंधन नाहीं. देहाचा संबंध खोटा आहे. हाच माझा आत्मबोध आहे. ३ जीवाला मिथ्या संबंध घडतो. आत्मज्ञानानें तो मुक्त होतो. हें मीं तुला मागें सांगितलेंच आहे. तेंच आतां इतर मतांचें खंडन करून दृढ केलें. ४ या अध्यायाच्या चौदाव्या श्लोकापासून चौतीसाव्या श्लोकांपर्यंत कर्मवादी पूर्व-मीमांसकांच्या मताचें सविस्तर खंडन केलें. ५ तसेंच इतर पक्षांचें निरसन करूनहि अद्वैत मत पूर्णपणें प्रस्थापित केलें. हेंच आत्मज्ञान सर्वांत श्रेष्ठ आहे. ६ हें शुद्ध पवित्र अद्वैत ज्ञान ऐकून उद्धवाला संतोष झाला. त्याचें अंतःकरण आनंदानें भरून आलें व त्यानें श्रीकृष्णाच्या मुखाकडे पाहिलें. ७ त्याच्या मनांत सात्त्विक भाव प्रकट झाले. मन चिंतन करावयास विसरलें, डोळे आनंदाश्रूनें भरून आले व तो देहभानहि विसरला. ८ उद्धव क्षणभर भान सोडून अर्थशून्य दृष्टीनें श्रीकृष्णाकडे टक लावून बसला. त्याचें तादात्म्य झालें. पण लगेच तो भानावर येऊन श्रीकृष्णाच्या पुढें सरकला व त्याला विचारूं लागला कीं, ९ अद्वैत भक्तीनें भजणारे भक्त जर भगवानाला आवडतात, तर ती भक्ति मला कशी साध्य होईल, तें सांग. ७१०.

—यावरून निवृत्तिच मुक्तीचा उपाय असल्यामुळें श्रेयस्कर आहे, हें सिद्ध झालें. तसेंच आत्मा एकच आहे, त्याचा गुणकार्यभूत देहाशी संबंध झाल्यामुळें हा संसाररूप बंध आहे, आत्मज्ञानानें मुक्ति होते, असें या अध्यायाच्या आठव्या श्लोकापासून सांगितलें व तेंच चौदाव्या श्लोकापासून मतान्तराचा निरास करून दृढ केलें. त्यावर आतां उद्धव असा प्रश्न करितो—

उद्धवः उवाच—उद्धव म्हणाला (गुणांच्या अभावी मुक्ति होते कीं गुण विद्यमान असतानांच मुक्ति होते ? यांतील पहिल्या-पक्षी ज्ञान साधनांच्या अभावी मुक्ति संभवत नाहीं. दुसऱ्यापक्षीं—) हे **विभो**—हे प्रभो, **गुणेषु वर्तमानः देही अपि देहजेषु कथं न बध्यते**—गुणांमध्यें रहाणाराहि देही गुणकार्यभूत देहापासून होणाऱ्या कर्मांमध्यें व सुखादिकांमध्यें बद्ध कसा होत नाहीं, (तो आकाशाप्रमाणें अनावृत असल्यामुळें बद्ध होत नाहीं, म्हणून जर म्हणाल तर बंध संभवत नाहीं, असें उद्धव म्हणतो -) **गुणैः अनपावृतः देही कथं वा बध्यते**—गुणांनीं परिच्छिन्न न झालेला तो बद्ध कसा होतो ? ३५.

उद्धव म्हणाला कीं, हे श्रीकृष्णनाथा ! आत्मा देहांत असतांना खरोखर बंधांत पडतो किंवा त्याला मुळींच बंधन नसतें ! ११ सत्त्वादि तीन गुणांनी युक्त असतांनाच मुक्ति मिळते किंवा गुण लोपल्यावर मुक्ति मिळते, हें

अतिनिवाडें निश्चित ॥ १२ ॥ गुण असतां मुक्ति घडे । हें सर्वथा बोलणें कुडें । ज्वर असतां आरोग्य न घडे । वृक्ष न वाढे भिरुंडेंसीं ॥ १३ ॥ बाहीं बांधोनि पाषाण । समुद्रामाजीं तरे कोण । तैसे देहीं असतां त्रिगुण । मुक्तपण कैसेनी ॥ १४ ॥ गुण जे रजतमादिक । त्यांचें कार्य देह देख । गुणासारिखीं आवश्यक । कर्मे अनेक आचरे ॥ १५ ॥ कर्मांचें फळ सुखदुःख । भोगणें पडे गा अचुक । गुणांसी मुक्ति न घडे देख । हें ज्ञाते लोक म्हणताती ॥ १६ ॥ गुण गेलिया मुक्ति । हेंही न घडे गा श्रीपती । येहीविषयीं विनंती । कृपामूर्ती अवधारीं ॥ १७ ॥ गुणांचें कार्य देहेंद्रियें । ते गुण जाऊनि देह राहे । भूमीवीण वृक्ष होये । हें अबद्ध पाहें बोलणें ॥ १८ ॥ कारण जाऊनि कार्य राहे । हें बोलणें घडे काये । गुण जातां देहोचि जाये । मुक्त वर्तताहे कैसेनी ॥ १९ ॥ एवं गुण असतां नसतां । मुक्ति न घडे गा सर्वथा । येचिविषयीं कृष्णनाथा । तुज मी तत्त्वतां पुसतू ॥ ७२० ॥ आणिक एक जगन्नाथा । तुज मी विनंती करीन आतां । गुण आत्म्यासी एकत्रता । न घडे सर्वथा निश्चित ॥ २१ ॥ भरलें मृगजळाचें तळें । चंद्रमा बिंबेना तेणें जळें । तेवीं आत्मा गुणांसी नाकळे । स्वभावें नातळे गुणांतें ॥ २२ ॥ गुण ते अज्ञानाची राती । आत्मा स्वप्रकाश गभस्ती । त्यासमोर ते कैंचे येती । मग बाधिती आत्म्यातें ॥ २३ ॥ अंधार सूर्यातें गिळी । काउळा कैलास आतळी । बागुल हनुमंतातें सळी । मशक गिळी गजातें ॥ २४ ॥ माशी पांखें गगन उडे । सगळा मेरू थिल्लरीं बुडे । मृगजळीं जैं तारूं पडे । तैं आत्मा सांपडे गुणांत ॥ २५ ॥ जेवीं आकाश नातुडे जाळीं । तेवीं आत्मा नाकळे गुणमेळीं । मा सुखदुःखांची नवाळी । गुणकल्लोळीं कां भोगी ॥ २६ ॥ यापरी न घडे गा बद्धता । मा मुक्ताची

मला स्पष्ट करून निश्चयानें सांग. १२ गुण असतांच मुक्ति मिळते म्हणावें तर हें बोलणें अगदींच विपरीत आहे, कारण रोग्याच्या अंगांत ज्वर असतांना त्याला कधीं आरोग्य लाभत नाहीं, किंवा झाडाला कीड लागल्यावर तें वाढत नाहीं. १३ दंडाला दगड बांधून पोहणारा कधीं तरतो काय ! त्याप्रमाणें अंतःकरणांत तीन गुण असतांना जीव मुक्त कसा होणार ! १४ सत्त्व, रज व तम या तीन गुणांचेंच कार्य देह आहे, म्हणून तर तो गुणांसारखीं अनेक कर्में अवश्य करितो. १५ कर्मांचें फल सुख व दुःख हें आहे. तें अचुक भोगावें लागतें. म्हणून गुणांनीं युक्त असतांना मुक्ति मिळणें शक्य नाहीं, असें विद्वान् म्हणतात. १६ हे श्रीपते ! गुण नाहींसे झाल्यावर मुक्ति मिळते म्हणावें तर तसेंहि घडत नाहीं. हे दयाघना ! याविषयींहि माझी विनंति ऐक. १७ देह व इंद्रियें हें गुणांचें कार्य आहे. तेव्हां गुण गेल्यावर देह रहातो, हें बोलणें भूमीवांचून वृक्ष रहातो या म्हणण्यासारखेंच विपरीत आहे. १८ कारण नाहींसें झाल्यावर कार्य शिल्लक रहातें, हें बोलणें कसें संभवतें ! गुणांबरोबर शरीरहि जाणार मग मुक्त होणारा वागणार कसा ! १९ याप्रमाणें गुणसहित व गुणरहित असतांना मुक्ति केव्हांहि प्राप्त होत नाहीं. हे कृष्णनाथा ! याविषयीं खरें तत्त्व मी तुला विचारितों. ७२० हे जगन्नाथा ! मी आणखी एक तुला विनंति करितों. गुण व आत्मा यांचा केव्हांहि एकत्र वास संभवत नाहीं. २१ मृगजलानें भरलेल्या तळ्यांत जसें चंद्राचें प्रतिबिंब केव्हांहि पडत नाहीं, त्याप्रमाणें आत्मा गुणांनीं बद्ध होत नाहीं. कारण गुणांना स्पर्शहि न करणें, हा आत्म्याचा स्वभावच आहे. २२ गुण अज्ञानरूपी रात्र आहे व आत्मा स्वयंप्रकाश सूर्य आहे. तेव्हां ते गुण आत्म्यापुढें येणार कसे ! व ते त्याच्या पुढेंहि जर येऊं शकत नाहींत तर त्याला बाधणार तरी कसे ! २३ अंधकार जर सूर्याला ग्रासील, कावळा कैलास व्यापील, बागुलबुवा मारुतीला घाबरवील, डांस हत्तीला खाईल, २४ माशी आपल्या पंखानें आकाशांत उड्डाण करील, मेरु पर्वत डबक्यांत बुडून जाईल किंवा नौका मृगजलांत बुडेल, तर आत्मा गुणांनीं बद्ध होईल. २५ आकाश जसें जाळ्यांत सांपडत नाहीं, त्याप्रमाणें आत्मा गुणांच्या समुदायांत सांपडत नाहीं. मग त्याला गुणांच्या क्षोभानें सुखदुःखांची प्राप्ति कशी होणार ! २६ याप्रमाणें तो जर बद्धच होत नाहीं, तर

कायसी कथा । कैसेनि बद्धमुक्तव्यवस्था । घडे कृष्णनाथा तें सांग ।। २७ ।। येथ बद्धासी काय कारण । आणि मुक्ताची कोण खूण । एवं बद्धमुक्तलक्षण । मज संपूर्ण सांगावें ।। २८ ।।

कथं वर्तेत विहरेत्कैर्वा ज्ञायेत लक्षणैः । किं भुञ्जीतोत विसृजेच्छयीताऽसीत याति वा ।। ३६ ।।

आतां बद्धमुक्तांची स्थिती । मज सांगावी श्रीपती । कोणें लक्षणें जाणिजेती । दोघे कळती कैसेनी ।। २९ ।। पावोनियां विदेहावस्था । देहीं कैसेनि वर्तता । वश करूनि गुणातीतता । गुणीं क्रीडता कैसेनी ।। ७३० ।। पावोनियां मुक्तदशा । देहीं भोग भोगी कैसा । त्यासी त्यागाचा कोण ठसा । हृषीकेशा सांगिजे ।। ३१ ।। त्याचें निद्रेचें कोण लक्षण । कोण बैसका कोण आसन । वस्तु जाणोनि संपूर्ण । गमनागमन त्या कैसें ।। ३२ ।। ऐशीं मुक्तांचीं लक्षणें । त्याहोनि बद्धांचीं विलक्षणें । कृपा करोनि नारायणें । मजकारणें सांगिजे ।। ३३ ।।

एतदच्युत मे ब्रूहि प्रश्नं प्रश्नविदां वर । नित्यमुक्तो नित्यबद्ध एक एवेति मे भ्रमः ।। ३७ ।।

या प्रश्नोत्तरांची उत्कंठा । थोर वर्ततसे वैकुंठा । प्रश्नवेत्त्यांमाजीं श्रेष्ठा । अतिवरिष्ठा गोविंदा ।। ३४ ।। अनादि असे गुणसंबंधू । तेणें आत्मा झाला नित्यबद्धू । नित्यमुक्त हा शब्दू । असंबद्धू सर्वथा ।। ३५ ।। जरी आत्म्यासी नित्यमुक्तता । तरी बोलोंचि नये बद्धता । एकुचि बद्धमुक्त म्हणतां । भ्रम अच्युता वाटत ।। ३६ ।। आत्मा एकचि तत्त्वतां । त्यासीं बद्धता आणि मुक्तता । एकासीच दोनी

मग मुक्त होण्याची गोष्ट कशाला ! तरी हे कृष्णनाथा ! बंध व मोक्ष यांची काय व्यवस्था आहे, हें मला सांग ! २७ बंधनाचें कारण काय ! व मुक्त होण्याचें लक्षण काय ! बद्ध व मुक्त यांचें लक्षण मला सविस्तर सांग. ७२८.

—'आतां गुण विद्यमान असतांनाच त्यांवर अहंकार ठेविल्यानें आत्मा बद्ध होतो व अहंकार निवृत्तीनें मुक्त होतो, असें जर तुमचें मत असेल तर त्याविषयीं मला हें ज्ञातव्य आहे' असें उद्धव म्हणतो—

कथं वर्तेत विहरेत् कैः वा लक्षणैः ज्ञायेत-बद्ध किंवा मुक्त कसा वागतो, विहार कसा करितो, कोणत्या लक्षणांनीं जाणिला जातो, किं भुञ्जीत उत विसृजेत् शयीत आसीत याति वा–तो भोजन कसें करितो, त्याग कसा करितो, शयन, आसन व गमन कसें करितो. ३६.

हे श्रीपते ! आतां मला बद्ध व मुक्त यांची स्थिति सांग. बद्ध कोण व मुक्त कोण, हें कोणत्या लक्षणांवरून ओळखावें ! २९ विदेहावस्थेला प्राप्त झालेले लोक देहांत राहून कसे वागतात ! ते गुणातीत होऊन गुणामध्यें कसें वर्तन करितात ! ७३० मुक्त होऊन देहांतील भोग कसे भोगतात ! त्यांच्या त्यागाची खूण काय असते. हे हृषी-केषा ! तें सर्व मला सांग. ३१ त्यांच्या निद्रेचें स्वरूप कसें असतें ! त्यांचें आसन कसें असतें ! बैठक कशी असते ! पूर्ण ब्रह्म जाणल्यावर त्यांचें जाणें येणें कसें असतें ! ३२ तात्पर्य हे नारायणा ! युक्त जीवांचीं लक्षणें व त्याच्या उलट बद्ध जीवांचीं लक्षणें कृपा करून मला सांग. ७३३.

हे अच्युत प्रश्नविदांवर एतत् मे प्रश्नं ब्रूहि–हे अच्युता, हे प्रश्नवेत्त्यांतील श्रेष्ठा, बद्ध व मुक्त यांच्या लक्षणाविषयीं माझ्या या प्रश्नाचा निर्णय मला सांग. एक एव नित्यबद्धः नित्यमुक्तः इति मे भ्रमः–एकच आत्मा अनादि गुण-संबंधामुळें नित्य बद्ध आहे. त्याचप्रमाणें मुक्ति उत्पन्न होणारी आहे असें मानिल्यास ती अनित्य आहे, असें मानण्याचा प्रसंग येतो, म्हणून आत्मा नित्यमुक्त आहे, असेंहि मानावें लागते; पण त्याविषयीं मला भ्रम होतो. ३७.

हे सर्वश्रेष्ठ, प्रश्नांचें समर्पक उत्तर देणाऱ्यांमध्यें प्रमुख, वैकुंठाधिपते गोविंदा ! या प्रश्नांचीं उत्तरें ऐकण्याची मला फार उत्कंठा लागली आहे. ३४ गुणांचा संबंध अनादि आहे. त्यानें आत्मा नित्य बद्ध झाला आहे, तेव्हां त्याला नित्यमुक्त बोलणें असंबद्ध आहे. ३५ आत्मा जर नित्यमुक्त असता तर बद्ध हा शब्द तोंडांतून काढावयासच नको होता. एकच बद्ध व मुक्त आहे, असें म्हटल्यास त्या दोन अवस्था परस्पर विरुद्ध आहेत. म्हणून हे अच्युता ! मनाला भ्रांति पडते. ३६ हे कृष्णनाथा ! आत्मा जर तत्त्वतः एकच आहे तर मग त्याला बद्ध व मुक्त या दोन

अवस्था । कृष्णनाथा कैसेनी ॥ ३७॥ जो धाला तोचि भुकेला । जागता तोचि निजेला । जो जिता तोचि मेला । सत्यत्व या बोला कैसेनी ॥ ३८ ॥ काळें तेंचि धवळें । देखणें तेंचि आंधळें । अर्धें तेंचि सगळें । कुहिन्या केळें केवीं होती ॥ ३९ ॥ लोण तेंचि अलवणी । कोरडें तें पाणी । अतिशीतळ तो दारुण अग्नी । मुकें पुराणीं बोलिगडें ॥ ७४० ॥ लुगडें नागिवपणें लाजाळ । अन्न भुकेलेपणें भुकाळ । मुक्तीसी मुक्तीचा दुकाळ । कापुरा परिमळ मिळेना ॥ ४१ ॥ तैसे संत तेचि असंत । अद्वैत तेंचि होय द्वैत । तेव्हां हित तेंचि अनहित । दिसे प्रस्तुत आम्हांसी ॥ ४२ ॥ आत्मा नित्यमुक्त शुद्ध बुद्ध । ऐसा तुवांचि मज केला बोध । तो गुणसंगें ह्मणसी बद्ध । भ्रमू अगाध येणें मज ॥ ४३ ॥ एकासचि बद्ध-मुक्तता । कैसेनि घडे कृष्णनाथा । कृपाळुवा जी अनंता । हें मज तत्त्वतां । सांगावें ॥ ४४ ॥ म्हणसी मुक्तीसी आगंतुकता । तेणें मोक्षासी आली अनित्यता । बद्ध आगंतुक म्हणतां । त्यासी सादिता येऊं पाहे ॥ ४५ ॥ पूर्वीं बद्धचि नव्हता । येथूनि उपजला आतां । ऐशी सादिता बोलतां । होईल शास्त्रार्थी-विरुद्ध ॥ ४६ ॥ श्रुतिस्मृतिशास्त्रसिद्ध । अनादि मुक्ति अनादि बध्द । आत्मा एक अवस्था द्विविध । त्याही विरुद्ध परस्परें ॥ ४७ ॥ उठिली बद्धता मुक्तीतें छळी । खवळली मुक्ती बद्धता गिळी । ऐशा विरुद्धता आत्म्याजवळीं । केवीं वनमाळी राहताती ॥ ४८ ॥ जैं सांजवेळे भेटे पाहांट । तैं विद्या अविद्या होय एकवट । सूर्य अंधाराची बांधे मोट । तैं आत्म्यानिकट अवस्था ॥ ४९ ॥ हिंगासी कापुराचा वासु जोडे । तैं अविद्या विद्येमाजीं पडे । ससा सिंहावरी जैं चढे । तैं आत्म्यापुढें अवस्था ॥ ७५० ॥ उद्धव म्हणे कृष्णनाथा । या जैं कळल्या दोनी अवस्था । तैंचि मुक्ति आली हाता । मज सर्वथा मानलें ॥ ५१ ॥ मग ह्मणे श्रीअनंता । विशद सांगाव्या अवस्था । ह्मणोनि चरणीं ठेविला माथा । मोक्षदाता तूं मज

अवस्था कशा ! ३७ जो जेवून तृप्त झाला तोच भुकेला आहे, किंवा जो निजला आहे तोच जागत आहे, किंवा जो जिवंत आहे तोच मरण पावला, या बोलण्यासारखेंच त्यांत सत्यत्व आहे. ३८ जें काळें तेंच पांढरें, किंवा जो डोळस तोच आंधळा, जें अर्धें तेंच सगळें, किंवा निंबोण्याच्या वृक्षाला केळीं कशीं येणार ! ३९ किंवा खारट तेंच अळणी, कोरडें तेंच ओलें, अतिगार तेंच पोळणारें उष्ण, मुकें तेंच बोलकें, ७४० किंवा नग्न स्त्रीनें जसें लुगड्याला लाजाळू म्हणावें, किंवा भुकेलेल्या माणसानें अन्नाला भुकेलें म्हणावें, किंवा मुक्ताला मुक्तीचा दुष्काळ पडावा, किंवा कापरालाच त्याचा वास मिळूं नये, ४१ किंवा सज्जन तेच दुर्जन, अद्वैत तेंच द्वैत, किंवा हित तेंच अहित, अशांतलाच हा प्रकार मला दिसत आहे. ४२ हे कृष्णनाथा ! आत्मा नित्य, मुक्त, शुद्ध, बुद्ध आहे, असा तूंच मला उपदेश केला होतास व आतां तोच आत्मा गुणांनीं बद्ध होतो असें म्हणतोस. त्यामुळें मी मोठ्या संशयांत पडलों आहें. ४३ अनंता, एकालाच बद्ध-मुक्तता कशी संभवते, हें कृपा करून मला सांगा. ४४ मुक्तीला जर तूं आगंतुक म्हणशील तर मोक्ष अनित्य ठरतो आणि बंध आगंतुक म्हणशील तर तो उत्पन्न होणारा ठरतो. ४५ पूर्वीं बंधच नव्हता. तो आतां पुढें झाला. जीव पूर्वीं बद्ध नव्हता. तो आतां येथपासून जन्माला आला, असें त्याचें सादित्व सांगितल्यास तें शास्त्रार्थाच्या विरुद्ध होईल. ४६ मुक्ति अनादि आहे व बंधनहि अनादि आहे असें श्रुति, स्मृति व इतर शास्त्रें यांनीं सिद्ध केलें आहे. आत्मा एकच आहे, पण अवस्था दोन आहेत व त्याहि एक-मेकींच्या विरुद्ध आहेत. ४७ बद्धता प्रबल झाली कीं, ती मुक्तीला छळते व मुक्ति खवळली म्हणजे ती बद्धतेला ग्रासून टाकिते. तेव्हां हे वनमाळी श्रीहरे ! आत्म्यापाशीं या दोन विरोधी अवस्था कशा रहातात ! ४८ संध्याकाळ जर पहांटेला भेटली तर विद्या व अविद्या एकत्र होतील. किंवा सूर्य व अंधार यांची जर मोट बांधिली तर आत्म्या-जवळ या अवस्था रहातील. ४९ हिंगाला जर कापराचा वास लागला तर अविद्या विद्येपाशीं राहील. ससा जेव्हां सिंहावर चढाई करील तेव्हां आत्म्यापुढें या अवस्था उभ्या रहातील. ७५० उद्धव म्हणाला, हे कृष्णनाथा ! या दोन अवस्था जेव्हां कळतील तेव्हांच मुक्ति हस्तगत होईल, हें मला सर्वथा मान्य आहे. ५१ हे श्रीअनंता ! या दोन अवस्था मला स्पष्ट करून सांगाव्या. तूंच मला मोक्ष देणारा आहेस, असें म्हणून उद्धवानें श्रीकृष्णाच्या

॥ ५२ ॥ सखोल उद्धवाचा प्रश्न । ऐकोन सुखावला नारायण । माझा उद्धवु जाला सज्ञान । हरिखें जगज्जीवन डोलतु ॥ ५३ ॥ परमार्थीं अवस्था गाढी । देखोनि प्रश्नाची अतिगोडी । उद्धवासी ओंवाळावया आवडीं । जीव कुरवंडी करूं पाहे ॥ ५४ ॥ नुलंघी भक्तांचें उत्तर । फोडिलें गुह्य ज्ञानभांडार । भक्तकृपा जी अपार । हरि साचार तुष्टला ॥ ५५ ॥ उद्धवाचा प्रश्न गहन । कृपा द्रवला जगज्जीवन । एका विनवी जनार्दन । आनंदघन बोळला ॥ ५६ ॥ त्या आनंदाचा महापूरू । शिष्यसरितेसी येईल थोरू । तेणें चिद्गंगासागरू । शिष्य सत्वरू ठाकील ॥ ५७ ॥ टाकोनियां संसारआस्था । जो लागला भक्तिपंथा । तोचि अधिकारी भागवता । परमार्था ग्राहकु ५८ ॥ ज्याचे पोटीं संसारचिंता । तो कथा ऐकतांचि दुश्चिता ।चित्त चिंती ज्या ज्या अर्था । तो सर्वथा तेथें असे ॥ ५९ ॥ चित्त जंव नाहीं सुचित्त । तंव न कळे श्रीभागवत । गुरूवांचूनि श्रीभागवतार्थ । नव्हे प्राप्त प्राण्यासी ॥ ७६० ॥ जो संसारापासोनि विरक्त । गुरुचरणीं अतिअनुरक्त । त्यासीच फावला एक परमार्थ । फळे भागवत तयासी ॥ ६१ ॥ देखतां कृष्णाचें श्रीमुख । उद्धवा नीच नवें समाधिसुख । तरी श्रवणाची श्रद्धा अधिक । आवडी देख अनिवार ॥ ६२ ॥ जो श्रुतिप्रतिपाद्य चिद्घन । त्या श्रीकृष्णाचें गुह्य ज्ञान । पुढतपुढतीं होआवया श्रवण । करी प्रश्न अतियोग्य ॥ ६३ ॥ विद्याअविद्येचा निरासु । श्रीकृष्ण सांगेल परेशु । पुढील अध्याय अतिसुरसु । श्रोतां अवकाशु मज द्यावा ॥ ६४ ॥ तो कृष्णउद्धवसंवादू । पुढिले कथेचा अतिविनोदू । एका जनार्दनीं महाबोधू । परमानंद प्रकटेल॥ ७६५ ॥ इति श्रीभागवते महापुराणे श्रीकृष्णोद्धवसंवादे परमहंससंहितायां एकाकारटीकायां दशमोऽध्यायः ॥ १० ॥

इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कन्धे भगवदुद्धवसंवादे दशमोऽध्यायः ॥ १० ॥

चरणांवर मस्तक ठेविलें. ५२ उद्धवाचा गुप्त प्रश्न ऐकून नारायणाला संतोष झाला. माझा उद्धव आतां ज्ञानी झाला, म्हणून जगजीवन आनंदानें डोलूं लागला. ५३ परमार्थांत त्याचें चित्त गढून गेलेलें पाहून व त्याची प्रश्न करण्याची आवड जाणून तो उद्धवावरून आपला जीव ओंवाळून टाकण्यास तयार झाला. ५४ भगवान् भक्ताच्या शब्दाचें कधीं उल्लंघन करीत नाहीं. त्यानें आपलें गुप्त ज्ञानभंडार उघडिलें. हरि खरोखर प्रसन्न झाला व त्यानें भक्तावर अपार कृपा केली. ५५ उद्धवानें गहन प्रश्न केला व जनार्दन कृपेनें द्रवला. एकनाथ जनार्दनस्वामींना विनवितो कीं, आनंदाचा मेघ भरून आला आहे. ५६ त्याच्या आनंदरूप वृष्टीनें शिष्यरूपी नदीला प्रचंड पूर येईल व तो शिष्य ज्ञानगंगेचा समुद्र सत्वर गांठील. ५७ संसाराची आसक्ति टाकून जो भक्तिमार्गाला लागला तोच भागवताचा अधिकारि आहे व तोच परमार्थाचा ग्राहक आहे. ५८ ज्याच्या मनांत संसाराची चिंता असते त्यानें ही कथा ऐकतांच त्याला विपरीत भावना होईल, कारण मन ज्या गोष्टीचें चिंतन करितें तद्रूप तें बनतें. ५९ चित्त जोंपर्यंत स्थिर नसतें, तोंपर्यंत त्याला श्रीभागवत समजत नाहीं. गुरूवांचून भागवताचा अर्थ कोणाला कळत नाहीं. ७६० जो संसारापासून विरक्त व गुरुचरणांवर आसक्त असतो, त्यालाच परमार्थ साधतो व त्यालाच भागवताचें फल मिळतें. ६१ श्रीकृष्णाचें मुख पहातांच उद्धवाला नित्य नवें समाधिसुख लाभत होतें. त्यांत आणखी त्याची श्रवणाविषयींची श्रद्धा व आवड अनिवार झालीं. ६२ श्रुतींनीं ज्याचें प्रतिपादन केलें आहे असा जो ज्ञानरूप परमात्मा श्रीकृष्ण, त्याचें गुह्य ज्ञान अधिक अधिक कळावें म्हणून उद्धवानें यथायोग्य प्रश्न केला. ६३ श्रीकृष्ण आतां विद्या व अविद्या यांचें निरसन करणार आहे. पुढला अध्याय अतिसुरस आहे. तरी श्रोत्यांनीं मजकडे लक्ष द्यावें. ६४ श्रीकृष्ण व उद्धव यांच्या संवादाची ती कथा मोठी रमणीय आहे. यास्तव एकनाथ जनार्दनांतहि आत्मबोध व परमानंद प्रकट होतील. ७६५.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थसह श्रीकृष्ण-उद्धव-संवाद
या नांवाचा दहावा अध्याय समाप्त झाला.